म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
नं. १४५२

# कथा • प्रातिनिधिक संग्रह • कविता

REFBK-0010577

संपादक:
आत्माराम भोयर

आठ कथा व एकशे सात कवितांचा

संयुक्त ।। प्रातिनिधिक ।। संग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०५०

# पालवी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

संपादक :

आत्माराम भोयर

REFBK-0010577
REFBK-0010577

प्रस्तावना

राम कोलारकर, संपादक–'नवें लेखन'

: प्रथमावृत्ति :

३१ डिसें. १९५९.

किंमत : तीन रुपये

: प्रकाशक :
अरुणोदय प्रकाशन
नागपूर.

मुखपृष्ठ छपाई :
'ताकवाले मुद्रणालय'
नागपूर.

★ ★

: सर्वाधिकार :
(संपादक) श्री. आ. चि. भोयर.
रहाटे कॉलनी, नागपूर १
(यांचे स्वाधीन)

★

: मुद्रक :
★ 'महेश मुद्रणालय' नागपूर १ ★

# कथाकार

—:●:—

| | | |
|---|---|---|
| १. | प्रभाकर बेंद्रे. | 'दोन साक्षी' |
| २. | रा. म. फडके. | दौलत |
| ३. | निहालचन्द वक्काणी. | आशा ! |
| ४ | दत्ता कवीश्वर. | उबळ |
| ५. | आत्माराम भोयर. | सारजाईचा लेक ! |
| ६. | निशा हिर्डे. | मंजु. |
| ७. | भरतकुमार रघुवंशी. | कलिंगडाची फाक. |
| ८. | रघुनाथ हडकर. | चूक ?-भूल ! |

# कवि

—:०:—

. वसंत वि. साखरकर.
. रघुनाथ हडकर.
. भुजंग देशपांडे.
१. विजय टाकोडे
२. गोविंद नन्नोरे
३. निशा हिर्डे
४. बजरंग सरोदे
५. रामकृष्ण देशमुख
६. भरतकुमार रघुवंशी
७. शंकर काळे.
८. सुधाकर लोखंडे
९. राजाभाऊ निकम
१०. प्रल्हाद पाटील.

. नंदकिशोर करीर 'स्नेही'
. नारायण शास्त्री.
. भगवंत ठाकरे
११. रा. व्यं. निनावे.
१२. लक्ष्मीकान्त कुरोडे.
१३. संभाजी होकम.
१४. रघुनाथ ब्राह्मणकर
१५. कृष्णा स. चौधरी.
१६. ज.बं.विसापूरकर 'गीताकिशोर'
१७. रामदास सेलूकर
१८. ह.गो. निखाडे 'आनंद'
१९. रंगनाथ बंदसोडे
२०. प्रभाकर जावरकर

२१. माणिक भोयर
२२. अविनाश वरोकर
२३. यशवंत सातपुते
२४. प्रभाकर कोरेकर
२५. सुधाकर मोगलेवार
२६. गंगाधर सावळकर
२७. उत्तम लिमये
२८. शांताबाई दंडिगे
२९. अण्णा अडसोड
३०. नीलकांत ढोले.
३१. वामन हाते.
३२. वासुदेव भावे.
३३. तुकाराम डोंगरे
३४. दत्ता कवीश्वर
३५. विद्याधर घारपुरे
३६. हंसदास बोंबले 'बुद्धानंद.'
३७. ज्ञानराव गावंडे 'अंजन'.
३८. कृ. मा. देशमुख 'कृष्णमाधव'
३९. आत्माराम भोयर.
४०. प्रभा वसंतराव बल्लाळ.
४१. वसंत देशमुख.
४२. दिनकर हरणे.
४३. मा. बा. जोशी.
४४. ना. मा. तिडके
४५. अरविंद देशपांडे 'शशीधर'
४६. आसाराम गोहणे
४७. राजाराम कुळकर्णी
४८. कृ. बा. चौधरी.
४९. बद्रुद्दिन खोजा.
५०. गुलाबराव भुते
५१. वसंत डहाके.
५२. दिनकर भूत 'जानकीतनय'
५३. बाळासाहेब पाटील.
५४. गंगूताई वैद्य 'सरस्वतीतनया'
५५. विना पाटील.
५६. प्र. कुन्दारपवार.
५७. शंकर चोबितकर.
५८. सिंधू पुरणकर.
५९. प्रयागराव लाडे.
६०. पुरुषोत्तम वनकर.
६१. भास्कर कोतवालीवाले. 'श्रीरामतनय'

६२. (६८) केशव पाजणकर.

# संपादकीय

—::★::—

मराठी भाषेच्या भांडारांत भर घालणाऱ्या साहित्यिकांत कितीतरी नवोदित साहित्यिक निर्माण होत आहेत हें मोठ्या भाग्याचे लक्षण आहे. परंतु या साहित्य क्षेत्रांत शिरकाव करून जनतेपुढें येणें हें अनेक दृष्टीने अवघड काम आहे. नवोन्मुख कवि वा लेखक कितीहि कुशल असला तरी तो कुणीतरी हात दिल्याशिवाय, त्याचे कौतुक केल्याशिवाय या क्षेत्रांत पाऊल टाकूच शकत नाही. पुष्कळ वेळां अशा उत्तेजनाभावी कित्येकांची प्रतिभा लुप्त होते असा स्वानुभव आहे. झब्बूचा बादशहा म्हणून मिरविणाऱ्यांचे दिवस गेलें हे लक्षांत घेऊन अशा उदयोन्मुख साहित्यिकांना उत्तेजन मिळावें व त्यांना कलानिर्मितीचा आनंद लाभावा हाच उद्देश या योजनेंत आहे.

आमचा हा 'नव्हाळी' नंतरचा दुसरा प्रातिनिधिक संग्रह आहे. त्याच्या सफलतेचे श्रेय, आमच्याविषयीं आत्मीयता, विश्वास, आपुलकी आणि जिव्हाळा असणाऱ्या सुहृदांनाच आहे. त्यांच्या या प्रेमळ सहानुभूतीबद्दल अंत:करणापासून कृतज्ञता व्यक्त करून आभार मानतों. तद्वतच् असेंच वेळोवेळीं सहर्ष सहकार्य लाभावें अशीहि उमेद ठेवतो.

हा कथा–कवितांचा संयुक्त असा संग्रह असल्यामुळें हें पुस्तक सर्वसामान्य वाचक–वर्गालाही रुचेल व अल्पसातरी लाभ होईल अशी आशा मी धरतो. ही नवोदितांनी फुलवीलेलीं हिरवी कंच 'पालवी' आपल्या पानोपानीं एक आगळे वैशिठ्य राखून नव्या उन्मेषाने झळाळते आहे. ती लोकांच्या डोळ्यांत खुपणेहि आमचे श्रेय आहे !

हें पुस्तक घाईघाईने हातावेगळे केल्यामुळें कांही मुद्रण–दोष राहून जाणें अपरिहार्य आहे. पृ० ३६ वर रामदास सेलूकरांना 'विस्मती-चा शीतल उ:शाप !!' हवा असतो, हें सांगायलाच पाहिजे.

माझे मित्र श्री. सुधाकर मोगलेवार यांनी मोठ्या आस्थेने छपाईचे काम हातीं घेऊन अल्पावधीत तत्परतेने पार पाडलें. याबद्दल त्यांचे आभार मानण्यापेक्षा, त्यांचे कडून असेंच सहकार्य मिळत राहो हीच अपेक्षा करतों.

मराठी साहित्यक्षेत्रांत खळबळ माजविणारे असें श्रेष्ठ दर्जाचे मासिक 'नवें-लेखन' चे संपादक श्री. राम कोलारकर यांनी वेळांत वेळ काढून आपली मननीय परीक्षणात्मक प्रस्तावना लिहून दिली. यांची प्रस्तावना हें मला ह्या संग्रहाचे भूषण वाटतें. त्यांचे मनःपूर्वक जितके आभार मानावे तितके थोडेच होतील.

आमच्या योजनेचे, डॉ. वि. भि. कालते, श्री. कृ. मु. उजळंबकर व सौ० इंदूमती शेवडे या सन्माननीय प्रतिष्ठीत व्यक्तींनी स्वागत केलें. त्यांनी आम्हां नवोदितांना उत्तेजन देऊन उपकृत केलें. याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

— संपादक.

## : पुरस्कार :

मराठी कवितेस व लघुकथेस पालवी फुटत असल्याचे प्रतीक 'पालवी' या प्रातिनिधिक लेखकांच्या कथा व कविता संग्रहांत आढळून येते. संपादक श्री. आत्माराम भोयर यांनी नवोदित कवींची व लघुकथाकारांची महाराष्ट्राला जी ओळख करून दिली आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन !

कृष्ण मुकुंद उजळंबकर<br>
मुख्य ग्रंथपाल, केंद्रिय ग्रंथालय, नागपूर.

# ( प्रस्तावना (

--::●::--

कविता लिहिणारे व कविता वाचणारे अनिवार्यपणें भावविवश असतात, असा सर्व सामान्य मराठी वाचकाचा समज आहे. तरल संवेदनक्षमता जिवंत असूनहि भावनाशून्य झालेला एखादा कवि अस्तित्वांत असू शकेल. अतिरिक्त प्रमाणांत व सक्तीने काव्यवाचन करणारा आणि काव्यासक्ति व संवेदना बोथट होण्याची दैनंदिन भीति बाळगणारा, समरस व तरीहि अलिप्त असा टीकाकार–संपादक देखील अस्तित्वांत असूं शकेल

मराठी वाचकांना समंजसपणा बाल्यावस्थेंतच ठेवण्याचें व त्याची वाङ्मयीन अभिरुचि अपरिपक्व घडविण्याचें पुण्यकार्य कोण करीत आलें आहे? आमचे संपादक आणि आमचे बहुसंख्य टीकाकार! पण हें अपकारक कर्तव्य ते हेतुपुरःसर करीत आहेत असें म्हणण्याचा डोळस मूर्खपणा मी करणार नाही. तत्वज्ञानाच्या अधिष्ठानाने प्रेरित होणारी शास्त्रतुल्य विश्लेशणशक्ति संपादित न करूं शकणारे टीकाकार–संपादक आपल्या पिग्मी पात्रतेने अभिजात साहित्यमूल्यांचा हिमालय चढूं पाहतात, म्हणून हें सारें घडलें आहे व घडतें आहे! आमच्या टीकाकार–संपादकांनी कांही मूलभूत गोष्टींचीच चमत्कारिक गल्लत करून ठेवली आहे– स्वत:साठी व वाचकांसाठीहि! संवेदना म्हणजे काय? भावना म्हणजे काय? भावविवशता म्हणजे काय? संज्ञाप्रवाह म्हणजे काय? जाणीव म्हणजे काय? नेणीव म्हणजे काय? विचार व वैचारिकता यांतील फरक कोणता? अतिअंतस्थ नेणीवेचें अत्युच्च जाणिवेशी कोणते नातें आहे? जीवनविषयक गूढ सत्यांचा शोध बुद्धिसामर्थ्याने की अंत:प्रेरणेने– विचारांतून की संवेदनेंतून? साहित्यिकाचें माध्यम भाषा हें की वाचक हेंच? कलावंत, वाचक व टीकाकार यांचा परस्परसंबंध काय? हे आणि असले अनेक प्रश्न स्वत:लाच विचारण्याचा निर्भिडपणा किती टीकाकारांत आ-

ढळतो, हाच एक फार मोठा प्रश्न आहे वरील प्रश्नांचीं कांटेकोर व सूक्ष्मदर्शी उत्तरें मिळणें शक्य आहे काय? तीं उत्तरें मिळविण्यासाठी कुणी कुठवर प्रयत्न केला?

ह्या साऱ्या नकारात्मक वस्तुस्थितीला कारण म्हणजे आमच्या टीकाकारांची वाङ्मयाकडे पाहण्याची संकुचित दृष्टि! समग्र विश्वसाहित्याची एकात्मता जाणणें ही आजची प्रमुख गरज आहे! काव्य म्हटलें की टीकाकाराला ऋग्वेदापासून रिल्केपर्यंतची प्रायोगिक परंपरा स्मरावी.

ज्या प्रकारचे साहित्य ह्या पुस्तकांत समाविष्ट केलेलें आहे, त्या प्रकारचें व तितकें साहित्य मराठींतील प्रत्येक संपादकाला दर पंधरवाड्यांत किंवा आठवड्यांत सक्तीने वाचावें लागतें. ही एकप्रकारची कागदी प्रयोगशाळा असते. अशा प्रयोगशाळेचा सूक्ष्म संचार पूर्ण केल्याशिवाय कोणत्याहि मासिकाचा पुढील अंक मूर्त स्वरूपांत येऊं शकत-नाही. प्रत्येक संपादकाचें हें अपरिहार्य कर्तव्य असतें.

तेंच कर्तव्य आज या पुस्तकाच्या वाचकांनी पूर्ण करावें, अशी प्रयोगात्मक योजना श्री आत्माराम भोयर यांची दिसते या पुस्तकाचा बाहेरचा पहिला वाचक मी ठरलों. सर्व वाचकांनी या प्रयोगशाळेचा एक संचार करून चाकोरीबाहेरील क्षेत्राविषयींचें कुतूहल वापरून पहायला हरकत नाही.

विजय टाकोडे अभिनंदनास पात्र आहेत. कलेची जाणीव त्यांना आहे आणि अनुभूतींतील काव्य शोधण्याची क्षमता त्यांच्या सूक्ष्म संवेदनेंत आहे. मोगऱ्याची शुभ्र थर्थर नि उत्तररात्रीचा नितान्त निवांतपणा शद्वांकित करणारी त्यांची कोमल अभिव्यक्ति सांकेतिक प्रतिमांच्या स्पर्शापासून अलिप्त रहावी हीच एकमेव अपेक्षा! गोविंद नन्नोरे यांच्या कवितेने मर्ढेकरी शैलीचा पांगुळगाडा उसना घेतला असला तरी, त्यांची घृणा प्रामाणिक आहे हें स्पष्टपणें जाणवतें. सखोल चिंतनाच्या अभावीं या घृणेला किंचित् सवंगपणाचा वास येतो; पण कालांतराने हें टळेल असें त्यांच्या काव्यप्रकृतिवरुन वाटतें. निशा हिर्डे यांच्या तीन कवितांपैकी 'पूर्व–पश्चिम' हीच केवळ उल्लेखनीय आहे. स्त्रीसुलभ

अंत:प्रेरणेने कवियित्रीला मीलनोत्तर द्वैताची अटळ जाणीव गवसली आहे. बजरंग सरोदे यांच्या यौवनसुलभ व्यथेला आत्मविश्लेषणाचें वळण लागूं पहातें आहे, ही खूण आशास्पद आहे. त्यांच्या ओंजळीचा कंप त्यांच्या कवितेच्या कायेला बाधावा ही हार्दिक अपेक्षा. सुधाकर लोखंडे यांच्या दुसऱ्या कवितेचें श्यामल यौवन उत्कटतेचा साधासा गोकुळसाज ल्यालें आहे. रा. व्यं. निनावे यांच्या उत्कट वैयक्तिक भावनेचें रुपांतर सहजपणें भेदक सामाजिक जाणिवेंत झालें आहे, पण वास्तवतेच्या लोखंडीपणाला काव्याचा परीस स्पर्शूं शकला नाही हें दुर्दैव! कृष्णा स. चौधरी यांच्या काव्यात्म भावना आततायीपण तरीहि प्रामाणिक वाटतात, भावनेंतील काव्य कवितेच्या आविष्कारांतून मात्र हरवूं पाहतें. रामदास सेलूकर यांची कविता विपर्यस्त प्रतीक प्रतिमांच्या जंजाळांतून सुटेल तर ती तरल अनुभूतींच्या श्वासांना कैदेंतून मुक्त करील. कवि 'आनंद' यांनी भूमितीच्या मर्यादित परिभाषेंतून अमर्याद आशय व्यक्त केला आहे. वरवर पाहिल्यास काव्यशून्य वाटणारी त्यांची कविता अभिजात काव्याचें प्रमेय एका साध्या पंचकोनांतून अनपेक्षित यशाने मांडते. अभिनंदन! प्रभाकर जावरकर यांची कविता एका अत्यंत हृदयभेदक कल्पनेंत पुरेसें चैतन्य ओतायला असमर्थ ठरली म्हणून कुणाहि रसिकाला हळहळ वाटेल. अविनाश वरोकर यांची कविता भरारत्या पारव्याचे पंख छाटून अश्रूंचा अभिषेक आवरता घेईल, तरच तिला अंतर्मुख होऊन खऱ्या काव्याची गुलाबी कांति शोधाविशी वाटेल. गंगाधर सावळकर हिरवळीचा मार्ग टाळून 'न्यूनगंड' या कवितेच्या वाटेने चालत राहतील, तरच त्यांना पुढे खऱ्या कवीचा शब्द लाभण्याची शक्यता वाटते. सौ. शांताबाई दंडिगे यांच्या कवितेंतून स्त्रीसुलभ चिर–असंतोष, आंधळ्या आत्मनिष्ठेंतून जन्मलेल्या आभासमय तात्विक भूमिकेवरून सुसंस्कृत संयमाने व्यक्त झाला आहे. कृष्ण माधव यांच्या दोन्ही कवितांत काव्यगुण आहेत. भाषेचे व रचनेचे संकेत त्यांनी झुगारले नसले तरी त्यांची अनुभूति आत्मनिष्ठ व म्हणून मौलिक आहे. चाकोरीबाहेरील जीर्णतेचें शेवाळी सौंदर्य त्यांनी संयमित कलात्मकतेने उकलून पाहिलें आहे. अभिनंदन! आत्माराम भोयर यांच्या पहिल्या कवितेंत

कॅसानोव्हाची उताविळी जाणवत असली, तरी दोन्ही कवितांतून त्यांना आत्मनिष्ठेचा काव्यविषय गवसल्याचें स्पष्ट जाणवतें. पहिल्या कवितेंतील नि:संकोच शृंगार संस्कृत काव्याशी नातें सांगतो, दुसऱ्या कवितेंतील सूचक शृंगार नवकाव्यांतील पु.शि.रेगे–प्रणीत प्रवाहाशीं समांतर रेषा साधतो. नवोदिताचा बुजरेपणा झुगारणाऱ्या 'विषया' बद्दल खास अभिनंदन! प्रभा बल्लाळ यांनी विवाहोत्तर अपरिहार्यतेचे वस्तुनिष्ठ व गद्यप्राय निवेदन केलें आहे. गुलाबराव भुते यांनी काव्याविषयीं सखोल विचार करण्याची आवश्यकता आहे. आश्चर्यकारकपणें दत्ता कवीश्वर यांच्या कवितेचा पूर्वार्ध काव्यशून्य पण उत्तरार्ध नितांत काव्यमय आहे' हें अनपेक्षित मिश्रण कसें? बहुधा त्यांच्या व्यक्तित्वांतील कवि व कथाकार या दोघांमध्ये सतत संघर्ष असावा; त्याचा हा परिपाक असूं शकेल. वसंत डहाके यांची कविप्रकृति त्यांच्या कवितेंतून नि:संदिग्धपणें जाणवते, परंतु प्रतिमा व कल्पना सांकेतिक असल्याने आत्मनिष्ठेचा अभाव झोंबतो. रचनालाघव, भाषेची प्रयोजकता हीं आशास्पद आहेत. कवीने वैयक्तिक अनुभूतींचा अधिक मागोवा घेतल्यास मौलिकतेची वाटचाल सुरूं होईल. सरस्वतीतनया यांच्या कवितेंत गेयता निश्चितच आहे. विना पाटील यांची कविता केवळ ८ ओळींची आहे; पण ८० ओळींत जे सांगतां येणार नाही ते कवीने या छोटयाशा कवितेंत अत्यंत सूचकतेने व कलात्मक संयमाने व्यक्तविलें आहे. उत्कटतेचे रंग ल्यालेली ही सुंदर कविता कुणीहि सहसा विसरूं शकणार नाही. सिंधू पुरणकर यांच्या कवितेंतील लटक्या आभासाची शंका प्रामाणिक वाटते. पुरुषोत्तम वनकर यांची पहिली कविता विचारार्ह नाही, पण दुसरी कविता एक मिनीट वाचकाला अडवून ठेवते; तींतील धूसरता व अस्पष्टता हेंच कदाचित् तें कारण असेल. श्रीरामतनय यांच्या कवितेंतील केवळ शेवटलें कडवें काव्याला स्पर्श करून जातें.

आठ लघुकथांवर आपापले स्वतंत्र अभिप्राय व्यक्त करण्याचा सर्व वाचकांचा हक्क मी हिरावून घेऊं इच्छित नाही!

—राम कोलारकर.

## बोध :

–वसंत वि. साखरकर.

गाळाच्या जमिनीवर
पक्षांचे पाय राही
स्मृति–पांखरांचा थवा
हृदय–मुलामा दावी !

सुरकुत्या मुद्रेवर
काळ–वात खुणा करी
विश्वघरीं दाखवीतो
कमी आयुष्याची दोरी !!

रामप्रभू चारित्र्याचा
गंध कधी पावणार ?
थंड–उष्ण ओरड ही–
कोण्या काळीं थांबणार ?

कणसाचे ताम्र दाणे
रान–पशू टिपणार
झीजल्याचे फळ नाही
जागल्यास बोंचणार !

नितंबाच्या घटांतील
संथ पाणी झुलणार
यौवनाचा विद्युत्घट
संयमता सोडणार !!

★★

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
शाखा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थलप्रत.
काव्य......

## रात्र सुगंधी : — विजय टाकोडे.

रात्र सुगंधी ......... विरली विरली
कुशींत तमाच्या — केव्हापासून

फिकी जाहली ......... निळी घनावळ
गाती तारे — आकाशांतून

फुलूं लागलें ......... स्वप्न सृष्टीचें
रातराणीच्या — फुलाफुलांतून

हाय ! अजून ना ......... मिटे पापणी
तीच शिरशिरी — अंगांगांतून !

## श्रावण यावा — 'कृष्ण माधव'

सह्यांद्रिच्या कुशीकुशींतून
हळूच फुलावा श्रावण-वारा
गंध सुटावा जिकडे तिकडे
चराचराला मोहविणारा.

ऐन दुपारी उधळून जावा
पाऊस अवचित वळवाचा
आणि क्षणांतच विरून निघावा
जड ओलावा कोंकणचा —

इंद्रधनुचा हार धुकेरी
निळ्या नभांतून उमटावा
निखळुनी जावा आणिक
फुलराणीचा अचल थवा

रानावरती साज चढावा
लाल पांढऱ्या क्षितीजाचा
अन् श्रावणातल्या हिरव्या वसनीं
थाट दिसावा दख्खनचा.

★ ● ★

## नाते ! 'स्नेही'

भिजून निघतें सारी रात
शिशु – हास्यासवें दंवात
गारठलेला दिवस उगवतो
तारुण्याच्या दाट धुक्यांत.

उब येतां कुठे जराशी
मोहविते धूंद गुलाबी आस
हळूच मग संध्या येते
सोडवितां मंद जिवाचे पाश.

क्षणां – कणांचे जीवन येते
सत्यं – शीवंशीं जोडीत नाते !

## हळहळ ! 'स्नेही'

निळ्या नभाच्या
धुंद पाकळ्या
मधू – वनांतील
हळवी पानें
आज कितिदां
सळसळली !

काटवनांतील
विरहीण राधा
वेणुमधूनीं
सूर झिरपतां
आज कितिदां
हळहळली !!

★

## तहानंतर

— रघुनाथ हडकर.

माझ्या आणिक तवं ओठांच्या
सह्या जाहल्या आज तहावर

म्यान करूनी वाद टाकले
भांडायाचें कधि न यानंतर

चैन ना पडे; त्याच तहांशीं
परंतु झगडे माझें अंतर !

★●★

## आमुचें जीवन !

— रघुनाथ हडकर.

उरीं बाळगाव्या आम्ही कितीक उगाच आशा
मात्र शेवटी पदरीं पडे निराशेची रक्षा.

दु:खच जणुं आमच्या पांचवीला पुजलेलें
वरवर हंसण्याचें व्यर्थ जरी सोंग केले.

अन्न नाही पोटभरी पोटास बसे चिमटा
छानदार कपड्यांचा मात्र रुबाब मोठा.

जीव जाई कासावीस करतांना हाजी हाजी
खोल कोठें अंतरांत दडे उद्यांची काळजी.

जीवनाच्या वाळवंटी आम्ही मुशाफिर वेडे
पसरले मृगजळ मृगजळ चोहिंकडे.

शिरीं आमुच्या जळत सदा निंदा अपमान
कसलें आंम्ही जगतो येथें जीवन जीवन !

● ● ●

## *उपमा न या प्रितीला !* — भुजंग देशपांडे.

क्षण एक दूर जातां
हृदयांत होई काला
विरहांत राहूं कैसे ?
कोडेच एक मजला !

हृदयास खूण पटतां
कलिका फुले क्षणाला
मिलनाचे गम्य काय ? ,
उपमा न या प्रितीला !!

●

## *ललनेची ती फुंकर* 'श्रीरामतनय'

निरागस प्रेम – ज्योत
मऊ मेणाने जळते
जळलेलें गार मन
शांत सुखीं विसावते.

कसें नाजूक जीवन
आपोआप पेट घेते
ललनेची ती फुंकर
कशी वैरीण बनते ?

★ ★

## करमेना तुझ्याविण — -भगवंत ठाकरे.

नाही मिळत आम्हाला
शब्द प्रेमाचे आणिक,
आणि सत्याची उणीव
नाही मिळत भाविक —१.

आज दुरावलो आम्ही
खऱ्या जीवनापासून;
पथ उज्ज्वल आमुचा
आशा—निराशा मधून – २.

आज शोधियले आम्ही
परि 'हवे तें' मिळेना,
सांग तूंच दयाघना
मला मुळीच कळेना —३.

तुझी मूर्ति निराकार
आकर्षितें माझें मन,
माझी मलाच जाणीव
'करमेना तुझ्याविण' —४.

—:: :★: ::—

## मी कवि नाही ! —नारायण शास्त्री.

मी कवि नाही !
......मला तंग कवीचा संग आहे,
मला खमंग काव्याचा उमंग आहे;
कवीचे माझ्यांत ढंग आहे......

तरीहि......
मी कवि नाही !
फक्त मला अभिमान आहे.......
खरंच मी कवि नाही !!

## दवांत भिजली वाट रेशमी विजय टाकोडे निवान्त उत्तररात

दवांत भिजली वाट रेशमी
डोंगरमाथा मनांत हंसला
मधुमाली त्या तरूंभोवती
फेर धरूनी निर्झर घुमला. १.

दूर कुणाचें गीत विसावें
पापगीच्या पंखा आडून
आणि चाटुनी स्तब्ध शांतता
जळांत जाई वारा गोठुन. २.

पाठशिवणीहि विरूं लागली
नळचाकांठच्या छायामधली
शेंड्यावरती घेई मधूनच
पक्षी कोठून तान एकली. ३.

पाहून मोहक रूप सष्टीचें
कळस दूरचा मान वाकवी
पसरूं लागली क्षितिजकडेवर
लाली उषेची गंधित हळवी. ४.

दवांत भिजली वाट रेशमी
अपुल्या धुंदीत उभा किनारा
आणि गारव्या भधुनी घुमला
थरथरणारा शुभ्र मोगरा. ५.

सृष्टा स्तब्ध झाली
रात्रीच्या कुशीत
निवान्त उत्तररात.

अजून आहे भास
स्वप्नांच्या सृष्टींत
निवान्त उत्तररात.

अजूनही उरे नीज
निर्मल जल लहरींत
निवान्त उत्तररात.

विखुरला प्रकाश
विरले तारे त्यांत
निवान्त उत्तररात.

अजून पानें स्तब्ध
निजला आहे वात
निवान्त उत्तररात.

दवबिंदूंचें अत्तर
शिपलें भूनींत
निवान्त उत्तररात.

अजून विरहगीत
झुरतें मनांत
निवान्त उत्तररात.

---

# जीवनाच्या बाजारांत

गोविंद नन्नोरे

भाऊबिजेच्या वृषभशिंगा
बंधुप्रितिचा लावे बेगड
प्रणयतोरणीं उभे राहण्या
झूल रूढीची घाले अवघड १.

नजरेची ती चालली दिंडी
यौवनमद तो कुटतो टाळ
सौंदर्याच्या पालखी मागे
वासना ती खेळे खेळ २.

अतृप्तिच्या महादेवा
उन्मादाचा चाले पोहा
धार्मिकतेच्या दरीकपारी
चंचलतेचा गनिमी कावा ३.

तारुण्याच्या पवित्रक्षेत्रीं
अनाथालय ते भावाचे
लोकलज्जा देई दान
बाळ नव ते विवेकाचे ४.

पंडे वसले मोहकतेचे
बुद्धिचे ते करण्या मुंडन
पिंड पाडुनी हृद्–प्रेमाचे
मानवतेचे करती तर्पण ५.

कल्पनेचा बुद्बुदा स्वर्ग
ज्याच्यासाठीं श्रद्धा झुरते
जीवनाच्या बाजारांत
ती स्वार्थाला खुशाल वरते ६.

●

# जीवन ज्योत

गोविंद नन्नोरे

असहायतेच्या फांदीवरती
जीवनाचे झुलते फूल
कधी आशेचा सुटतो वारा
निराशेची उडते धूळ १.

संघर्षाच्या वनवासांत
कधी सोन्याचा दिसतो मृग
इच्छा दबली सीतेवानी
धाव म्हणते त्याच्या माग २.

शक्ति पणाला लावुनी पळत
मृगजल ठरते सारे कांहीं
प्रयत्नाच्या पर्वताची
होऊनी जाते राई राई ३.

तेल काढणें त्या राईचे
जरी असलें दिव्य तयांत
गती नाही त्याविन दुसरी
जीवनाची जाळण्या ज्योत ४.

●

## पांखरूं होऊन इवलें

निशा हिर्डे

कधी वाटते असें मला की--
भारत अवघा नयनीं पहावा
वृंदावन मथुरेचें दर्शन
जिथे नादला मंजुळ पावा १.

क्रांति जहाली जिथें, गर्जले
पावन झांशीच्या किल्ल्यावर
कंकण–नादा दूर सारूनी
धडाड् खण्खण् मर्दानी सुर २.

बुरख्यामधली चटकचांदणी
पण दाखवले आप मोगला
त्या भूमीचें दर्शन घ्याया
मन–मयूर हा नाचूं लागला ३.

टपटप टापा शिव–अश्वाच्या
जिथे गाजल्या त्या भूमींतच
जन्म जाहला परि न पाहिलें
अजुनी नयनीं पवित्र तें रज ४.

जिथे नांदले रजपूत राजे,
उलथून सत्ता मोंगल आले;
सागर लंघुन गोरे आले
चोरावरती मोर जहाले ५.

पांडव, रजपुत, मोंगल, गोरे
सारी सुत्रें हलती जेथें
त्या दिल्लीतें अवलोकाया
मन–सागरीचें तारू भडकतें. ६.

पांखरू होऊन इवलें वाटे--
घेत भरारी अंतराळी या
फिरत रहावें जन्म–जन्मवर
भारत–भूमी [illegible] पहाया ७.

## पूर्व पश्चिम

निशा हिर्डे

एक काळ असा होता
तुझी माझी ओळख नव्हती
तूं कसा ? मी कशी ?
नजर–भेट तीही नव्हती
एक काळ असा आला
तुझी माझी जोड झाली

'मी' पण सारे विलया गेले
तुझी माझी तोड झाली
एक काळ असा आला
'मी' पणा घेऊन आला
तुझें माझें बिनसूं लागले
तूं पूर्व मी पश्चिमेला

## व्यथा

बजरंग सरोदे

विजेचे काहूर
निळच्या अम्बरांत
माझ्या अन्तरांत
व्यथा तुझी. १

वनांतून गर्द
भरे अन्धःकार
माझेहि मानस
तुझ्यामुळे. २

तार ती भंगता
थांबवी झंकार
तुझ्यावीण सुर
लुप्त माझा. ३

हिमगिरी तेजे
करी तगमग
मनांत वियोग
तुझ्या पायीं ४

कंपित ओंजळ
जैशी जल सांडी
तैसी तनू सोडी
पाहे आत्मा. ५

दीप विझविता
पतंगाला व्यथा
माझी तीच कथा
कशी सांगू. ६

## धुंदी

बजरंग सरोदे

यौवनाची धुंदी
चढते पर्वत
कांपिते तृणाला
आशेची कर्वत ! १

यौवनाची धुंदी
करिते संघर्ष
होऊन बेहोष
मनीं लुटे हर्ष ! २

यौवनाची धुंदी
स्फुंदते अंतरीं
पाहूं लागे अंति
डोंगर–कपारी ! ३

## मनाच्या सुपांत

रामकृष्ण देशमुख

कलिजांतील विचारांचा
साठा काढला जेधवा
आणि पाखडलें तें
असत्याची धूळ
निघाली त्यांतून
मग शोधले त्यांतों ।
सत्व उरले सुविचाराचें
थोडे...! फारच थोडे...!
वेगें तै मनीं शिरलें
अहिंसा, सत्य, शांतीचे
मज्जन झालें !
स्वार्थाला शृखला,
द्वेष, निंदा जाळावें.
करावा वांटे नंतर
सौजन्याचा व्यापार
पण ?—
हे विचाराचें सत्व
ही दैवी पथ्य
कोठून होणार !
कितीहि पाखडले तरी
न मिळे निकोप
मानस जीवन.
मनाच्या सुपांत
अविचारी फोल
आधी येते !

## चिता

भयभीत काळी रात
धडकते मार्दव अूर
गाळतो टिपें कैक
द्रूम नवठा एक.

पहाडाच्या कुशींत
खेळतें काहूर
हौसेने विनाश
डोलवितो मान,
झोपेंतून चेतविलें
लगतचे रान.

अुसासे फेकीत
होते त्याचे काळीज
वन्हि भेदला तदा
मोक्ष प्राप्ती झाली कुणा ?

स्फुंदत...स्फुंदत...
मृत्यू फेकीं करपाश,
कोलमडून धरतीवर
नि:श्वास श्वसन
धडकते चिता
वृक्षाची एका.

★

# जगा वेगळी सृष्टि अमुची

भरतकुमार रघुवंशी

जगा वेगळी सृष्टी अमुची
सकल विश्व हे अमुचे अंगण
नसे खंत ही अम्हा कुणाची
दोन जीवाचा आहे संगम १.

कुरूप असो वा स्वरूप असो ते
सुंदर गमते सदा मनाला
दो पंक्तींनी उज्वल करती
मनांत येता, अंधाराला २.

सदनाला स्वर्गाचा दर्जा
रूदनाला हर्षाने भरतो
आनंदी आनंद करोनी
हृदयाला प्रीतीनें भरतो ३.

निर्जिव त्या आकृतिला देतो
जीवनाचे सर्वस्व जगाया
मृत्युला आवाहन करतो
अमरत्वाची सैर कराया ४.

क्षणांत हंसतो, क्षणांत रडतो
आयुष्याचा खेळ घडवितो
सहजा सहजी जीवन जगण्या
प्रयत्न करतो, शिकस्त करतो ५.

सौख्याचे भांडार उघडुनी
दु:खाचे परिमार्जन करतो
प्रेमाचे साम्राज्य स्थापुनी
दुष्टांचा संहार करवितो ६.

केवळ आहे कवि–कल्पना
जगणें मरणें दैवा हाती
दोन दिसाचे आहे जीवन
धीर धरा अन् व्हा पुढती ७.

★

# चातक

शंकर काळे

स्वातीविण दुसरें पिणार नाही पाणी !
घनघोर गर्जु द्या आकाशीं मेघांना,
येउं द्या मृगाच्या चंचल जल धारांना,
बेफाम वर्षु द्या अवघ्या नक्षत्रांना,
नाचुं द्या हस्तीही कनकादि चरणांनी
स्वातीविण दुसरें पिणार नाही पाणी !
दुग्धासम सुंदर शुभ्र जलावेगांत,
बेहोश वाहुं द्या सरितांना गर्वात
स्वच्छंद उडूं द्या निर्झर फेंक पुढच्यांत
दंवबिंदू दिसूं द्या माणिक मोत्यावाणी
स्वातीविण दुसरें पिणार नाही पाणी !
डोंगराएवढया निळया निळया लाटांत,
सन्मूख खेळुं द्या विशाल सागर सात
लक्षावधी मानस मांडूं द्या आकांत
जान्हवी वाहुं द्या धुंद पुढे येवोनी
स्वातीविण दुसरें पिणार नाही पाणी !
तो एकच तारा समोर ध्येयाशांचा
त्यापुढें क्षुद्र हे ! दिमाख क्षुल्लक ह्यांचा
उगवेल खास सोन्याचा दिवस उद्याचा
भक्षील काय तृण सिंह उपाशी म्हणुनी ?
स्वातीविण दुसरें पिणार नाही पाणी !
ती युगायुगाची तहान करण्या शांत
साधनेंत करितो आराधन दिनरात
मी तृषार्त जोंवर नाहि युगांना अंत
वर्षान्ति पडलें चोचींत बिंदू गिळुनी,
स्वातीविण दुसरें पिणार नाही पाणी !

# श्रम वैभव

शंकर काळे

श्रमबिंदु जिथें गळतात, तिथें--
स्वर्गीचें वैभव नांदतसें !
कल्पलता फुलतात अगणीं
पदोपदीं पारस, चिंतामणि
कामदुधा असतात बांधुनी
स्वर्गंगा सदनी वाहतसें !
ऐरावत दारीं झुलतात
लाखो नंदनवन खुलतात
पारिजात किति दरवळतात !
गंधाढ्य समीरण खेळतसें !
सळसळतीं पाचूंचीं शेतें
मणि–कनकाचें पीक बहरतें
इंद्रनील–आरास लहरतें
मोत्याची माया हासतसें !
रत्नदीप जळतात निरंतर
पाझरती अमृत रस निर्झर
निनादती मंगलमय सुस्वर
आनंद भैरवी गाजतसें !
प्रारब्धाला बोल कशाला ?
मोल श्रमाचें कळले ज्याला,
वश सारी संपदा तयाला
पदतळीं यशःश्री लोळतसें !
स्वर्गाची अन् स्वर्ग सुखांची,
व्यर्थचि [illegible] आस तयांची
जगीं [illegible] [illegible] कशाची ?
तों डोंगर दुरुनी रम्य जसें !

## पाणवठा

सुधाकर लोखंडे

यमुनेच्या त्या पाणवठ्यावर
उभेच एकलें श्यामल यौवन
ऐकण्यास परी अती उत्सुक
गोपीकांचे मंजुळ पैंजण. १.

बुडले जलघट, निघे बुडबुडे
घुटमळति गोपि किंचित क्षणभर
वेध घेऊनि सभोंवतालीं
नेत्र शोधती सारा परिसर. २.

'डबक, डबक !' ठेका धरुनियां
डोले जलधर माथ्यावरती
दोन करांच्या सामर्थ्यावरी
जीवन नाचे तालावरती. ३.

कुठूनच येई खडा नेमका
अन् झरझर वाहे जल सारें
उभा ठाकूनि क्षणांत पुढती
माधव सोडी हास्य फवारें. ४.

यमुनेच्या त्या पाणवठ्यावर
नदीकांठच्या त्या घाटांवर
असेच होते चालत अविरत
खेळ मुकुंदाचेच मनोहर. ५.

*

## तुझ्या दर्शनाला राया

सुधाकर लोखंडे

तुझ्या दर्शनाला राया
जीव माझा वेडावला
अन् मीलनाला सख्या
जीव अति व्याकुळला. १.

झाला एक मास मज
गोकुळास सोडण्याला
भासे एक साल आज
प्रिया तुझ्या विरहाला. २.

तुझ्या विरहाच्या कळा
आतां नाही सोसवत,
तुझ्याविना राया आतां
मला नाही राहवत. ३.

तुला भेटण्यास आज
द्विज गतिनेच यावें
कर पाशांतच तुझ्या
वाटे समाधीस्थ व्हावें. ४.

# चिंता

राजाभाऊ निकम

चांदण्याच्या चांदरात्रीं
निस्तेज किती चांदण्या
शशिराया भेटावया
आतुर नभीच्या राण्या १.

चंद्र कसा नाही आला
आकाशीं खेळ खेळाया
का ग राग आला तया
झाले काय चंद्रराया २.

तळपती मनामधीं
चंद्रमूर्तीला भेटण्या
व्हाया भेट एकदाच
उत्सुक सर्व चांदण्या ३.

चांद्रण्याच्या शुभ्र रात्रीं
आल्या सत्वर गगनीं
खेळ खेळावया मनीं
गोळा झाल्या सर्व जणीं ३.

जाता लक्ष पश्चिमेला
लक्ष वेधि लाल प्रभा
स्वागताला धाव घेती
करूनि मंडप उभा ५.

येता चंद्र आकाशांत
शतशहा चंद्र–कांता
पाहतांना चंद्र–बिंबा
हरवली अवघी चिंता ६.

★

# दोन घडीचा डाव

भरतकुमार रघुवंशी

दोन घडीचा डाव....!
क्षणांत हंसते, क्षणांत रडते...
'जीवन' याला नांव ।।धृ०।।

अफाट अशा खोल सागरीं
आयुष्याला भरती ये जरी
वादळ होई क्षणोक्षणी ते
...डुलते तरीही नाव १.

शुभ्र चांदणें नित पुनवेला,
तरी क्षितीं येते चंद्राला
लपंडाव हा आयुष्याचा
...'जीवन' याचे नांव २.

रहाट फिरते; आयुष्याचे
सौख्य कधी अन् दुःखही यायचे
दैवाने हा खेळ मांडला...
... नसे कुणाला ठाव ३.

## शिलांगणाचे सोने

भरतकुमार रघुवंशी

मी शिल्पकार बनुनी, निर्गुण आणि निराळी
कोरियली त्रि–मूर्ति तिज तेज चंद्रिकेचें ॥ धृ ॥

प्रस्थापुनी हृदीं मी पूजीत सू–मनाने
तव पूज्य गायनानें, मन हे प्रफुल्ल नाचे

बहु चांदण्या नभीच्या, अन् चांदवा वरीचा
म्या ओतिलें खिळोनी...निज तेज सकळीकांचे

ती पीत–रम्य किरणें, मधु–गंध चंदनाचा
विलसे सदा सुवर्णी, स:तेज भास्कराचे

आदर्श, पूज्य भावें, म्यां आणिलें मनीचें
घे गोड गोड करुनी, सोने शिलंगणाचें.

★

## मातृ वियोग

प्रल्हाद पाटील

मज नको राज्य देवाचे
नको स्वर्गीची ती पुण्याई
परि हवी वाटे जन्मभर
जन्मदाति माझी आई !

आठवितां आईचे सुख
आणि तिचा तो गोड लळा
नकळत नयनी येते पाणी
शब्द फुटेना अन् दाटे गळा

तुजविण जग वाटे भकास
उदास दिसती दिशा दाहीं
मी या जन्मी तव जन्मदाते !
सांग कसा होऊं उतराई...?

## शिंपल्यांचा खेळ

भरतकुमार रघुवंशी

शिपल्याचा खेळ सखये ! खेळलो वाळूवरी
भावनांचे गोड घरटें बांधिलें, हृदयांतरी ।। धृ ।।

धुंद झालो पाहुनी, ती लालिमा क्षितिजांतली
पृथ्वी मिलनाच्या परी ते क्षितिज खुललें अंतरी
वाळूचे बनवूनी घरटें, कोरिल्या आशा मनीच्या
रंगलो दोघे मिळोनी, चित्त हे मारी भरारी.

जीवनाची भव्य प्रतिमा, भावनांचा मेळ तेथें
मीलनाचा ध्यास धरला, तूंच पे मम बावरी
बिलगुनी बसलो पहाया नियतीचा हा खेळ असला
मानसाच्या सागराला एक आली ती खुमारी
खेळ होतां चालला अपुला तिथे हा गोडसा
तोच लाटा आंत शिरल्या घरकुलाला त्या थरारी

भरतीची लाट येतां धावले पाणी मिळोनी
जीवनाची आंस धरुनी, शीघ्र ते आले किनारीं
धावलो सोडूनी घरटें, तें चिमुकलें भंगले
पण स्मृतीचें घट्ट जाळे, गुंफले मम अंतरी

●

# शाश्वत वैभव

रामकृष्ण देशमुख

सृष्टि सखीचे, सांगू तुजला
वैभव अविरत ?
प्रतिभेला हो दृग्गोचर जें
गाऊं तें गीत १

ओहोळांच्या मार्दव ओठीं
चंचल जल नाचे
नाच नाचतो मयूर रानीं
आरव रव साजे २

उद्यानाची अत्तरदाणी
सौरभ त्यांत भरे
भू–शागीर्दच मारुतराणा
मंद मंद विचरे ३

वीणेचे या अनंत सुस्वर
विहंग गान करी
तित द्रुमदलीं स्कंधावरती
वायू ताल धरी ४

इंद्रधनुचे झुंबर व्योमीं
सप्तरंगीं विलसे
आकाशाच्या नील तटावर
शृंगारांत हसे ५

वक्षस्थळ हे गौरीशंकर
साध्वीचे यौवन
हैम दुग्ध चंदेरी वाहे
संथ संथ करून ६

दिवस नेत्र या नवराणीचे
सोनेरी प्रखर
काजळ घाली रंजूताई
झोपे रविकर ! ७

ग्रीष्म करी उल्लींग हिला अन्
वर्षा घाली स्नान
शरद नेसवी वसन शुभ्र तर
हेमंत दव–मौक्तिक लेण ८

शिशिर घेऊन येई सर्वदा
मेघांची वेळ
वसंत घेई चुंबन प्रेमें
इष्काचा काळ ! ९

सृष्टीचा शृंगार असा हा
विभवांचा थाट
प्रतिभेला हो दृग्गोचर जें,
गाऊं तें गीत. १०

★

# कारकुनाची जीवन गाथा

रा. व्यं. निनावे

लगबग घाई ऑफीसाची ! घांस कोंबुनी चार कसे,--
शमवायाला क्षुधा घराची काम कराया जात असे !

नांदे लक्ष्मी दोन दिवस ती ! सदा नांदते दरिद्रता
तरीहि शिकवी मुलां–मुलींना चिमटे घेउनि तो पोटां !

मुलगा म्हणतो, "सदरा गेला ! जोडा नाही, पँट हवी"
मुलगी म्हणते, "चपला नाही ! झंपर, साडी नवी हवी"

"तेल संपलें ! साखर नाही ! भाजी कसली करूं वदा ?
साडी मजला कधी घ्याल हो ?" म्हणते त्याची प्रियंवदा

पँटाला तें ठिगळ लागलें ! जीर्ण फाटका शर्ट पहा !
जोडयानें तें तोंड वासलें ! स्वत: बिचारा कसा पहा !

तूप कोठलें ! दूध मिळें तें–जलांत मिसळुनि दुग्ध–भुगा !
मिळेल त्यांवर तुष्ट बिचारा ! घरांत राही उगामुगा !

येतां पहिली तारिख पत्नी खूष बिचारी मनीं असे !–
"याचें देणें, त्याचें देणें" पती बोलतां चूप बसे !

"जीवन याचें सुखी मजेचें !"–लोकांची ही भूल असे !
चिंतेच्या नित नव तंतूंची मनांभोंवती झूल असे !

स्वप्नीं सुध्दा चित्र उद्यांचें !–"काय करावें ? कसें करावें ?"
काया, मन हीं असेंचि झिजवी ! चिंता निशिदिनीं तयासवें !

वेतन दावी उसनी आशा, धैर्य बळेंची नवें नवें !
"काल नकोसें जीवन" आता पुन: वाटतें हवें हवें !

देशाचा तो सच्चा सेवक ! तरीहि लोकीं 'टीका–माला' !
साही सारें ! अंगी बळ ना ! कान तेंवढे ऐकायाला !

कारकुनाची करुणामय ही जीवनगाथा अशी असे !
जीवन ?–छे: ! –हें "ताडन, पीडन, स्पंदन, क्रंदन आर्त असे !"

# मी आई बनलें !

भरतकुमार रघुवंशी

मम भाग्य आज फळलें !
जन्म देऊनी बाळा ! तुजला, मी आई बनलें धृ०

अमर ज्योति मम प्रीतीची
सखया भंवती तेवत साची
तुवांच दिधला प्रकाश तिजला,...
नंदनवन खुललें १

मम हृदयाचा अंश अंश तूं
मम प्रीतीचे गोड प्रतीक तूं
मम जीवनाच्या उद्यानांतील, ...
पुष्प जणुं फुललें २

आई ! आई ! गोड हांक ती,
घालीत फिरशील माझ्या भंवती
उचलुनी घेईल 'गोंडस पापा' ...
अमृत जणुं प्राशिलें ३

खेळ खेळणें, बागडणें तें
मना मोहवी, अति सुंदर ते
तव क्रीडांतरीं रंगुनी नाते ...
इंद्रपुरीस पाहिले ४

"कर्तव्य नच हक्क ! संगोपावें
हर्षभरें वाढवीत न्यावें! !"
मोठा होऊनी, अभिमानाचा,...वृक्ष जणुं हा डुलें ५

# आज नवनवें गीत पाहिजे!

लक्ष्मीकान्त कुरोडे

आज नव नवें गीत पाहिजे
गीता मध्यें जोम पाहिजे
मरगळलेल्या मनुजामध्यें
नवचेतन अन् नवसंजीवन
ओतिल असे काव्य पाहिजे
पिचलेल्या मनगटांचे
पंजर छातीचे गालफडे अन्...
कुरतडलेल्या मिशांचे तरुण (?) ... छें!
चालते बोलते सांपळेंच ते!
(पण रस्तोरस्तीं दृश्य हेंच तें)
...आज पाहिजे–
दगडी छातीचें, लोहसम बाहूंचें–
पोलादी मनगट अन् सिंहाच्या नजरेचें–
मर्द मनाचें जवान निर्मिल
अशा कसाचें काव्य पाहिजे
आज नवनवें गीतं पाहिजे!
पतीत पावन श्रीरामाचें–
शक्तिशालि त्या हनुमंताचें–
बन्धुत्वाचें–आदर्शाचें–
प्रतीक असे काव्य पाहिजे!
काव्य पाहिजे शिवरायाचें,
हिंदुत्वाच्या प्रखर दीप्तिचें।
सत्तावनचें समग्र दर्शन–
घडविल असा भाव पाहिजे
आज नवनवें काव्य पाहिजे!
आज नवनवें गीत पाहिजे!!

# ‘दोन साक्षी’ 

**–प्रभाकर बेंद्रे**

‘ धर्मा पाटील ’

“ ईश्वरसाक्ष खरं सांगेन, खोटं बोलणार नाहीं. माझं नाव धर्मराज लखू पाटील. माझं वय ३७ वर्षाचं आहे. मी इंटरपर्यंत शिक्षण घेतलेलं आहे. वयाच्या २० व्या वर्षी मी मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झालों. कॉलेज शिक्षण घेण्याची माझी फारशी इच्छा नव्हती. शिक्षणाकडे लहानपणापासूनच माझें दुर्लक्ष होतें. मला चित्रकलेचा व शिल्पकलेचा अत्यंत नाद आहे व लहानपणापासूनच म्हणजे वयाच्या १० व्या वर्षांपासूनच मी सुंदर सुंदर चित्रें काढूं लागलो होतों. तसेंच मातींच्या, लाकडांच्या, कागदाच्या अशा मूर्तीहि मी लहानपणापासूनच तयार करीत होतों. मॅट्रिक झाल्यावर मी चित्रकलेचें अगर शिल्पकलेचें पुढलें शिक्षण घ्यावें असें मला नेहमीं वाटे, परंतु माझ्या वडिलांची लखुनाना पाटलांची तशी इच्छा नव्हती. त्यांनीं मला सांगितलें होतें—‘ धर्मा, तूं कॉलेजशिक्षण पूर्ण कर. आपल्या पाटील घराण्यांत शिकला सवरलेला मुलगा कुणीच नाहीं. तूंच आपल्या ४ पिढ्यांत पहिला मॅट्रिक होय. तूं एम. ए. पर्यंत शिक्षण घेऊन सुशिक्षित व सुविद्य हो. तूं कॉलेजांत प्रोफेसर व्हावेस असें मला वाटतें. तुझ्या शिक्षणासाठीं भरपूर पैसा दैवयोगानें आपणांस मिळाला आहे. शिक्षण सोडूं नकोस. खूप खूप शिक तूं व मोठा हो,’ मी मॅट्रिक झालों त्यावेळीं वडिलांनीं केलेला हा उपदेश मला पटला नव्हता. परंतु वार्धक्यांत त्यांना दुखवूं नये, त्यांची इच्छा पूर्ण करावी, त्यांच्या मनाला समाधान द्यावें, याच हेतूनें मी कॉलेजांत प्रवेश केला. मी कसा बसा पहिल्या वर्षी कॉलेजपरीक्षा पास झालों. कॉलेजांत बसल्या बसल्या मी माझ्या चित्रकलेच्या वहींत वर्गातील मुलींचीं, मुलांचीं, प्रोफेसरांचीं, रेखा चित्रें काढीत असे, उत्कृष्ट चित्रकार म्हणून माझी ओळख कॉलेजांतील विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनींना

झालेली होती. पहिलें वर्ष मी मोठचा मजेंत काढलें. मी इंटरमध्यें गेलों. त्याच वर्षी माझ्या वडिलांची प्रकृति बिघडली. त्यांचे वय त्यावेळी ७० चे आसपास होतें. त्यांच्या डोळचांदेखत माझें लग्न व्हावें अशी त्यांची फार फार इच्छा होती.

मी इंटरचे वर्गात नुकताच गेलेला. पहिली तिमाही परीक्षा नुकतीच आटोपलेली. तोंच वडील अत्यंत आजारी असल्याचें पत्र मला मिळालें. मी तांतडीने माझ्या गांवीं बाभूळवाडीला आलों. वडील खूप थकलेले होते. शेतीवाडीचीं कामें माझा धाकटा भाऊ सख्या पाहत होता. वडिलांची ती केविलवाणी स्थिति मला पहावेना, त्यांचे डोळे खोल गेलेले होते, शरीराचीं सारीं हाडं दिसू लागलीं होतीं, नसा अगदी ओढल्यासारख्या व लुळचा पडलेल्या होत्या. चेहरा खिन्न झालेला, आवाज खोल गेलेला. मला जवळ बोलावून डोळचांत पाणी आणून त्यांनी मला सांगितलं, "धर्मा, आतां मी फार दिवसांचा सोबती नाही. ही जमीन, हा छोटेखानी बंगला, मळे, शेती, सारं सारं मी तुझ्या नांवावर करून देतो. तू आतां या इस्टेटीचा मालक. पिढचान् पिढचा आपल्याकडें ही इस्टेट चालत आली आहे. जवळ जवळ १।। लाखाची इस्टेट आहे आपली. तिचा नीट सांभाळ कर, तुझ्या भावाला—सख्याला सांभाळ, आणि माझ्या डोळचादेखत गणा पाटलांची मुलगी रुपा हिच्याशीं लग्न कर. तुझ्यासाठीं मी रुपाला पसंत केलेली आहे. तू नाहीं म्हणूं नकोस. रुपा, रूपानें, वयानें, व शिक्षणानें तुला योग्यच आहे. ४ बुकं शिकली आहे ती. शरीरानं कशी मजबूत आहे. तूं लग्न कर लवकर."

मी वडिलांच्या शद्बाला मान दिला. ४–६ महिन्यानींच माझं लग्न झालं. रुपा माझी पत्नी बनली. त्यावेळीं माझं वय २२ वर्षाचं होतं. मी इंटरच्या परीक्षेला बसलों. व कॉलेज सोडून बाभूळवाडीला आलों. माझं लग्न होऊन ५–६ महिने होत नाहींत तोच वडिलांनीं इहलोक सोडला. मीं खूप खूप रडलों, मला खूप वाईट वाटलें.

सख्याचेहि शिक्षणाकडे लक्षच नव्हते. त्याला मी शेतीच्या कामास बांधून टाकले. मीं इस्टेटीची सर्व कामें बघून बाभूळवाडीस रहात्या बंगल्यावरच राहूं लागलों. शेती, बागबगीचे, बंगला, मळे–खूप खूप इस्टेट होती माझी, मीं व रुपा आनंदानें संसार करूं लागलों. पण दैवाला माझं सुख पाहवलं नाहीं ! लग्न होऊन ४ वर्षं झालीं नाहींत तोंच रुपा कॉलऱ्याच्या साथीला बळी पडली. मी विधुर बनलों. दुःखानं, तळमळीनं, वैतागानं मी आणखी ५–६ वर्षं काढलीं. आतां मी ३२ वर्षांचा झालों होतो. दुसरं लग्न करण्याची माझी इच्छा नव्हती. पण चांगली मुलगी आली तर लग्न करावं असं मी ठरविलं होतं.

दोनचार मुली मी पाहिल्याहि, परंतु मला कोणतीच मुलगी पसंत पडेना. सकाळीं जावें, दुपारीं थोडी विश्रांती घ्यावी, सायंकाळी जवळपास जाऊन चित्रें रेखाटावीं असा उद्योग करीत मी दिवस कंठू लागलों. आणखी ३ वर्षं निघून गेलीं.

आणि एके दिवशी आमच्या बंगल्यातील मागील दोन खोल्यांत एक विवाहित जोडपें राहावयास आलें. दौलती पाटील व त्यांची पत्नी यशोदा हेंच तें जोडपें. दौलतीला तलाठ्याची नोकरी होती. गांवोगांव तो नेहमी भटकत असे. दौलती माझ्यापेक्षां १–२ वर्षांनी मोठा असावा. त्याला ३९ वें वर्ष असावें व त्याची पत्नी त्यावेळीं २५ च्या घरांत होती. दौलतीचा एक धाकटा भाऊ हैबतीहि त्यांच्याबरोबर होता. हैबती १० वर्षांचा होता.

दौलतीला मी माझ्या घराचा मागील भाग रहावयास दिला. हैबती शाळकरी पोरगा असल्यामुळे तो नेहमीं शाळेंत असे व दौलती कामानिमित्त नेहमींच परगावीं असे. घरांत एकटीच यशोदा असे.

यशोदेचा स्वभाव मोठा विनोदी, थट्टेखोर व प्रेमळ होता. ती ऐन तारुण्यांत जरी नव्हती तरी मूलबाळ कांहीच नसल्यामुळें नवतरुणी-

सारखी अत्यंत चपल व आकर्षक होती. तिचें शरीर पिळदार होतें, रंग सावळाच होता परंतु त्यावर तारुण्याची कांति होती. केस काळेभोर व लांबसडक, चेहरा वाटोळा व नेहमीं हंसरा, तिचें शरीर अत्यंत लवचिक व आकर्षक होतें. माझा स्वभावहि बोलघेवडा असल्यामुळें माझी व यशोदेची लवकरच मैत्री जमली. माझा धाकटा भाऊ सखाराम शेतावर असे, दौलती बाहेरगांवीं असे. हैबती खेळण्यांत व शाळेंतील अभ्यासांत दंग असे. संपूर्ण बंगल्यांत फक्त मी व यशोदाच असे. घरांतील काम आटोपून यशोदा माझ्या खोलींत येई. मी देखणा असल्यामुळें यशोदा माझ्यावर भाळली होती, तर यशोदा सुंदर असल्यामुळें मीहि तिच्यावर आकर्षित झालों होतों, बंगल्यांत आम्ही दोघें हंसत असूं, लपंडाव खेळत असूं, गप्पागोष्टी करीत असूं. आमचा वेळ मजेंत जाऊं लागला. मैत्रीचें रूपांतर प्रेमांत झालें. यशोदेवर मी नकळत प्रेम करूं लागलों. तिचें बोलणें–हसणे, चालणें, रुसणें फुगणें सारें मला अधिकाधिक आवडूं लागलें. तिच्यावांचून मला करमेना व तिलाहि माझेवांचून करमेना. आम्ही दोघे एकमेकांवर प्रेम करूं लागलों.

यशोदेच्या मुसमुसलेल्या तारुण्यानें मी धुंद होऊं लागलों. माझ्याकडे यशोदा वारंवार येऊं लागली. तासन्‌तास ती माझ्याजवळ बसून गप्पागोष्टी करूं लागली. दौलती–आपला पति–जिवंत असतांना, त्याच्या नकळत आपण परक्या पुरुषाबरोबर प्रेमाचे चाळे करीत आहोंत याचें तिला कांहींच वाटेना. मीहि तिच्या वासनांना उत्तेजन देऊं लागलों. तिच्या लावण्यानें व तारुण्यानें मी तिच्या पूर्ण अंकित झालों.

मला दौलतीची भीती वाटू लागली. दौलतीला ही गोष्ट माहित नव्हती. दौलती आठ दिवसांनीं घरीं येई, एखादी रात्र काढी व निघून जाई. दौलती दिसण्यांत अत्यंत कुरूप होता. त्याच्या एका डोळ्यांत वडस होतें. चेहरा सर्व देवींनीं भरलेला होता. रंग काळा ठिक्कर होता. त्यांत गालाचीं हाडं वर आलेली, दांत किडके व शरीर दुर्बल. नवरा म्हणून यशोदेला त्याच्याबद्दल आपुलकी वाटत नव्हती. दौलतीचा

स्वभावहि भारी तापट व संतापी होता. घरीं आल्याबरोबर तो यशोदेला हिडीस फिडीस करी. तिला अवाच्य शिव्यांची लाखोली वाही. तिच्या अंगावर काठीचे वार करी, तिच्या अंगावर भांडीं फेंकून मारी. त्यांचें दोघांचें कधीच पटत नसे. पति–पत्नी हे त्यांचें खरें नातें असूनहि वैऱ्याप्रमाणें ती दोघ भांडत. गेल्याच महिन्यांत त्यांचें कडाक्याचें भांडण झालें होतें. दौलतीनें यशोदेला खूप झोडपलें होतें. बिचारी यशोदा ! सारी रात्र ती तळमळत होती, स्फुंदून स्फुंदून रडत होती.

लग्न होऊन ८–१० वर्षं झालीं होतीं. परंतु दौलतीपासून यशोदेला मूळबाळ कांहींच झालेलें नव्हतें. दौलती शरीरानें दुर्बल असल्यामुळें यशोदेच्या वासना त्याच्याकडून कधीच तृप्त होत नसत. मुलासाठीं यशोदा सारखी तळमळे. दौलती पुरूष असून यशोदेला हवें तें सुख देऊ शकत नव्हता. तशांत घाणेरड्या रोगाने तो पछाडला असल्याचें मला कळलें होतें तरी पण यशोदा त्याच्याशीं संसार करीत असे. तिच्या मनांतून दौलती उतरलेंला होता. पुरुषाचें सामर्थ्य, कर्तृत्व, धडाडी, प्रेम, उन्मादकता, हे सारें सारें दौलतीजवळ नव्हतें. यशोदेला पुरुषाची उन्मादकता व धडाडी हवीं होती. पति म्हणून दौलतीबद्दल तिला केव्हांच माया, श्रद्धा व प्रेम वाटलें नाही.

तिनं एकदोनदा, माझ्या बंगल्यावर येण्यापूर्वीच त्याच्याशीं घटस्फोट घेण्याचे विचार दौलतीजवळ काढले होते. परंतु दौलतीनें घटस्फोट देण्याचें साफ नाकारलें होतें.

यशोदा माझ्या रूपावर, गुणावर, पैशावर व विशेषत: स्वभावावर अत्यंत भाळली होती व मीहि तिच्या मुसमुसलेल्या तारुण्यावर तिच्याकडे ओढलों गेलों होतों. यशोदेनें माझ्याशीं विवाह करण्याबाबत एकदोन वेळां मला विचारलं होतं. दौलती या गोष्टीला संमती देणार नाहीं हें मला ठाऊक होतं, मला यशोदा हवी होती, यशोदेला मी हवा

होतों; परंतु दौलती अमच्या प्रेमांत आम्हांला सलत होता. यशोदा माझ्यावर भाळली आहे हें दौलतीला हस्तें परहस्तें कळलेंच होतें व त्यामुळेंच दौलती यशोदेला अधिक छळूं लागे.

यशोदा अत्यंत करारी, तापट व खुनशी होती. ती प्रेमळ, थट्टेखोर व हंसरी होती हे खरं आहे. परंतु प्रसंगानुसार तिच्या स्वभावांतील तापटपणा, हट्टीपणा, व सूड बुद्धिहि जागृत झालेली मी पाहिलेली होती.

दौलतीची कुरूपता, त्याचें दारूचे व्यसन, त्याचा नीच व दुष्ट स्वभाव, व त्याच्या ठिकाणीं असलेला पुरुषीपणाचा अभाव यामुळें यशोदेला दौलती नकोसा झालेला होता. घटस्फोट देण्यासहि दौलती तयारच नव्हता. माझ्या व यशोदेच्या सुखांतील कांटा कसा नष्ट करावा ह्याच गोष्टीचा ती रातोरात विचार करीत होती. गेल्या ८–१० दिवसां-पासून तिचें मन ठिकाणावर नव्हतें. ती माझ्याकडे फारशीं येत नसे, माझ्याशीं फारशी बोलत नसे, तिच्या चेहऱ्यावर औदासीन्य, चिंता, व्यथा व काळजी दिसून येई. ती कसला तरी विचार करीत असे हें मी ताडलें होतें. दौलतीलाहि यशोदा नकोशींच होती. तिचा स्वभाव त्याला आवडत नसे.

यशोदेच्या या बदललेल्या मन:स्थितीचा उलगडा मला त्या रात्रीच कळून आला. गुरुवारचा दिवस होता. आकाश ढगांनीं भरून आलें होतें. विजांचा कडकडाट होत होता. सोसाट्याचें वारें सुटलें होतें. मुसळधार पाऊस पडत होता. सर्वत्र काळोख दाट काळोख पसरला होता- रात्रीचा १०–१०।। चा सुमार होता. दौलतीला दारूची हुक्की आली होती. यशोदेनं त्याला भरपूर दारू पाजली व मला वाटतें दारूच्या ग्लासमधूनच तिनें त्याला...

मला सांगतां येणें कठीण आहे. कारण सकाळीं यशोदा गळा काढून रडत होती. दौलती एकाएकी कसा गेला हें मला कळेना. मी दौलतीला

पाहण्यासाठीं गेलों. त्याच्या शरीरावर, चेहऱ्यावर पांढरे निळे जांभळे असें भयंकर स्वरूपाचें फोड झालेले मला दिसले व त्यावरूनच मी ताडलें. कीं यशोदेनं रात्रीं त्याला विष...

माझं बोलणं संपलं ! दौलतीचा खून करण्यांत माझ्यावर जो आरोप केला आहे त्याबाबत मी ही सर्व हकिगत सांगितली. मी यशोदेला उत्तेजन दिलें नाहीं. यशोदेवर मी प्रेम केलें व अजूनहि माझें तिच्यावर प्रेम आहे एवढेंच मला सांगावयाचें आहे."

'यशोदा'–

'ईश्वर साक्ष खरं सांगेन. खोटं बोलणार नाहीं. माझं नांव यशोदा दौलती पाटील. माझं वय २७ वर्षांचं आहे. बाभूळवाडीला धर्मा पाटील यांच्या घरांत रहावयास येऊन आज मला जवळ जवळ २ वर्षं होऊन गेलीं. माझा विवाह वयाच्या १४ व्या वर्षीच दौलतराव पाटलाशीं झाला. माझ्या घरची अत्यंत गरीबी होती. माझे वडील रायबा पाटील हे शेतकरी आहेत. गेल्या ५।६ वर्षांपासून शेतीचे उत्पन्न फारसं मिळत नाहीं. माझी आई मैनाबाई मी लहान असतानांच वारली. माझ्या वडिलांनीं मला २।३ बुकं शिकवलीं व नंतर घरीं ठेवून घेतलं. मला एक मोठा भाऊ आहे. गणा दादा हें त्याचं नांव. तो माझ्यापेक्षां ५।६ वर्षांनीं मोठा घरची अत्यंत हलाखीची व गरीबीची स्थिति असल्यामुळें माझ्या वडिलांनीं थोडं फार कर्ज काढून मी वयांत येतांच वयाच्या १४ व्या वर्षीच दौलतरावाबरोबर माझं लग्न लावून टाकलं. मला त्यावेळीं फारसें समजत नव्हतें. पुढें वयाच्या १६ व्या वर्षापासूनच मला समजू लागलें. दौलतरावांवर मी प्रथमपासूनच नाखूष होतें. त्यांच्या डोळ्यांतील वडस व त्यांच्या चेहऱ्यावरील देवी पाहून मला त्यांची किळस वाटे. लहानपणापासूनच मी जरा नकचढ व खट्याळ आहे. दौलतीसारखा कुरूप नवरा मला मिळाला म्हणून मला दुःख होई. त्यांच्याजवळ जाणं देखील मला आवडेना. त्यांच्या शरीराला कसली तरी दुर्गंधी येई.

मी ऐन जवानींत आलर्ये होंते. मला पुत्रप्राप्तीची अत्यंत तीव्र इच्छा होती. माझं तारुण्यानें मुसमुसणारें शरीर वासनांनीं पेट घेऊं लागलं. पुरुषाचा स्पर्श, त्याची मिठी मला हवीशी वाटूं लागली. पण याचवेळीं मला कळलं–

दौलतराव घाणेरड्या रोगानं पछाडलेले आहेत ! मला अत्यंत दुःख झालं. लहानपणापासूनच दौलतरावांचा परस्त्रीशीं संबंध होता. दौलतराव व्यभिचारी, व्यसनी होते. एक तर दौलतराव कुरूप होते, तशांत ते व्यसनी असल्याचें कळल्यावर मला त्यांच्याबद्दल मुळींच प्रेम व आदर वाटेना. मला त्यांच्यापासून मूल होईल ही आशा नष्ट झाली. केवळ त्यांची पत्नी म्हणून मी त्यांच्याबरोबर गांवोगांव हिंडू लागल्यें. माझें मन शरीर त्यांचेपासून दूर दूर जाऊं लागलें. त्यांचा मला वीट आला होता. घटस्फोट घेण्याबद्दल मी त्यांना विचारलें होतें. परंतु त्यांनीं मला स्पष्ट नकार दिला होता, माझ्या सुखाच्या सर्व कल्पना त्यांनीं पार धुळीला मिळविल्या होत्या. दौलतराव घरीं येत ते दारू पिऊन तर्र होऊनच. त्यांचं माझं लग्न झाल्यापासून कधींच पटत नसे. ते माझ्याशीं भांडत, मला हिडीस फिडीस करीत, मला, काठीनें झोडपीत असत. दोरीनें बांधून ठेवीत, विहिरींत ढकलून देण्याची किंवा पेटवून देण्याचीहि धमकी देत. सारं सारं मी सहन केलं. लग्न होऊन ७–८ वर्षे त्यांच्याशीं संसार केला. त्यांच्याशीं मिळतं घेण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यावर जिवापाड प्रेम केलं. पण त्यांनीं मला पत्नी या दृष्टीनें कोणतंच सुख दिलं नाही. ते माझ्या मनांतून पार उतरले.

माझं शरीर वासनांनीं भडकूं लागलें. माझं स्त्रीत्व मला स्वस्थ बसूं देईना. इतक्यांत २ वर्षांनीं माझी व धर्मा पाटील यांची ओळख झाली. दौलतराव बाभूळ वाडीला बदलून आले. आम्ही धर्माजी रावांच्या घरांतच राहूं लागलों. धर्माजीरावांचं सुंदर शरीर, त्यांचा मोकळा स्वभाव, श्रीमती राहणें, ऐटबाज बोलणें व मनमोहक हंसणें यांनी मी त्यांच्याकडे ओढली गेलें. तशांत त्यांचा व माझा स्वभाव एकमेकाशीं

जमू लागला. त्यांच्या रूपावर मी मोहित झाले. मनांतल्या मनांत मी दौलतीबरोबर त्यांची तुलना करूं लागले. दौलतींबद्दल मला आता कोणतीच माया नव्हती. केवळ पति याखेरीज मी त्याच्याकडे पाहत नसे. मी धर्मा पाटलाबरोबर बोलू लागले, हसूं लागले, खेळू लागले. आमचा सहवास वाढत गेला. सहवासाचे रुपांतर मैत्रीत होऊन नंतर
झाले. मी धर्मा पाटलावर पूर्ण भाळली गेले. त्याचे रुप, त्याचा स्वभाव त्यांचे हसणें, बोलणे, वागणें, सारं सारं मला आपलंसं करूं लागले. माझ्या शारीरिक वासना पुन्हा पेटू लागल्या. नकळतच मी धर्मा पाटलांना माझं शरीर व मन देऊ लागले. मी त्यांच्यावर प्रेम करुं लागले.

दौलतीचे व माझें आता अजिबात जमेना. एकदोनदां तर त्याने मला काठीने बदडून काढले. एकदोनदां त्यांनी मला विहिरींत ढकलून देण्याचाहि प्रयत्न केला. परंतु या गोष्टी मी कुणालाहि सांगितल्या नाही. दौलतीला न कळत मी धर्मा पाटलावर प्रेम मात्र करूं लागले. पुत्र-प्राप्तीची माझी इच्छाहि मी त्यांच्याजवळ अनेक बेळां बोलून दाखविली त्यांच्याबरोबर एकांतांत शारीरिक सुखहि घेऊं लागलें. माझा स्वभाव करारी, बाणेदार, हट्टी असल्यामुळे मी दौलतरावांना मुळीच भ्यालें नाही. घटस्फोटाला त्यांनी परवानगी नाकारली. माझ्या व धर्मा पाट-लांच्या वागणुकींचा त्यांनां संशय येऊं लागला. मी स्वतःच्या इच्छा व वासना पूर्ण करण्यासाठी धर्मा पाटलाकडे जाऊं लागले. आमचा सहवास व प्रेम वाढू लागलें.

दौलती पती असून देखील तो मला नकोसा वाटे. त्याचा स्वभाव, त्याचे बोलणें, त्याचे वर्तन--सारेंच मला नकोसे झालें होतें. त्याने मला दोनदां विष देण्याचाहि प्रयत्न केला होता. परंतु माझ्या दक्षतेमुळें तो फसला. दौलतीचें व्यसन, कुरुपता, रोग यामुळे तो माझ्या डोळ्यासमोर देखील नकोसा वाटे.

मी खूप खूप विचार केला. शेवटीं एके दिवशी रात्रीं–त्या दिवशी गुरूवार होता– १०–१०॥ ची वेळ होती. पावसाळी रात्र होती, दौल-

तीनें दारू मागितली. मीं मनाचा निश्चय केलेलाच होता. त्याला दारूं दिली. व त्याच प्याल्यांत विषारी पूड कालवलीं ! दारुच्या नशेंत त्याला कांहीच कळले नाही. जवळपास कोणीच नव्हते. हैबती गांवी गेलेला होता. धर्मा पाटील शांत झोपलेले होते. सख्याहि आजारी होता. सारे सारे वातावरण अनुकुल होते दौलतीला मीच विष दिले होते. सकाळी त्याचा भीषण अंत पाहून मात्र माझे स्त्रीहृदय जागृत होऊन टाहो फोडला ! धर्मा पाटील आंत आलें. त्यांनी मला सावरले, शुद्धीवर आणले. परंतु गांवात तात्काळ वाच्यता झाली. मला पोलीसांनीं येऊन पकडले. संपल माझं बोलणं ! स्वतःच्या स्वार्थासाठी पतीला मीच विष दिले. धर्मा पाटलावर त्याचा आरोप आला. पण ते निर्दोष आहेत. त्यांनी माझ्यावर प्रेम केले. मी त्यांच्यावर प्रेम करीत आहे. याखेरीज मला कांहींच सांगावयाचे नाही. ''

वकीलांनी आपापल्या वतीने बोलणें केलें. धर्मा पाटील व यशोदा यांच्या साक्षी झाल्या. दौलतीच्या खुनाबाबत कोर्टात केस चालू होती. इतरहि किरकोळ साक्षी झाल्या. न्यायाधीशांनी सर्व साक्षींपुरावें गोळा करून ह्या केसचा निर्णय तूर्त २ आठवडें तहकूब ठेवण्यांत आला आहे. असें जाहीर करून कोर्ट बरखास्त झाले.

★
★★

# दौलत —रा. म. फडके

फिरतिवरून आल्यावर घरी आलेली पत्रें मी प्रथम अधिरतेने वाचतो. हे माझ्या पत्नीला आतां पूर्ण माहित होते. मी आज फिरतीवरून परत येणार असल्याची आंगाऊ सूचना पत्रद्वारें पत्नीला दिली होती. त्यामुळे मी गेलो तेव्हां ती दारांत माझी वाट पहातच उभी होती. मी दिसल्याबरोबर नेहमीप्रमाणें तिनें घरांतून पत्रें आणली व मी घरांत पाऊल टाकतांच तिनें पत्रें मांझ्यापुढें केली. व लगेच लपविली, आणि म्हणाली, " ओळखा बघू कोणाचीं पत्रें आहेत ती ! " बूट काढतां काढतां माझ्या कल्पनेप्रमाणें वरीच नांवे सांगितली. त्यांतली दोन बरोबर ठरली. उरलेले पत्र मात्र कुणाचें आहे ते मला सांगता येईना. तिनें नांव ओळखल्याशिवाय पत्रें मिळणार नाही असे रुबाबांत सांगितले. पत्रे पाहिली की, ती केंव्हा वाचून काढीन असे मला होते. यामुळे मी हरलो असा ताबडतोब कबुली जबाब देऊन तिच्या हातांतील पत्रें काढून घेण्यासाठीं पुढें झालो. प्रकरण फारच हातघाईवर आलें आहे हे जाणून तिनें पत्रें माझ्या हातांत दिली, आणि म्हणालीं, " दौलतचें पत्र आले." दौलतचें पत्र आहे असें तिनें सांगितल्यावर मला आश्चर्य वाटलें. 'दौलताला नोकरीं मिळाली असावी' असे म्हणत मीं तें पत्र फोडले व वाचले. पण वांचल्यावर मी स्तंभितच झालों. त्या पत्रांतील घटनेवर माझा विश्वास बसेना. दौलतसारख्या माणसावर अशी पाळी येईल. असें कधीच वाटले नव्हतें. कारण दौलतला मी पूर्ण ओळखीत होतो.

दौलत जवळजवळ चार वर्षे माझा पट्टेवाला होता. कांही माणसे आपले चांगल्या वागण्यानें व प्रेमळ स्वभावामुळें आपल्या घरच्यासारखी वाटू लागतात. पहिल्याच भेटींत दौलतनें माझ्यावर चांगलेच 'वजन' पाडले होतें. माझा एक मित्र दुष्काळीकामावर ओव्हरसिअर होता.

त्याच्या आग्रहामुळें मी 'दुष्काळी काम' बघण्यासाठी एक दिवस गेलो होतो. मे महिन्याचे दिवस. दुपारची दोनची वेळ होती. ऊन कडक पडले होतें. ऊष्मा फार होत होता. गरम झळचा मधूनमधून चटके देत होत्या. अशा कडक उन्हांत हजारो स्त्री पुरूष काबाड कष्ट करीत होतें. त्यांची शरीर घामाने ओलीचिंब झालेली होतीं. त्यांचें चहरे निस्तज होतें. तोंडावर उत्साह नव्हता, आनंद नव्हता. कशीतरी शक्ति एकवटून ते काम करीत होते. त्यांत कांही तर अगदी म्हातारे होतें केवळ पोटांची खळगी भरण्यासाठीं जनावराप्रमाणें हे सर्व लोक राबत होते. काय त्यांचें तें जीवन ! सर्व काम पाहिल्यावर आम्ही मित्राच्या खोलीवर गेलो. त्यानें आरामखुर्ची दिली. सिगारेट दिली. सिगारेट मधून बाहेर पडणाऱ्या धूम्रवलयांत अजूनहि मला दुष्काळी कामावरची निरनिराळी दृश्यें दिसत होती. माझे डोके सुन्न झाले होते. माझा मित्रम्हणाला, " धरणावर इकडे हजारो लोक काम करीत आहेत पण सर्व लोक मुरदाड आहेत. कोणाच्या अंगात जीव आहे असे सुद्धां वाटत नाही! पण माझ्या नशीबानें एक मात्र मला पाहिजे तसा आढळला"

" कोण रे ? " मी कुतुहलानें विचारलें, लगेच त्याने दौलत म्हणून हांक मारली. त्यावरोबर ' आलो साहेब ' असें म्हणत धांवत एक शिपाई आला. आल्यावरोबर त्याने मला मिलिटरींच्या फॅशनमध्यें हंसन ऐटीत सलाम केला. दौलत अंगानें धडधाकड व उंच होता. वर्णाने काळा पण तरतरीत होता. त्या दिवशी मीं तेथेच राहिलो. माझ्या मित्रानें दौलतची माझ्या जवळ बरीच स्तुति केली होती. त्यामुळे दौलतकडे मी त्यादृष्टींनें बारकाइने पाहत होतो.आणि माझ्या मित्राप्रमाणें दौलतनें माझ्यावर पण चांगलेच वजन पाडले. कारण त्याने चहा व स्वयंपाक खरोखरच चांगला केला होता. कामांत चटपट दिसला. स्वच्छ दिसला. हंसतमुख होता, व बोलण्यांत विनयशील होता. रात्री जेवतांना मीं त्याची चवकशी केली. त्याच्याबद्दल पुढील माहिती समजली.

दौलतचें वडील शाळेंत मास्तर होते. लहाणपणापासून त्यांनी त्याच्या मनांवर चांगलें संस्कार घडविले होते. चांगलें वळण लावले होतें.

त्यांनी त्यांच्या भावीं शिक्षणाबद्दल बरेंच मनोरथ रचले होते. त्यानेंपण पुष्कळ शिकून वडिलाप्रमाणेंच मास्तर होण्याचे ठरविले होते. पण एका अनपेक्षित व दुर्दैवी घटनेंमुळे या सर्व गोष्टीं अपूर्ण राहिल्या. प्रवासाला जात असतांना त्यांच्या गाडीला अपघात होऊन त्यांतच त्यांना मृत्यू आला. त्यावेळीं दौलत ६ वींत होता. याघटनेंमुळे त्याची आई व तो असें उभयता उघडे पडले. त्यांच्या आशा–महत्वाकांक्षा कुठल्याकोठें लोप पावल्या. त्यांची जागा काळजी व जबाबदारी यांनी घेतली. आईचे व आपलें पोट कसें भरावयाचें हा अवघड व नविनच प्रश्न दौलतपुढे उभा राहिला, त्यासाठी त्याला प्रथम शाळा सोडावी लागली. त्यां दिवशी तो आईच्या कुशींत जाऊन खूप रडला. आईपण मोठेपण विसरून खूप रडली. वय लहान असल्यामुळे त्याला नोकरींवर ठेवण्यास कोणी तयार होत नसे. लहानसहान मजुरी करून तो थोडेसे पैसे मिळवीत असे व कसे तरी जीवन कंठीत होता. अशी ७।८ वर्षें गेली. त्यानंतर दुष्काळ पडला. त्यामुळें थोडी मजूरी मिळवणंसुद्धां कठीण झाले. कांही कांहीवेळा त्यांच्यावर उपाशी दिवस काढावयाची पाळी येई. तेवढयांत सरकारने दुष्काळीं कामें सुरूं केली. दौलत धरणावर काम करण्यासाठी धावत गेला. वाटेल तेवढे कष्ट करण्याची त्याची तयारी होती. दुष्काळीं कामावर कष्टाच्या मानाने त्याला फारच कमी मजूरीं मिळत होती. पण स्वकष्टानें तो स्वतःचे व आईचे पोट भरीत होता. यांतच त्याला समाधान होतें. वरील हकीकत सांगितल्यावर दौलत मला विनवून म्हणाला, " साहेब, हे दुष्काळीं काम कायमचे नाही. तुम्ही नोकरीवर लावून घ्याल तर गरिबावर फार उपकार होतील. वाटेल ती नोकरीं व सांगाल ते काम करण्याचीं माझी तयारी आहे. कराल साहेब एवढी मेहरबानी,?"आणि हे बोलतांना त्याचें डोळे पाणावले दौलतबद्दल माझ्या मनांत विलक्षण सहानुभूति निर्माण झालीं.

ह्याच दौलतला मग मीं संधी आली तेव्हां माझ्या ऑफिसांत शिपाई म्हणून घेतले. त्याला जेव्हां शिपाई म्हणून नेमल्याचो ऑर्डर मिळाली तेव्हां तो लहानमुलासारखा धांवतच माझ्या घरी आला.

त्याला किती विलक्षण आनंद झालेला होता ! आल्यांबरोबर त्याने माझ्या हातांत पेढ्याचा पुडा दिला आणि पाया पडला. क्षणभर त्याला काय बोलावे हेंच सुचेना. थोड्यावेळाने तो म्हणाला, " साहेब तुम्ही देवमाणूस आहांत ! तुमचे उपकार मी कधी विसरणार नाही. तुम्ही मला वाटेल तितकें काम सांगा. कष्टाला मी कधी डगमगणार नाही." दौलत ४ वर्षे माझा पट्टेवाला होता. दौलत आपली नौकरी चोख बजावीत असे. त्याला कर्तव्याची जाणीव होती. त्याला वाटेल तें काम सांगा. तो हंसतमुखानें सर्व कामें करीत असे. तो प्रामाणिक होता. घरांतील सर्वांशीं तो प्रेमानें वागत असें, पण त्याचबरोबर तो शिपाई आहे हेंहि कधी विसरत नसे. त्याच्या स्वभावामुळे व वागणूकीमुळे तो आमच्या घरांतलाच एक आहे असे आम्हाला वाटूं लागलें. नोकरी लागल्यावर दोन वर्षांनीं त्याच्या आईच्या आग्रहामुळें त्याने लग्न केलें. त्याच्य लग्नाला मी गेलो होतो. लग्न लागल्यावर दौलत बायकोला घेऊन प्रथम माझ्या पायापाशी आला. आणि म्हणाला, " साहेब, आजचा हा दिवस तुमच्या उपकारामुळे पाहत आहे. मीं तुमचे उपकार कधी विसरणार नाही. " दौलतीच्या डोळ्यातून आनंदाश्रू ओघळले. वास्तविक दौलतला जे कांही यश व चांगुलपणा मिळत होता तो त्यांच्या अंगच्या गुणामुळेच मिळत होता.

कांही वर्षांपूर्वीं जिवनाला कंटाळलेला दौलत आता जीवनांतील आनंद लुटीत होता. त्याला बायको चांगली मिळाली होती, आपल्या सुखी संसारांत तो रममाण होऊं लागला होता. पूर्वीचे हाल विसरत चालला होता. सुखस्वप्नें त्याला पडू लागली होती. आपल्या कष्टाचे चीच झाले याबद्दल देदाचे तो आभार मानीत होता. संसाराची दोन वर्षे वाऱ्यासारखी निघून गेलीं. माझे अपूर्ण राहिलेलें ध्येय मी माझ्या मुलाच्या बाबतीत तरी पुढे करीन अशी आशा त्याला वाटूं लागली. पण चांगले दिवस दौलतच्या नशिबांत फार ,नव्हते. कारण आर्थिक टंचाईमुळे सरकारचे नोकर कपातीचें धोरण सुरूं झाले, त्यामुळें गरिबी पण आनंदात चाललेले कित्येक संसार उधळले जाऊं लागले. दौलत हा

इतर पट्टेवाल्यापेक्षां कितीतरी हुशार व चांगला होता. पण त्याची त्याची नोकरी त्यांच्या मानान कमी होतीं. सरकारी नोकरींत गुणापेक्षां किती वर्षे नोकरी झाली याला जास्त महत्व असल्यामुळे दौलत नोकर कपातीच्या कात्रीत सांपडला. ज्या दिवशी त्याची नोकरी सुटली त्या दिवशीं माझ्याकडे येऊन ओक्साबोक्सी रडला. बेकारीची कल्पना त्याला सहन होईना. पूर्वीचे दिवस आठवले. तो म्हणाला ‘ साहेब, मला पगार देऊ नका. पण मी काम करीन. कामाशिवाय मला दिवस काढता येणार नाहीत. विचाराने मी वेडा होईन. माझ्या पोटाचे व माझ्या हालांचे मला कांही वाटत नाही, पण माझ्या वायकोचे. . . . . ’ त्यांच्या तोंडून शब्दच उमटेना. तो हुदके देऊन रडूं लागला. दौलतवर हा आलेला प्रसग हून मलासुद्धां वाईट वाटले. पण सहानुभूति दाखविण्यापलीकडे त्यावेळीं मी कांहीच करूं शकलो नाही.

त्यानंतर दौलतला दुसरींकडे नोकरी मिळवून देण्यासाठी मी खटपट केली. त्याच्यासाठी अनेकांना चिठ्ठ्या दिल्या. पण जिकडेतिकडे नोकरकपातीचे धोरण वाढत्या प्रमाणांत होते. बेकारी अतिशय वाढत होती. शिकलेल्या लोकांनासुद्धां नोकऱ्या मिळत नव्हत्या. मग दौलतला नोकरी कशी मिळणार ? दौलत नोकरी शोधून शोधून जेरीस आला. पुन्हां पूर्वीचींच पाळीं त्याच्यावर आली. त्याचे व त्याच्या बायकोचे हाल होऊं लागले. त्याची बायको मोलमजुरी करूं लागली. तरीपण त्यांना कित्येकवेळां उपाशी रहावे लागे. दौलत सारखा विचार करीत असे. त्याला वेड लागेल की, काय अशी भीति त्याच्या बायकोला वाटे. त्याला कांहीतरी समजून सांगा. असें मला त्याची बायको सांगे. त्याप्रमाणें मी तिच्या समाधानासाठी कांही करीत असे. त्याचा कांहीं उपयोग होत नव्ह ता. हे मला दिसत होते. कारण नुसत्या उपदेशानें दौलतची परिस्थिति सुधारत होती थोडीच ? उलट दिवसेंदिवस परिस्थिति जास्त जास्त भेसूर होत चालली होती. एक दिवस दौलत घरांतून निघून गेल्याचें मला समजलें. त्याच्या बायकोचे रडून रडून डोळे सुजले. त्याचा खूप तपास

केला, पण पत्ता लागला नाही. दौलतची बायको तिच्या माहेरी गेली. दौलतचा संसार उधळला गेला.

पुढें बरेंच दिवस दौलतबद्दल मला कांहींच समजले नाहीं. त्याची आठवण मात्र अनेकदां होई. पण आज त्याच्या पत्रामुळे त्याचा पत्ता लागला. त्यानें पत्रांत लिहिलें होते, 'साहेब, नोकरी मिळविण्यासाठीं मी खूप भटकलो. वाटेल तें कष्ट करण्याची माझी तयारी होती. पण मला नोकरी मिळाली नाहीं. माझ्यापेक्षां बायकोचे मी पोट भरूं शकत नाहीं याची मला शरम वाटे. विचार करून मी वेडा होईन असें मला वाटूं लागले. शेंवटी नोकरी मिळेपर्यंत घरीं 'परत यावयाचे नाहीं असे ठरवून मी एके दिवशीं घरांतून निघून गेलो. माझ्या बायकोला सोडून जातांना माझ्या हृदयाला किती यातना झाल्या ? जिनें माचावर जिवापलीकडे प्रेम केलें तिला मी सोडून जात होतो. पण काय करणार ? तिचें जर मी पोटसुद्धां भरूं शकत नव्हतो तर माझा काय उपयोग होता ? नंतरहि मी नोकरीसाठी वणवण हिंडलो. पण कांहीं उपयोग झाला नाहीं. आतां मला अशी कोणतीच आशा दिसत नाहीं कीं मी माझे व माझ्या बायकोचें स्वकष्टानें पोट भरूं शकेन आणि म्हणून मी आत्महत्त्या करण्याचे ठरविले आहे. त्यापूर्वी मी हें शेवटचें पत्र लिहत आहे. तुम्हाला हे पत्र मिळेल तेव्हां मी या जगांत नसेन. तुम्हीं मला हंसाल. भेकड म्हणाल. पण शेवटीं मला एकच विनंति करावयाची आहे. आणि त्यासाठींच हे पत्र मुद्दाम लिहीत आहे. तुम्हीं माझ्यावर एकेकाळीं अनंत उपकार केले आहेत. त्यामुळें आयुष्यांतील कांही वर्षे तरी मी आनंदांत काढूं शकलो. दोन वर्षे सुखी ससाराचा आनंद उपभोगू शकलो. तुम्हीं केलेले उपकार मी फेडूं शकलो नाहीं त्याबद्दल तुम्हीं मला क्षमा करा अशी तुमच्या पायाशीं शेवटची विनंति आहे.' दौलतसारख्या प्रामाणिक, सरळ, कष्टाळू आणि तरुण माणसावर आत्महत्तेची पाळी यावी याचे मला वाईट वाटले. दौलतसारखी माणसे म्हणजे राष्ट्राची खरीं दौलत आहे. पण तीच अशी मातीमोल होत आहेत.

★

## रुमझुम रुमझुम निनादताती

संभाजी होकम

रुमझुम रुमझुम निनादताती
पायींची पैंजणे
तुझ्या नि माझ्या गोड प्रीतीनें
फुललें नभीं चांदणे.
वसंत फुलला वनांत सुंदर
झेप घालती भ्रमर फुलांवर
घता उठलें अन् अधरावर–
पहिल्या प्रीतीचे मंगल गाणे.
दुग्ध सागरा आली भरती
अमृत धारा झरझर पडती
अमर जाहली अपुली प्रीति
या संसारी जरा उणे.

अथांग सागर प्रशांत झाला
नाव हांक रे पैल तीरावर
बघ रजनीचा अमला संपला
गमे मला नच अता गुंजणे.
भिजले रे मी या जलधारा
झोंबे अंगी लबाड वारा
या जीवनी रे तुझा आसरा
घे जवळी नच दूर लोटणे.
दो हृदयांची एक संगती
अभिनव प्रीति फुलली भवती
जिवा आवडे हिच प्रचिति–
प्रदिप्त नयनी प्रमत्त किरणे.

## सांग मी येऊं कसा

संभाजी होकाम

हांक आली तुझी कानीं
गहिवरलें माझ्या मनीं
लागे मज दूर धरणी,
सांग मी येऊं कसा ?

फुले क्षण फुलराणी
प्रणयाच्याच्या राज्यी कुणी–
ली प्रती ओवाळणी
सांग मी येऊं कसा ?

सौंदर्यमय भूषण
विषयाचे रंगरण
माजलें अिथे भयाण
सांग मी येऊं कसा ?

रोज नवे नित भासें
ललनेच्या सहवासें
गोड सार उमटतसें
सांग मी येऊं कसा ?

मूर्तिमंत प्रीत नगरी
मोह माया न आवरी
बुद्धि हरपते सारी
सांग मी येऊं कसा ?

जिविताची आंस खोटी
सुखावते होता भेटी
जमें अप्परांची दाटी
सांग मी येऊं कसा ?

मी येता कुणी हंसवी
प्रीत लालसा फंसवी
मार्ग रोजही अडवी
सांग मी येऊं कसा ?

★ ★ ★

## उःशाप : रामदास सेलूकर

मृदु भावनाच्या......
जटील खांडव वनाला
देतांना......अखंड जळण्याचा निर्घृण शाप!
सदा पाझरणाऱ्या चंद्रकांत मण्याप्रमाणे......
माझ्याहि मनास......
द्यायला हवा होतास
विस्मृतीचा शीतल शाप!!......
बर्फाप्रमाणे विरघळले असते
माझे पंचप्राण
वडवानलाच्या उष्णतेने
आतल्या आंत—
विरघळि [illegible] !!

★

## आभास : रामदास सेलूकर

वुक्ष्याच्या पड्यावर
सजविशी स्मृति-चित्रें
कां दिधला शाप असा?
बुबुळांना स्वप्न रुते! १

भाल्याच्या थडग्यावर
उपेक्षेचे क्रूर सोळे
जळलेल्या जीविताचे
विज दंश साहूं कसे? २

फुलण्याचा प्राण-वाय
उरीं उरला आभास
वैशाख उन्हांत जळे
चांदण्यांचे कैदी श्वास! ३

—

## प्रेमाचे–प्रमेय : 'आनंद'

निसर्गाच्या गणितांत
    माया रेषा रेखाटली
जीवनाचा कोन झाला
    मृत्यु बिंदु जिथे जिथे...१.

आशेच्या लघुकोनी
    निराशेची विशालता
बंधनाच्या वर्तुळांत
    मानवांची स्वप्नें...२.

साकारली जीव–ज्योत
    पंचकोनी महाभुतें–
        प्रीतीच्या आकृतींत
            –प्रेमाचे–प्रमेय !...३.

★ ★ ★ ★ ★

## *आई ! कधीं येशील ग !* : रंगनाथ बंदसोर

पापणींच्या खडकांत
    पाणी साठलं निवाळ
पुन्हां पुन्हां तुजपाशीं
    न्हावया झुळझुळ !

मनांतील मूक शब्द
    सांठवलें ओठांवर
निजुनिया तुजपाशीं
    बोलावया रातभर !

वेडं खुळं माझं मन
    कितीतरी घडपडे
भुर्रकन पक्षापरी
    यावयांस तुझ्याकडे !

अंतरींच्या पोकळींत
    जीव माझा तळमळे
'आई ! कधी येशींल ग ?'
    मन माझें अधीरलें !

## चंद्रा जाऊं नको...... —प्रभाकर जावरकर.

चंद्रा जाऊं नको तूं ढगाआड
तुला पाहतां हसतो माझा बाळ—धृ०

शांत जाहले सर्व जग हें
थकलें भागलें विसावलें हें
तरीहि न निजे माझा बाळ...चंद्रा०—१.

धवल शुभ्र तुझें किरण
येऊनि करीती सर्व विमल
परी मन्मनीं होई खळबळ...चंद्रा०—२

विसावले बाळाचें भाऊबहीण
खावया घरीं ना तयां अन्न
तुला सांगते हें दु:ख केवळ...चंद्रा०—३.

दारिद्र्य असे हें संकट अमुचें
या संकटाहुनी दु:ख कोणते
दारिद्र्यांतहि येई संकट काळ...चंद्रा-४.

## जीवन रंगले माणिक भोयर

तुझ्याच हांकेंत
हृदय भंगते
तुझ्या मिलनांत
जीवन रंगते १

तुझ्याच हांकेंत
ओठहि हसते
तुझ्याच स्मृतीने
हृदय जुळते २

तुझ्याच हांकेंत
स्वर्गाचा आनंद
तुझी हांक लावी
मिलनाची धुंद ! ३

## एक क्षण ! : अविनाश वरोकर

कंठित असता
निराश जीवन
अेक क्षण–
आलिस घेउन
प्रीतिरसायन ! १.

ग्रीष्माच्या तपनीं
रानांत वनांत
अेक क्षण–
आलिस घेउन
वसंत संगीत ! २.

सजल नयनीं
भिजत असतां
अेक क्षण–
सलज्ज छेडिलास
हृद्‌वीणा झंकार ! ३

धूसर पहाटे
बनुनि शुक्र तूं
अेक क्षण–
दिलास पसरुन
स्नेहाचा प्रकाश ! ४.

## : कोवळी पहाट–

गुलाबी कांतीची
कोवळी पहाट
सुवर्ण बटास
होती उकलीत —१.

निशेच्या अंचली
सलज्ज ओलेती
सावळ्या मेघांना
विलोकीत होती ----२.

स्तिमीत नयन
अधरी सुस्मित
दिसते निमग्न
आपुल्या नादात --- ३.

सुस्वागता तिच्या
लता शहारली
मुक्त कुंद कळीं
हळूच हांसली — ४.

पारव्यांनी कुठें
भरारी मारली
मेघांतून वाटे
उल्का निखळली —५.

## पहिलें पाऊल : यशवंत सातपुते

स्त्रैण कोणी रखडोत तुझ्यालागि
परि नाही भुलणार हा सुभागी
अंतरात्म्यातें फरक कसा राही ?
तयें घडविलें मला नि तुलाही—१.
स्त्रैण कवि-कवनें तूं फुगलीशी
ऱ्हास सर्वां हरघडी भुलतेशी
पाहतो मी हिरवून कोण नेते ?
पौरुषत्वाला कोण हरूंन जाते ?—२,

कमर बांधुनि उभा ठाकलो मी
रुप नटवा तव मोह कुचकामी
हाटीं मिळते का स्वत्व आणुनि द्या
दास जन्माचा होत लिहूनी घ्या—३.

प्रेम नटवा अन् प्रणय हा पसारा
फोल मोलाचा त्यजा बहर सारा
हीन पुरुषा त्यजें साधी अबला
भल्या, ओळख तव प्रथम पाऊलाला—४.

## अर्धस्फूट कळीस— : प्रभाकर कोरेकर

तुझ्या नेत्र पल्लवांत
माझ्या जीवनाची ज्योत
आयुष्याच्या उन्मादांत......तेवूं दे तूं !—१.
तुझ्या भाव – विणेवर
चिमुकले सुधासूर
माझ्या जीवनाचे सारु......ऐकूं दे तूं !—२.
तुझ्या चिमण्या हास्यांत
जीव–जीवनाची प्रीत
जीवनाचीं चांदरात......फुलूं दे तूं !—३.

## वरदान : —सुधाकर मोगलेवार.

दे मजला वरदान । प्रभो तूं । धृ.॥
स्वतंत्रतेचा मंगल दिप हा
प्रभा फांकतो दाही दिशांना
गर्जून सांगूं जगतां सान्या । स्वतंत्र हिंदुस्थान–१
जाति, धर्म, पंथांचें तांडव
विविध पक्ष हे, मिटवूं भांडण
आग लावूं या धिक्काराने । मानवतेचा मान–२
स्त्री पुरुषांचीं समान चाकें
राव रंक हे एका मार्गे
चालविण्यास्तव युगायुगाने । हीच निर्मूं या खाण–३
दुःख, कष्ट, घामाचें पाणी
न्हावुन निघतिल मजूर, भिकारी
नवीन निर्मिण्या राज्य तयांचे । होऊनिया रममाण–४
थोर महात्मे थोर विभूति
किती निपजली, धन्य भारतीं
रक्षण करण्या भारत माता । प्राणांचें बलिदान–५

## न्यूनगंड : —गंगाधर सावळकर.

मनोवेगाच्या पुढें धावते
न्यूनगंडाचे श्यामल पाणी
अन् त्या पुढती धावू पाहते
मानव्याची विचारसरणी १

दिनरात्रीची शर्यत जेव्हा
संभ्रमाच्या अवकाशावर
मधा पाहिले मंदिर जे तें
लोपून जाते धुकीं धूसर २

कर्तृत्वाला धार कोठली
बुध्दि जेथे बोथड होते
डोळे चोळून बघे अभागी
त्याला खालीं खाई नेते ३

## हिरवळ :

गंगाधर सावळकर

तव हृदयाच्या गाभारीं
हिरवळ पसरे खरोखरी
यास्तव सारे हरित दिसे
कूशंकेला वाव नसे
ऊन साउली
रात्र माऊली
खेदहि सारे हिरवळती
आनंदा मग ये भरती—१.
घू घू गाणें घुबडांचे
अथवा रडणे भुतांचे
आज न येईल तुजजवळी
उमलली बघतां तुझी कळी
गोड कोकिळा
मैना सकळां
एकच गाणें ज्ञात असे
नाजुक रज्जू ज्यांत असे—२.
चराचरांचे हे बोल
न वाटो कदापि तुज फोल
परंतु कविचा शब्द सखे
मनांत वसूं दे हळुच सुखें
वर्षा मागुनी
शिशीर ये झणी
वसंत ऋतुच्या वा उदरीं
ग्रीष्म तापतो कुठेतरी—६.

## अस्फूट रेषा :

उत्तम लिमये.

आज अजूनी —येतो आहे—
वाऱ्याचा गंध
वाट तुझी
पाहून आता
सुटला मम बंध.
आज अजूनी —येतो आहे—
तुझाच मंजुळ रव
झेप घालुनी
घ्यावा वाटे
हृदयाचा ठाव.
काल परंतु – होता आठव—
तुझाच मनीं एक
रात्र कालची
जाळत होती
क्षण क्षण एक.
काल परंतु – वाटे व्हावी—
आज तुझी भेट
इच्छा अपुरी
चिंब जाहली
दंवबिंदू पीत.
तरी परंतु – भेट कालची
आज कशी व्हावी
प्रीये प्रितिची
अस्फूट रेषा
हृदयांतून निघावी.

## : तव झाडं भरडं ....:

—सौ. शांताबाई दंडिगे.

तव जाडं भरडं वस्त्र फाटकी चोळी
तरी खुलून उठतं यौवन, रूप नव्हाळी.
तूं साधीभोळी उजळ तुझं व्यक्तित्व
मी मिरवावी कां प्रौढी करूनि कवित्व?

तव शरीर–ठवण सदृढ छान निकोप
मन हर्षित होते पाहुनि आपोआप.
किती कणखर मनगट पीळदार तव दण्ड
तूं प्राप्त स्थितीला पात्र द्यावया तोंड

तूं खांद्यावरती मुसळ घेऊनी येते
दणदणीत सगळीं कामं उरकुनि जाते.
दिनभरी करावें जीवापाड नित कष्ट
बघ माझीच होईल, तुला खरी ग दृष्ट

तूं पतिसह खाते भाकर निज कष्टाची
अन् समानतेचा हक्क बजावून घेसी
ही निर्भिड दृष्टि चित्ताकर्षक भारी
गुरुकिल्ली यशाची काय सुखी संसारीं?

कसलीहि शंका कधीं मना ना शिवली
तुज नाही पाहिलं, उदास दुर्मुखलेली,
समवयस्क आपण तुझं तान्हुलं पहिलं
झोळींत टाकुनी खुशाल करीसी कामं.

सांभाळ मुलाचा करण्या लागे दाई
मी दुरुन बघते बाळा, कसली आई?

भरदार वक्ष तव छाती ही भरलेली
हितचिंतक तूं ग खरी मुलाची आई.

चटईवर साध्या झोप लागते गाढ
तव कुशींत छकुलं दुग्धपान करी गोड

मऊ गादीवरती लागत ना मज डोळा
मन गुंफित बसते गोफ, रिकामा चाळा.

तुज नसे उद्याची चिंता, गरजा कांही
हा कर्मयोग तव जीवनीं मुरला बाई.

बघ निसर्ग आहे खरा तुझा ग देव
नित संगत त्याची निर्मितेस नव स्वर्ग.

आहेत साधनं जरी सुखाची जवळी
तुलनेनं बघतां तुझ्यापुढं मी दुबळी.

मज श्रीमंतीचा ताठा पोकळ डौल
मी शिक्षित आहे व्यर्थ वाहते गर्व.

(नभोवाणीच्या सौजन्याने)

★ ★ ★

## कविता :

— अण्णा अडसोड.

केली कविता मोडकी—
'काव्यांतील का केतकी?'—१.
केली कविता तोडकी—
'जनांतील का घातकी?'—२.
केली कविता सुंदर—
'साहित्याचे का भांडार?'—३.
केली कविता राजस—
'कवि होय का तामस?'—४
केली कविता सात्विक—
'समजावें ब्रह्मादिक?'—५.
केली कविता चिंतन—
'व्हावें आपुलें मिलन!'—६.

## जगतो आहे असेच जीवन : — अविनाश वरोकर.

धूसर अन् धुंद धुक्यासम
तरळत येते तुझीच मूर्ति
दग्ध हृदींच्या सुप्त भावना
अश्रु जागवी तुझीच स्मृति १

क्षणांत भिजते नेत्रपाकळ्या
तव स्मृतिवर अश्रुसिंचन
ढाळीत अश्रु तव मूर्तिवर
जगतो आहे असेच जीवन २

अंतर्मुख मी होऊनी अविरत
बघतो अंतरीं तुझीच प्रतिमा
अश्रु... अश्रु... अश्रु अविरत
नाही अश्रुस नयनीं सीमा ३

पाय थकले, गात्रही विरली
मुळी न आशा अंतरीं उरली
जाता जाता भग्न हृदीं पण
तुझीच आहे स्मृति ही स्थिरली ४

## इंद्रायणी : — नीलकांत ढोले.

तुझ्या अभंगाची साद
येते भंगल्या देव्हारी
अन् हळवा पिसारा
फिरूं लागतो जिव्हारी १

तुझ्या टाळयांचा रे नाद
वेड लावी माझ्या जीवा
सत्रें वीणाही निर्मिते
नाद ब्रह्माचा गारवा २

होतो गारव्यांत ओला
माझे 'मी' पण कळेना
भावनांची इंद्रायणी
मग सरता सरेना ३

## मला वाटतें..........

वामन हाते

मला वाटतें लेखक व्हावे
विजेसारखे जगीं चमकावें
अज्ञानाच्या अंधारांतील
जनतेलांहि प्रकाशवावें.

मला वाटतें शाहिर आणि–
कवि बनुनि रचूंया गाणीं
पोवाडयांची करूं गर्जना–
अन स्फूर्ति देऊं सुस्त जनीं.

मला वाटतें चित्रकार होऊनि
विषमतेवरी कुंचला फिरवूं
जुन्या–नव्याचे रंग भरूनी
मानवतेचें चित्र चितारूं.

★ ★ ★

## संगीत भावनांचे!

रंगनाथ बंदसोडे

तूं ऐकशी कशाला संगीत निर्झराचें
तो ऐकवील तुजला बदसूर गतयुगाचें
घेतेस तूं कशाला मधुगंध त्या फुलाचा.
ओठीं करील तुझ्या वर्षाव चुंबनांचा.
तोडून टाक फसवा तूं संग त्या दुज्यांचा
फसवेंच सर्व जग हें विश्वास ना कुणाचा.
तूं ऐक आज माझ्या संगीत अंतरीचें
तूं ऐकशील तुझ्याच संगीत भावनांचे.

## ईशस्तवाची ही खूण

:प्रभाकर कोरेंकर

मन माझें हें, नाही विरलें– विरलें
हें हृदय बहु व्याकुळलें– धृ०

अंतरीं दिव्य दीपांत
स्नेहाची जळते वात
अंधाऱ्या आयुष्यांत
परिशब्द असें कां–
ओठावरी आले?
'जीवनीं या तेलच नुरलें'–१.

अवनी ही झाली धुंद
मातींत हसे मधुगंध
फुलांत वसे मकरंद
जणुं विश्व गमे–
आकारांतून वदलें
'जीवन हें पिचलें–कुजलें'–२.

निर्झरीं तरलतें गान
निर्जिवीं हसतसे प्राण
ईशस्तवाची ही खूण
दृक्विश्व नव्हे, हे कण शून्यामधलें
परस्पर्शें दिव्य जहालें–३

★ ★ ★

## आशा!

: वासुदेव भावे

रखरखलें तें उन्हं
धरती सोडी निःश्वास
जळलीं तीं बीजांकुरें
तप्त पोळतें मानस–१.

धगधगते अंतरंग
होते काहिली जीवाची
वाटचा येई दुःख क्लेश
हानी सुख वैभवाची–२.

संभ्रमांत खुळी आशा
परी करी धडपड–
अजुनीही जीवालागीं
लागे प्रीतीची ती ओढ–३.

## गोड आठवण : माणिक भोयर

'आई!' गोड आठवण!!
गहिवरते हें मन
ढाळतो हळव्या नेत्रीं
स्मृतिसवें अश्रु दोन--१.

गालावरील अश्रु ते
अविरत: ओघळती
अन् तुझ्याच स्मृतिचा
प्रेमांकुर वाढविती--२.

युगें--युगे तो वाढावा
प्रेम--अंकुराचा वृक्ष
सावलींत विसावीन--
मी, आठवणीला दक्ष--३.

## काळीज हलवी..... तुकाराम डोंगरे

काळीज हलवी मनास झोंबे
रात किड्यांचा ध्वनि तो कर्कश
काळया भिषण अंधारांतून
राक्षस काळा, डरवितो मानस
चिंता नाही चैन जराही
क्षणैक हलवी हसवीत वारे
पाऊल पुढती मन ये मागे
पदापदांति थरथरणारे
चाल खुंटली; तरी चालणें
आहे जाणें अवचित लक्षा
काळ उभा हा पसरून जबडा
साधे कावा मिळण्या भक्षा
टप-टप वरती पडती थेंबे
दृगांत अश्रु भरुनि येती
गाळीत अश्रु बसुनि भवती
ऊंचऊंच ते अंबर वरती

# आशा — निहालचन्द वक्काणी

दिलीपने रमेशचं लग्न लावून दिलं नि समाधानाचा सुस्कारा सोडला. त्यानं आपलं मातृकर्तव्य पार पाडलं, इतकंच नव्हे तर वडिलांची अंतिम इच्छा सुद्धा पूर्ण केली. आतां त्याच्या शिरावर फक्त वसंत नांवाच्या धाकट्या भावाच्या लग्नाचीच काय ती जबाबदारी होती.

आजपर्यंत दिलीप, रमेश नि वसंत ही तिन्ही भावंड एकत्र राहत होती. दिलीपची पत्नी आशा ही आपल्या दीरांवर मातेपेक्षाहि अधिक प्रेम करीत होती. तिन्ही भाऊ चांगल्या ठिकाणी नोकरीवर होते आणि भरपूर पगार मिळवित होते. त्यामुळं घरखर्चांत मुळींच चणचण भासत, नव्हती. कुणालाहि कसल्याच प्रकारचं दुःख नव्हतं.

आजपासून घरांत नव्या सूनबाईचा–ललितेचा–प्रवेश झाला होता. घरांतील सर्व माणसांपेक्षा आशेला अत्यधिक आनंद झाला होता. आतां स्वतःला एकलकोंडं वाटणार नाहीं, घरांतील कामाचा बोझा आतां सहज कमी होईल, आणि स्वतःला एक निराळ्याच प्रकारचा आनंद अनुभवता येईल, असं तिला वाटत होतं.

ती विचारचक्रांत गुरफटलीं असतांनाच तिच्या पतीने-दिलीपने प्रवेश केला, नि जरा गंभीर आवाजांत सांगू लागला–"आशा! आतां मला नाहीं वाटत की रमेश एकत्र राहील म्हणून. पुढे मागे तो वेगळा होईलच. तुला काय वाटतं ?"

"कशावरून म्हणता ?" आशेनं प्रतिप्रश्न केला.

"वसंतचा मानी स्वभाव वहिनी सांभाळूं शकतील काय ?"

"कां बरं सांभाळूं शकणार नाहींत !"

"सर्वच बायका कांहीं तुझ्यासारख्या समजदार नसतात " दिलीपनें बायकोचीं प्रशंसा करीत सांगितलं. हें ऐकून आशा काहींशी लाजून उत्तरली. "इश्श्य! हें काय? पण तसं पाहिलं तर मी सारं कांहीं सांभाळून घेईन. सुनबाईला वसंताच्या हट्टीं स्वभावाची ओळख करून देईन. मग तर झालं?"

"पण चुकून जरी सुनबाई कांहीं कमीजास्त बोलल्या तरी सुद्धा वसंत घर सोडून निघून जाईल, हें तू जाणतेस ना?"

"तुम्हाला आंता कांहीं काळजी करण्याचं कारण नाहीं. मी सारं कांहीं बघून घेईन."

"मग ठीक आहे."

★ ★ ★

"वहिनी! अहो वहिनीऽऽऽ!! थोडं पाणी द्या म्हटलं!" तांदूळ निवडत बसलेल्या ललितेस उद्देशून वसंत म्हणाला.

"तुम्हीच भरून घ्या ना! माठ कांहीं दूर नाहीं!"

"नाहीं! तुम्हीच भरून द्या!"

"मी नाही भरून देणार बरं!"

आशा वहिनीच्या लाडांत वाढलेला वसंत स्वत:ची अशी अवज्ञा कशी बरं सहन करून घेईल? तो उठला नि वहिनीच्या हातांतील तांदुळाची परात हिसकावून घेत म्हणाला "वहिनी! जो पर्यंत तुम्हीं पाणी भरून देणार नाहीं, तोपर्यंत मी तुम्हाला तांदूळ निवडू देणार नाही."

"मला असले लाड आवडत नाहीं बरं!" ललिता रागानं म्हणाली. "असले लाड पुरवायचे असतील तर सरळ जा तुमच्या आशा वहिनीकडे."

"वहिनी! तुम्हाला जे बोलायचं असेल तें मला बोला, पण मोठ्या वहिनीबद्दल एक चकार शब्द देखील ऐकून घेणार नाहीं मी. समजलांत?"

"आम्हाला जें बोलायचं असेल ते बोलूं! तुम्ही अडविणारे कोण? लहान तोंडी मोठा घास घेतांना लाज नाहीं वाटत!"

तेवढ्यांत आशा वहिनी तिथं आल्यात. वहिनी भाऊजींना भांडतांना पाहून तिनं विचारलं "काय आहे रे वसंत?"

" कांहीं नाहीं हो वहिनी ! या वहिनींना मी पाणी मागितलं तर त्या म्हणतात मी देणार नाहीं."

" वसंत ! तू आतां कां लहान आहेस. मग अशा निरर्थक भांडणांत काय अर्थ आहे बरं !"

" पण वहिनी . . . . . . . !"

" आतां पण बीण कांहीं नाहीं. तू जा आतां. हपीसांत जायची वेळ झाली आहे."

आशावहिनीच्या आज्ञेचं उल्लंघन वसत कधीहि करीत नव्हता. तो ताबडतोब निघून गेला. ललितेकडे वळून आशावहिनी म्हणाल्या, " ललिता ! भांडीं एकत्र असली म्हणजे वाजायचीच, आणि वसंतचा हट्टी स्वभाव तर तुला माहितच आहे. धरलेला हट्ट तो कधीहि सोडत नाहीं. मग तू थोडंसं नमंत धोरण स्विकारवयास नको कां ? "

" पण तो वाजवीपेक्षा जास्त लाडावूं लागला तर मी बरी ऐकेन?" आपल्याच तोऱ्यांत ललिता उद्गारली.

" ललिता ! आशा अंतस्थ भांडणामुळं, गुण्यागोविंदानं नांदणारं कुटुंब नष्ट होऊन जातं, हें तू जाणतेस ना ? वास्तविक तू माझ्यापेक्षा जास्त शिकलेली आहेस, शहाणी आहेस नि समजदार पणं आहेस. वसंत वाटेल तसं बोलला तरी तू त्याच्याकडे दुर्लक्ष करावयास नको का ?

आशावहिनी ललितेच्या चेहऱ्याकडे निरखून बघत होत्या. स्वतःच्या समजावण्यानं, तिच्या मुखावर कांहीं फेरफार होतो का, याची पाहणी करीत होत्या. पण ललितेच्या मुखावरील नापसंतीच्या रेषा कांहीं पुसल्या गेल्या नव्हत्या.

★ ★ ★

सहा महिन्यानंतर एके दिवशी घरांतील सगळ्यांच्या चेहऱ्यावर चिंतेच्या रेषा अकित झालेल्या दिसत होत्या. दिलीप अस्वस्थ मनानं इकडून तिकडे येरझारा घालीत होता. ललिता स्वेटर विणत

होती, पण तिच्या बोटांचं कंपन मात्र लपूं शकत नव्हतं आशा कपाळावर हात ठेऊन कसल्याशा विचारांत गुंग होती, आणि रमेश हातरूमालाची घडी करीत होता पण त्यांचं सगळं लक्ष दिलीपकडे होतं.

आशेकडे वळून दिलीप उद्गरला, "पण तू कां जाऊं दिलंस ?"

कपाळावरील हात काढीत पदर नीट करून आशा उद्गरली, "मीं त्याला अडवलं, समजावलं, इतकेच नव्हे तर माझ्या गळ्याची शपथ घातली, पण तो तर कुणाचंहि न ऐकतां तडक निघून गेला."

ललितेस उद्देशून दिलीप म्हणाला, "का हो ? तुम्ही त्याला कांहीं बोलला होतां ?

ललितेनं स्वेटर बाजूला ठेवून सांगितलं, "पण तो दिवसभर माझी थट्टा करूं लागला तर मी काय स्वस्थ बसूं ? मला नाहीं तें आवडलं आणि म्हणून मी त्याला तसं न करण्यास बजाविलं, पण सहाशयांना राग आला."

"पण तुम्हाला तर वसंताचा स्वभाव माहित होता ना ? एकहि वांकडा शब्द तो सहन करणार नाहीं हें माहित असूनहि तुम्ही त्याला टाकून बोललांत ? हें बरं नाहीं केलं तुम्ही."

ललितेच्या अहंकारी वृत्तीस आतां असह्य झालं. तिच्या डोळ्यांत अश्रू तरारले. कशी तरी ती दोन शब्द बोलूं शकली, "आमच्याकडनं त्याचा स्वभाव सांभाळला जाऊं शकत नाही."

दिलीप उपदेशाचे बोल बोलूं लागला, "आपण एकाच घरांत राहातो म्हणून थोडं थोडं सहन करायलाहि शिकलं पाहिजे.

"सहनशीलतेला पण मर्यादा असतात बरं !" असं म्हणून ती आंतल्या खोलींत निघून गेली. कसलाहि विचार न करता रमेश पण मुकाट्यानं तिच्या मागोमाग निघून गेला.

आशेकडे वळून दिलीप सांगू लागला, "मी तुला नव्हतं सांगितलं की वसंतचा हट्टी स्वभाव ललिता सांभाळू शकणार नाहीं म्हणून."

पण मला नव्हतं माहित कीं शिकली सवरलेली ललिता इतक्या संकुचित वृत्तीची असेल म्हणून"

"खरं म्हणजे अस आहे की आई वारल्यामुळं बापान तिला लाडांत वाढविलं आहे आणि घरची श्रीमंतीहि आहे, म्हणून जरा तिची वृत्ति चढेल बनली आहे."

"बरं पण आतां वसंतचं काय ?"

"त्याला मी काढतो शोधून त्याची नको तू चिंता बाळगू. एकदा त्याचा पत्ता लागला म्हणजे त्याचंहि लग्न यंदाच उरकून टाकायचं."

अखेर या विषारी मतभेदामुळं दिलीप नि रमेश वेगळे झालेत. रमेशनं दादरमध्यें एक खोली भाड्यानं घेतली नि ललितेच्या अत्याग्रहामुळं रमेशला तिथं राहावयांस जाणं भाग पडलं. कांहीं दिवसांत वसंताचा पत्ता लागला. दिलीपनं त्याला समजावून घरीं आणलं.

★ ★ ★

आशावहिनी स्वयंपाकघरांत शेगडी पेटवीत होत्या. तोंच वसंत धांवत धांवत आंत शिरला नि वृत्तपत्राची एक प्रत मागे लपवित म्हणाला—"वहिनी"

"काय आहे रे वसंत ?"

"वहिनी ! एक गंमत सांगू ?"

"सांग की !" आशा शेगडींत कोळसे टाकीत म्हणाली.

"तसं नाहीं ! आधीं मला वचन द्या कीं बंक्षिस देईन म्हणून!"

"पण आधीं सांगशील की नाहीं ?" पदरानं हात पुशीत आशेनं प्रश्न केला.

"वहिनी ! आतां तर ललितावहिनी लेखिका बनल्या आहेत !"

"तें कसं ?" वहिनीची उत्सुकता वाढली.

"बघा हें वृत्तपत्र !" उत्कृष्ट निबंध लिहल्यामुळ त्यांनी पहिला क्रमांक पटकावला आहे."

" हर्षानं फुलून आशेनं वृत्तपत्र हातीं घेतलं नि वसंतने दाखविलेल्या पानावर नजर फिरविली त्यांत लिहिलं होतं......महिला मंडल द्वारा, मागील महिन्यात झालेल्या निबंध स्पर्धेत अडीचशे भगिनींनी भाग घेतला होता. त्यांत श्रीमती ललिता यांचा 'संयुक्त कुटुंब नष्ट करा' नांवाचा निबंध सर्वोत्कृष्ट ठरविण्यांत आला आहे. त्यामुळं त्यांना मंडळातर्फे दीडशे रूपयाचं बक्षिस देण्यांत येत आहे. आम्ही त्यांचे हार्दिक अभिनन्दन करतो !"

" आहे ना वहिनी ! आतां थोडचा दिवसांतच ललिता वहिनींचे लेख वृत्तपत्रांत झळकूं लागतील, आणि........."

" पण आशावहिनीचें पाणावलेले डोळे बघून वसंत थांबला आणि वहिनीजवळ बसून त्यानं विचारलं, " वहिनी ! तुम्ही रडतां का ?"

"नाहीं रे ! ते तर आनंदाश्रु आहेत." पदराने डोळे पुशीत वहिनी उद्‌गारल्या.

शेगडी चांगलीच पेटली होती. मंद मंद ज्वाला निघत होत्या. वहिनी त्याच्याकडे निरखून पाहत होत्या. त्या ज्वालामध्यें वहिनींना 'संयुक्त कुटुंब नष्ट करा' ही अक्षरं थरथरत असतांना स्पष्टपणें दिसत होती. पुष्कळ प्रयत्न केला तरी पण त्यांच्या नेत्रांतील अश्रूं खाली टपकलेंच !

★ ★ ★

इकडें ललिता नि रमेश यांचा संसार जेमतेम चालला होता. ललितेची निबंध लिहिण्याची महत्वकांक्षा सिद्धीला जात नव्हती म्हणून मधूनमधून पतिपत्नींचीं भांडणं होत होती. बक्षिस मिळाल्यानंतर तर ती नेहमी निबंध लिहण्यांतच गर्क असे. त्यामुळं साहजिकच रमेशच्या सोईकडे दुर्लक्ष होत असे. रमेश वारंवार चिडून सांगत असे, " हें काय ललिता ! अशा प्रकारें जर तू अहोरात्र निबंध लिहूं लागशील तर मग स्वयंपाक कसा करणार नि पुढे होणाऱ्या बाळाला कशी सांभाळणार ?

" एखाद्या दिवशीं जेवणाला उशीर झाला तर त्यांत काय मोठं एवढं बिघडलं ?

" हें काय एका दिवसाचं आहे आतां. हें तर आतां रोजचंच होत चाललंय.

आणि जेवण न करतांच रमेशला कचेरींत जावं लागल.

दिवसानंतर दिवस लोटूं लागले. रमेशच्या घरीं पाळणा बांधला गेला. त्यामुळं तर त्याच्या अडचणींत वाढ झाली. त्याला तान्ह्या बाळाकरितां दररोज औषध आणावं लागत. असे. ललितेच्या तक्रारी पण वाढत गेल्या......आज बाळाला पडसं झालं...... आज बाळाला खोकला झाला......आज बाळाच्या अंगांत बारीक ताप आहे......!

ललितेचं हें रडगाणं ऐकून रमेश चिडायचा, संतापायचा, कित्येक वेळा आत्महत्त्या करायची इच्छा त्याला व्हायची. कचेरींत साहेबाची बोलणीं ऐकायची नि घरीं बायकोची कटकट. त्याला कुठंहि शांति मिळेना. चोवीसही तास तो कोणत्या न् कोणत्या काळजीने घेरलेला असायचा.

एके दिवशी.........

"तुम्ही आज कचेरींत न गेलांत तर नाही का चालणार ? बाहेर निघणाऱ्या रमेशकडे पाणावलेल्या डोळ्यांनी बघ्न ललितेनं प्रश्न केला.

" पण ऑफीस कांहीं आपल्या घरचं थोडंच आहे ? ऑफिसां गेलो नाहीं तर खाणार काय, याचा विचार केला आहेस का ?" रमेशने रागावून सांगितले.

" पण इथं माझी काळजी कोण घेणार ? तापामुळं माझं शरीर कसं पेटलंय ?"

" मग कशाला वहिनींच्या घरांतून बाहेर पडण्याचा हट्ट धरला होता ? भावापासून वेगळं करवून तूं मला अगदीं त्रस्त करून ठेवलंस. आतां आपल्या शेजारी पण असं कुणी नाही की जो तुझ्याकडे लक्ष

देईल. आतां कर तुझ्या सर्व आशा आकांक्षा पूर्ण ! रमेश कोट घालीत चिडून म्हणाला.

" पण तुम्ही आपला राग माझ्यावर कां काढता ?"

" मग कुणावर काढू. तुझ्यामुळंच तर ही अशी स्थिति निर्माण झाली आहे."

आपली डाळ शिजत नाहीं हें पाहून तिनं पाळण्यांत झोंपलेल्या तान्ह्या बाळाकडे केविलवाण्या नजरेनं पाहात सांगितलं " माझ्यावर दया येत नसली तर राहूं द्या, पण या तान्ह्या बाळावर तरी दया करा."

" दया करून काय करूं ? इथंच बसून राहिलो तर नोकरी सुटायची."

भिंतीवर टांगलेल्या घड्याळाकडे लक्ष जातांच तो चमकला आणि सव्वानऊची लोकल पकडण्यासाठीं तो धांवत सुटला.

" रमे ऽऽऽ श !" आपली असहाय्यता लक्षांत येतांच ललिता ओरडली व तो दिसेनासा होताच स्फूंदून स्फूंदून रडूं लागली.

नेमक्या त्याच वेळीं आशावहिनिनें प्रवेश केला. इतक्या वर्षानंतर, आज, अचानकपणें आशा वहिनींना आपल्या घरांत येतांना पाहून, प्रथम तर तिला आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना.

" तुम्...ही...!" नकळत तिच्या मुखांतून शब्द निघाला.

" होय ललिता मीच ! आतां चल बरं घरी ! इतकी आजारी आहेस नि मला एका शब्दानं देखील कळविलं नाहींस. "

आशावहिनींच्या आकस्मिक आगमनामुळं ललिता स्तंभित झाली होती. त्यामुळं काय बोलावं नि काय नाहीं हें तिला कळत नव्हतं. ती कशी तरी बोलली... " पण तुम्हाला कुणी.........?"

काल रात्रीं उमाकाकू आल्या होत्या. त्या सांगत होत्या..पण तू आतां उशिर करूं नको. चल बरं लवकर.

ललितेच्या डोळयांतून आनदाश्रु वाहूं लागले. पश्चात्तापानं प्रेरीत होऊन तिन. आशावहिनीचे पाय धरले व गहिवरल्या शब्दांत म्हणूं लागली, " मला क्षमा कराल का ?"

" नाहीं ! मी क्षमा करणार नाहीं, कध्धी...कध्धी करणार नाहीं. मी तर तुला शिक्षा करणार आहे. अशी शिक्षा की जी तू जन्मभर विसरणार नाहींस. " ललितेला उठवीत आशा वहिनी म्हणाल्या.

ललितेच्या मुखावर एक अस्पष्टशी स्मित रेषा चमकून गेली, तिनं पटकन विचारलं--" कोणती शिक्षा "

" आशावहिनी न्यायाधीशाचा आव आणीत म्हणूं लागल्या-- " वसंत भाऊजींच्या लग्नांत अंग मोडून काम करण्याची शिक्षा.'

" वसंत भाऊजींचं लग्न ?" आपला ताप, रमेश बरोबर झालेलं भांडण सारं सारं विसरून ललिता हर्षातिशयानं उद्गरली. पण लगेच गंभीर होऊन तिनं प्रश्न केला, " पण ते मला क्षमा करतील काय ?

" खरंच ते मला क्षमा करतील काय ?" असा बायकी आवाज काढीत, आंत येत, वसंत म्हणाला.

" भावोजी तुम्ही ?" ललितेनं साश्चर्य प्रश्न केला.

" होय ! मीच बरं वहिनी साहेब ! आतां चला बरं लवकर घरीं !"

" पण तुमचं ऑफिस ?"

" आज मुद्दाम तुम्हाला घरीं आणण्यासाठीं सुट्टी काढली मी. पण आतां जास्त प्रश्न विचारूं नका. चला लवकर घरी. !"

" पण हें घरीं आल्यावर काय म्हणतील ?"

" तुझ्या ' ह्यांना ' माझे ' हे ' पाहून घेतील. आशावहिनी विनोद करीत म्हणाल्या नि सारे मनसोक्त हंसले."

" पण......"

" आतां पण बीण कांहीं नाहीं ! पाळण्यांत झोपलेल्या बाळाला उचलीत वसंत म्हणाला. आशावहिनींनी ललितेला उठविले नि बाहेर आणून दाराला कुलूप ठोकले.

## : उचळ :  –दत्ता कवीश्वर

हातांत पेन घेतलं की वाटतं खूप लिहावं. मन भाराऊन जातं अगदी. अन् मग कांहीतरी भरकटत बसतो– तुला नको असतं तें. तुला रुचणार नाही असं कांही लिहूं नये असं खूप वाटतं. पण लिहिलं जातं अितकं मात्र खास–न–कळत.– दमेकऱ्याला राहून राहून अुबळ येते ना, तसं होतं मला कित्येकदा. त्रास होतो डोक्याला. पण अिलाज नसतो. स्वभावाला औषध नाही हेंच खर.

तुझ्या गोड सहवासामुळे माझ्या रूक्ष जीवनाला विलक्षण कलाटणी मिळाली हे केव्हाहि नाकारता येणार नाही. तुझ्या नि:सीम प्रीती–वर्षावाखाली मी ओथंबलो आहे– तुला सांगूनच कळेल असंहि नाही. कारण त्याचा प्रत्यय तुला अन् मला क्षणोक्षणी येत आहे. माणसानं प्रेमांत पडूं नये असं म्हणतात. पण पडल्यावर ठेच लागणारच. आपण प्रेमांत पडलों नाहीच. अजून सारखे मार्गक्रमण करीत आहोत. तेव्हा पडल्यामुळें ठेंच लागण्याचा प्रश्नच अुद्भवत नाही. पण निव्वळ प्रेम माणसाला आयुष्य कंठायला अपुरं पडतं असं नाही कां तुला वाटत ? माझं व्यवहारी मन मात्र तसं सांगतं. आपल्या दोघांच्या जगाशिवाय अितरत्र त्याचा तोकडेपणा जाणवल्या खेरीज राहत नाही. व्यक्ति तितक्या प्रकृति. सगळ्यांशी गुण्यागोविंदानं वागायचं म्हणजे मनाच्या मोठेपणाची नितान्त आवश्यकता भासते. तुला माझा राग येअील; कदाचित्. तूं म्हणशीलहि की, ‘ तुझ्या हेकेखोर स्वभावामुळे दुसऱ्याच्या भावनांना कशा तडा जातात याची तुला मुळी जाणीवच नाही.’ दुसऱ्याच्या म्हणजे कुणाच्या ? तुझ्याच ना ? छे– तूं कां दूसरी आहेस? पागल कुठली. अग परमेश्वराला व्यवहाराच्या दृष्टीनं जमलं नाही

म्हणून यानं ही दोन शरीरं निर्माण केलीत– अितकंच– दोन मनं विलिन झाली की, विद्युत्शक्ति पेक्षाहि त्याची गुणग्राहकता वाढते. अुगाच नाही ' रोमियो–ज्युलियेट ' लोकांच्या जिभेंवर आजहि नाचत– मिलनांत शक्तीच तितकी दांडगी.–आणि हो. मिलन म्हणजे तरी काय ? अुठल्या बसल्या व्हावं, अितकं सोपं नाही. नुसत्या शाळा–कालेजेस् किंवा ऑफिसमधल्या तोकड्या सहवासानं ते होत नसतं. फार तर स्नेह जडेल. सहवास वाढेल. आकर्षण निर्माण होओील. पण मिलन होओीलच असं ठामपणानं दोघांनाहि सांगतां येणं शक्य नाही– मी भाग्यवान आहे.– कारण तुझ्या माझ्या बाबतींत तें घडलं आहे– ओघानंच आठवलं म्हणून लिहितो– अेकमेकांची मतं जुळल्याखेरीज मिलाफ होवूच शकत नाही; असा सर्वसाधारण समज आहे. पण हे साफ खोटं आहे. तुझ्या ध्यानांत आला असेल माझा रोख. तुझी अन् माझी मतं जुळताहेत ? किंबहुना आपल्यावरून तर असा सिध्दान्त तयार करावा लागेल की, ज्यांचं कुठल्याच बाबतींत जुळत नाही त्यांचा मिलाफ चटकन् होवूं शकतो. पण आपणा दोघांनाहि त्याची खंत नाही. कारण मतभेद असले तरी प्रेम ही वस्तुच निराळी आहे.

भांडण्यांतहि मौज असते नाही ? लटकं रागावण्यांत–चिडण्यांत असते की, नाही हें मी सांगू शकत नाही पण कुरापत काढून चिड–विण्यांत मौज असल्याचा अनुभव मला अवश्य आहे. तुझ्याशी अगदी गोड वागावं असं वाटूनहि मला तों जमत नाही. कारण...कदाचित् तूंच तितकी गोड असाविस–पण माझ्या अितकी सहनशक्ति तुझ्यांत कुठं आहे ? थोडीशी गंमत केली की, तुझ्या डोळ्यांतून खळयन् पाणी गळतं.

तुझ्यांत नि माझ्यांत फरक तो हाच. तूं कोणतीहि गोष्ट मनाला लावून घेतेस; अन् माझा विसरभोळा स्वभाव मला याबाबतींत साथ देतो–देतो म्हणण्यापेक्षा मी त्याच्या आहारी जातो– मुद्दाम– तशी मी संवय लावून घेतलीय म्हणून माझ्या मनाला कुठलीच गोष्ट लागत

नाही. तुझ्यासारखी प्रत्येक गोष्ट मनाला लावून घेतली असती तर माझ्या अडतीस अिंची छातीचा परीघ चोविस झाला असता अन्. . अन् कदाचित् जगणंहि मुश्किल झालं असतं.

मन घट्ट केल्याशिवाय सूख मिळत नाही म्हणतात. अन् निदान माझ्या बाबतींत तरी ते अगदी खरं आहे. स्त्री आणि पुरुष यांना अेकमेकापासून अधिकाधिक सूख हवं असेल तर त्यांच्या मनाची दुर्बलता कमी व्हावयास हवी. अमेरिकेतील सुप्रसिद्ध न्यायाधिश बेन लिंडसे याने साहचर्य–विवाहाची (कंपनीयेट मॅरज) योजना सुचवलीय् तिच्याहि मूळाशी कदाचित् हाच हेतु असावा. मनाची दुर्बलता तेव्हाच नष्ट होवूं शकते जेव्हा ती जवळ येतात. पण तुला हे मी सांगायला हवं असं नाही. तूं माझ्या अितकी निकट आली आहेस की, माझं हें म्हणणं तुला हास्यास्पदहि वाटेल.

अुर्वशी सारख्या अुत्तान काममोहिनीचा शोध करीत रानोमाळ हिंडणाऱ्या पुरुरण्यानं तिला पहिल्याच सपाटयांत 'कठोर हृदया' म्हणून संबोधलं आहे. मूर्ख होता तो पुरुरण्य अननुभवी. वस्तुची पारख न करतांच अभिप्राय देणारास कोणता व्यवहारी माणूस शहाणा म्हणेल? अर्थात तूं माझ्या या व्यवहारी तत्वज्ञानाला तडा मारण्यासाठी विचारशीलहि की, 'मग अुर्वशीन पुरुरण्याचा त्याग कां केला?

ती अप्सरा होती. पुरुरण्याला गंधर्व झाल्याखेरीज तिचा शाश्वत लाभ होणं अशक्य होतं. पण हें सारं सांगायचं कशासाठी? आपणा दोघांच्या जगांत 'त्याग' हा शब्दच नाही; अशी तुझी समजूत आहे. तूं ज्या अर्थानं तो समजतेस, त्या अर्थानं खरोखरच नाही. पण 'त्यागा'ची व्यापकता पाहिली म्हणजे त्याशिवाय माणूस जगूंच शकत नाही याची खात्री होअील तुला. पण हें सारं समजून घ्यायला संशयी वृत्ती बाजुला सारावी लागते. तुझ्यासारख्या शंकेखोर मुलीला पटायचं नाही ते. त्याला मन मोठं करावं लागतं.

परवा तो समोरचा वसन्ता आपल्यांत येवून जरा अघळ पघळ बोलला तर तूं लगेच भलतीच शंका घेतली. त्याच्या मनांत वाअीट

हेतु असावा असं तूं कशावरून म्हणतेस ? मनमोकळेपणा हा नेहमीच 'फाजील' असतो ? सर्वच स्त्रियांनी अितकं शंकेखोर असाव याचं मला दु:ख होत. निदान तूं तरी थोडं बंधनांतून पलिकडे जावंस अशी माझी अिच्छा असते.

कारण तुझ्या विषयीच्या माझ्या कल्पना अतिशय निराळ्या आहेत. त्याच दृष्टीने मी आजवर तुला पाहत आलो आहे. स्त्री म्हटली की मत्सर आणि संशयीवृत्ती डोळ्यापुढे अुभी राहते. त्यांतून तिचा सहवास लाभला की, प्रत्येक शब्द मोजून तोलून बोलावा लागतो. पण हा अनुभव माझ्या बाबतींत तुला कधी आला आहे कां ? नाही. तुला येणंच शक्य नाही. कारण तसं असतं तर तुझा सहवास वाढवण्याच्या भानगडींतच मी पडलो नसतो मुळी. पण हें सारं मला माहित असून कळत असूनहि मी तुझ्या निकट आलो. कारण तुला मी अेका वेगळ्या–अगदी वेगळ्या– अितकं वेगळ्या (की मग मला मूर्ख म्हणेल) दृष्टीनं पाहत आलो आहे. परवा वसन्ताच्या बाबत तूं तशी शंका घेतली. पण मी विचारतो, माझ्या ऑफिसमध्ये शेजारच्या टायपिस्टशी मी अितका अधळ पघळ बोलतो– तिच्याबरोबर कॅन्टिनमध्ये जातो– चहा घेतो– या माझ्या वागणुकींत वाअीट कां हेतु असतो ? भिन्न लिंगी आकर्षणाचाच तो अेक भाग आहे या आकर्षणांत संभोगवृत्ती असतेच असं नाही. अन् ती नसावी. निदान तूं तरी या बाबतींत थोडा बेफिकिरपणा ठेवावा असं मला वाटतं. कारण नित्याच्या व्यवहारांत अशा अनेक व्यक्तिंशी वारंवार गाठ पडते. मनुष्य त्याकडे अितकं संशयीत दृष्टीनं पाहूं लागलां तर कठीण आहे.

जाअु दे. तुला सांगून पटणार नाही ते. पण सांगितल्याशिवाय राहवतहि नाही. आपलं म्हटलं की मन आवरत नाही. आणि हा असा कांहीतरी भरकटत बसतो. दमेकऱ्याला राहून राहून अुबळ येते ना, तसं होतं मला कित्येकदां त्रास होतो डोक्याला. पण अिलाज नसतो. स्वभावाला औषध नाही हेंच खरं ! !

★ ★ ★

# जीवनदान :!!!
## –विद्याधर घारपुरे

मला वाटतें.........
नील नभाशीं
स्वैर विहरावें;
ग्रह गोलाशीं
कुजबुजावे.
वेध तयांचा
घेंऊनि अवनि;
अवतीर्णावें
'स्फुटनिक' होऊनि !
मला वाटते.........
भ्रमर होउनि
गुंजावे पुष्पासम;
क्षितिज–महालीं
रविकर जाता–
मीलन व्हावें,
मधुर मधुर तर !!
मला वाटते.........
सैनिक होउनि
झुंजावे सैन्यासह
तिमिर आपदां;
स्वदेश ग्रासता–
अर्पुनि द्यावे
जीवन दान !!!

●

# मधुगीत
## –'बुद्धानंद'

उत्कट आतुरतेने
धावते मी सैरावैरा
धुंद प्रिया–मिलनाची
कधीं भेटेन सागरा.

हिरवळ रानांतून
कशी धावत सुटली
जाते लपत छपत
मिलनास आतुरली

नाही विसावा मनास–
अनुध्यास दिनरात
मन रंजन कराया
रंगविते मधुगीत !

सागराच्या मोठ्या कुशीं
जागा निवान्त मिळाली
मंद पाऊलें टाकीत
भरती सागरा आली.

●

## प्रितीचा सोहळा 'अंजन'

आकाशाच्या डोलींतुन
चालली ते संध्याराणी
नील घनाचा घुंगट
बघतसे उघडुनी...१.

तारे अमित शोभेस
चंद्र कळस हा वरी
नीळचा रंगाची ही डोली
समिराच्या स्कंधावरी...२.

संध्या–राणीची वरात
धरेचिया सदनास
डेरा दिला समुद्रांत
लाटा उभ्या स्वागतास...३.

क्षितिजाची लालकडा
हळू हळू सोडूनिया
निशा–राणी रेंगाळत
पातलिसे भेटावया...४.

धरेचिया अंकावर
बाळ झोपले व्याकूळ
थिजलेल्या नयनांते
गुंफी स्वप्नाचीच माळ..५

वसुंधरेच्या उद्यानो
तिन्ही बहिणींचा मेळा
धरा, निशा आणि संध्या
बघा प्रितीचा सोहळा...६.

●●●

## दर्पण फुटला 'अंजन'

घरघर आकाशांत
कोण म्हातारी दळते
जलदाच्या जात्यातुन
पिठ मोत्याचे गळते...७

पट घनाचे सारून
वीज लाजून पाहते
काळ्या शालूची किनार
जरतारी चमकते...२.

गगनाच्या मंदिरांत
आला पाहुणा सागर
अष्ट कोनांतून झणीं
फुटू लागती पाझर...३.

उफाळत्या सरितेच्या
लाटा गगनांत जाती
लाटाचिया गगनांत
तेज रेखा प्रकाशती...४.

रवि–बिंब लाटेवर
अग्नी रसाचीच ज्वाला
विखुरती कांचखंड
कसा दर्पण फुटला...५

## जीर्ण देवालय : कृष्णमाधव

विसावते देवालय
दूर डोंगर कुशींत
भग्न भिंती त्याच्या
अुभ्या आसवे गाळीत–१

शेवाळली सांबमुर्त
आहे रूतुन मातींत
वाळलेल्या नैवेद्याला
आहे मनीं विस्मयींत–२

थिजले शिळे पाणी
झिरपते फुलारींत
दोन वाता काजळते
तेलाविना पणतींत –३.

छिन्न घंटा देव्हाऱ्यांत
फिरे घिरट्या घालीत
मनीं अुदासला तोहि
साद नाही घुमवित–४

विखुरल्या माती विटा
त्यांत दुःखाला गुंफीत
अुभे जिर्ण देवालय
निज देहाला कंठीत–५.

● ● ●

## श्रावण : कृष्णमाधव

दूर लवत्या क्षितीजाला
संध्या रंगाचे पाजण
अुभा तिन्ही सांजेला
निळ्या डोहासी आजण–१

कधी नाही कासाविला
कुशीतला त्याचा प्राण
अुभा केव्हाचा अेकला
परि नाही त्याला शिण–२,

त्याच्या रेशमी छायेला
नाही कशाचीच बाण
मात्र जिर्ण डहाळीला
नित्य, श्वासाचें–पुराण –३

● ● ●

## झळाळते हिरवळ : —आत्माराम भोयर.

हिरवळीस कांठवा
कांठव्यास हिरवळ
त्या उसळत्यां लाटेला
हळवीच हळहळ.

बेधडक... आलिंगने!
खेपा घालीं रात्रंदिस:
मिठ्या मारूनिया कैक
उगीच वाढविला फेंस.

स्तब्ध बसुनि कांठवा-
पाणी पितो मनसोक्त—
अन्' बोचऱ्या स्पर्शांने
लाट चालली खंगत

त्या रसिक कांठव्याने
झळाळते हिरवळ!
खुळी ओढ सागराची
लाट वाही खळखळ!!

## क्षणभरहिं उसंत...... : —आत्माराम भोयर.

पहाटेच्या गारव्याने
कसें चालविले चाळे!
सुस्त सावळी ती निशा
कुसीकुसीवर लोळे. १.

त्याच्या गारठ्या स्पर्शांत
किमयाची नवलाई
अंगीं फुटूनहि कांटे
निहायत खूष होई. २.

क्षणभरहि उसंत......
लाल कोंबड्याला नाही;
लाल! कोवळा किरण
तोही डोकावून पाही. ३.

## क्षणभर !

—प्रभा वसंतराव बल्लाळ.

क्षणभर दिसली
जरा हांसली
क्षणांत गेली ... निघून:
मनांत ठसली
उभी राहिली
आहे परी ती अजून. १.

कितीक दिसाची
गांठभेट ती
फरक किती ... झाला:
बघुनि वाटला
नवीन चेहरा
पोक्त जाहलेला. २.

चपल सुंदरी
सदा हांसरी
नटवी ही ... किती?
आज भासली
कुण्या युगाची
आहे जणूं ती सती! ३

टिळा जाऊनि
कुंकू विलसले
काळी पोथ ... उरीं:
सवें तिच्या तर
चिवचिव होती
चिमण्यांची भारी. ४.

सर्व सोडुनि
गोड मैत्रीगी
कुटुंब—वत्सल ... ती:
चालत होती
रस्त्यावरूनि—
पतीसवें ... गज गती. ५.

## अचानक जेव्हां ......

—संभाजी होकम.

अचानक जेव्हा गांठ पडली
नव्हता परिचय परस्पराला
भाषा नयनाद्वारें कळली
गोंधळ सारा क्षणीं उडाला. १.

—काळ चालला भरुन भावना
फुटले अंकूर प्रणय—बीजाला
रोप वाढलें नव जीवनाचें
अभिनव प्रीतीचा बाग उमलला. २

उजाडला दिन मांगल्याचा
भरली जीवनीं नवीन आशा
वाजत गाजत प्रभात आली—
बोलत जवळी मधुमय भाषा—. ३.

## पालवी नव्या युगाची !

वसंत देशमुख

•

ही पालवी नव्या युगाची! धृ०
मुखीं वीर महिलांची गीतें
निर्भयता नेत्रांत नाचते
वाणी स्वतंत्रतेची – १.
ऐटदार चालींत धिटाई
डौलदार भाषेंत सफाई
थोरवी भारताची –२.
मानवता धर्माचा पाईक
सत्य–शांतिचा द्योतक
कलिका आत्मतेजाची –३.
नंदन हें फुलवीन जगावर
घालिन गरिबा प्रेमपाखर
वेळची सत्तांधाची ! –४.

## आशा वेडी...

दिनेश हरणे

आजच्या तीन्ही सांजेला
अंधाराच्या घनतेंत
अंधुकता जिथे तिथे
सारे कांही काळोखांत –१.

आस माझ्या वेडया जीवा
तुझ्या ओढीने लाविली
ओढ ओढीतच नेते
होते जीवाची काहिली. –२.

आशा वेडी कुणी एक
अंधाऱ्या या जगतात
टकमक कशी पाहे
नेमकी जीवन–ज्योत! –३.

## विझल्या साऱ्या नभीं तारका . . . मा. वा. जोशी

विझल्या साऱ्या नभीं तारका एक परतु उरे
कुणा शोधिते ? काय पाहते ? रेंगाळत कां फिरे ?.१.
गगन मंडपी खेळखेळतां भांडण कां झाले ?
रुसून बसली, मैत्रिणी गेल्या तरी न ही हाले.२.
रजनी-पति तो खेळाया येईल आपणासंगें ?,
वाट पाही; जरी घेऊनि गेला सकळा मागे !.३
कोणी माता सोडून गेली अवनीवर बाळे
आत्मज्योति काय तिची ही म्हणुनी रेंगाळे .४.
दंव बिंदूंचें स्नान करूनि पति दर्शना आली
कुंकुम तिलक काय उषेने रेखियला भालीं .५.

## स्वप्न प्रीतिचें ना. मा. तिडके

अंतरंग धुंडते प्रीतीस
स्पर्श प्रितिचा हवा एकच
ओठांवरी उमलावें स्मितहि –
क्षण एक तो पुरें एकदाच !

स्मिता आडून लाजते प्रीति
तृष्णा नाचतें प्रीति भवती
स्पर्श सुखाच्या तृप्तीनंतर
भाव तरंग ही फुलते नेत्रीं.
प्रमाविना निर्मल भावना
अद्वैताची प्रीति वांछितें
आणि तिच्या त्या खुळेपणावर
स्वप्न प्रीतिचें जळतें ..... फुलतें

## अनामिक अंतरंग :

शशिधर

आहे साधे-भोळे किती
भाव तुझ्या वदनावर
तुझ्या परीसरी असे
विचार ते किती थोर !

मुग्ध तुझी हालचाल
सखे, बघावीशी वाटे
अन् माझ्या ओठीं गडे
बोलण्यास शब्द थुटे.

रम्य माझी भावकळी
फुले बघताच तुला
गोड वाऱ्याची झुळुक
बहरवी आनंदाला

वृत्ती-कमलाच्या तुझ्या
लुटण्यास मकरंद
आहे सज्ज केव्हाचीच
अनामिक अंतरंग.

## एक कलिका . . .

शशिधर

उभा अंधार लपला
काळचा कातळाच्या पाशीं
या काळाची आवर्तने
पडे सागर तळाशीं-१.

एक कलिका लपली
माझ्या मनाच्या गाभारीं
अन् स्मृति-शलाकेला
शांत विसावले उरीं-२.

पापण्याची अधीरता
लोप पावली अश्रूंत
प्रेमभंगाचा उंबरा
ओलांडला उन्मादांत-३

## कोकिळेचे गुणगान :

आसाराम गोहणें

श्रवणी पडतां तान कोंकिळे !
वर्णू किती मी गान !! धृ०.

मधुर वदुनि शद्बां तोषवी
सुबक चंचू विमल लाजवी
ऐकत होते हें कान......वर्णू०.१.

टकमक बघतो कांही दिसेना
मधुर शब्द हें सर्व कळेना
अधिर आहे हें रान......वर्णू०.२.

पतंगावत मी होतो झुंझत
मिळेल मानी होतो सरकत
झळकत होते पान.....वर्णू०.३.

## मेघान्योक्ति :

राजाराम कुलकर्णी

तुला पाहुनिया मयुरास मोद
कसा नाचतो सोडुनि सर्व खेद !
नको जेधवा मानवा लागी पाही
तदां वृष्टि तूं रे करीतोस पाही–१.

तुझ्या आगमें ही धरा तृप्त होई
पहा ! चातकाची वरी दष्टि पाही !
तुझी वाट ते पेरणीच्या सुवेळी
पहाती वृथा राहशी अंतराळीं–२.

कुणा आवडेना जगीं रग काळा
परी पूज्य तूं मेघराया कृपाळा
उगा आरडा–ओरडा कासयाला
उणे खास आणि तुझ्या दानतेला–३.

## मंद पहाटेची :

—उत्तम लिमये.

धुक्याच्या गारठ्यात
उब उगवत्या सूर्याची
आणि ओंब्यावर गव्हाच्या
किलबिल पाखरांची १.

चमकती शुभ्र शुभ्र
कुठें बगळ्यांचे थवे
कुठें भुकेल्या जिवांना
तृण कोवळे हिरवे. २.

धुक्याच्या त्या गारठ्याला
साथ नाहीच कुणाची
त्या उगवत्या सूर्याला
मंद मिठी पहाटेची. ३.

## पस्तरा फुटतील जिभा—

.कृ. बा. चौधरी.

कां गर्व दाटला तुला? परम मंगलीं पदा
विनम्र होऊनि जा, अन्यथा येईल गदा! धृ०
काया शुद्ध कर तुझी
विचार शक्ति ना दुजी
पवित्र दे! मना–तना–जना, अदा सुधा सदा–१.
ध्येयें सिद्ध कर तुझी
युक्ति जोंवरीच शक्ति
मग जा त्या स्थळां नरा, टाकुनिया आपदा २.
उंच घाट चढावया
नरांची भंगली काया
गेलें बहु, असे सदा--मार्ग नव्हे साधासुदा–३.
अंतराळीं काजळी ---
निशा घोर दाटली •
उठ! फाड त्या कभिन्न --- मेघा, जाग उषा एकदा–४.
पस्तरा फुटतील जिभा
वृक्ष, वेलीं, लता, प्रभा
नभा, खगा, मृत्तिका, बोल फुटूं दे मता सदा. ५.

# अंध भिकारी

—बालकवि—खोजा

टेकित अपुल्या काठीला
अंध भिकारी हा आला
वस्त्र न अंगावरी तया
कुणा न येई त्याची दया
दारोदारीं
हांका मारी
दु:खी भारी
झोळी घेऊन काखेला
भिक्षा मागाया आला. ॥१॥

भाकर द्याहो गरिबाला
दया येऊं द्या कोणाला
नाहित डोळे
विश्व आंधळे
गमतें सगळे
रात्र न कळते दिस याला
भिक्षा मागाया आला. ॥२॥

थंडी वारा, ऊन असो
वर्षत पाऊस तसा असो
पोटासाठीं
दु:खी—कष्टी
जीव शेवटी—
फिरे घेऊनि हा अपुला—
भिक्षा मागाया आला. ॥३॥

# भावनेच्या सागरांत...

—गुलाबराव भुते

गवसलें तुझें मन
रुढीच्या ह्या बंधनांत
कसें करू सांतवन
क्षणाच्या त्या स्मृतींत १

स्थिति तुझी पाहून रे
मनीं वाटे हुरहुर
हृदयाच्या कोपऱ्यांत
माजलें कसें काहूर. २.

पूर्ती तव करायाला
ध्येय तुझे अनमोल
समाज—बंध तोडण्या
करी विचार सखोल. ३.

ह्या रुढीच्या बंधनाचा
अवघड तो चढण
केली पराकाष्टा ज्यांनी -
करी तयांचे स्मरण ४.

नको चोळू कुसुमाला
भावनेच्या सागरांत
जीवन सार्थ करण्याला
होई होई बा प्रशांत ५

## अपेक्षा ! -- दत्ता कवीश्वर

माझिया राज्यांत
तुला सिंहासन
तुझीया भक्तीने
किनारे जीवन ! १.

आणिक तरीहि
आकांक्षा माझी ही
व्हावे न केधवा
आपुले मिलन -२.

अपुरें स्वप्न तें
अपुरें असावे
अपुरें चित्र तें
असेच पहावे. ३.

अपूर्ण गीतांच्या
स्वरांचे चांदणें
असेच सारखे
द्रवत रहावे -४.

कारण--मिलनानंतर
मलूल तृप्तता
मैफलीनंतर
विषण्ण शांतता ! ! -५.

● ● ●

## हिरवें स्वप्न -- वसन्त डहाके

हुंकार नभाचा जाणवला धरतीला
सुकलेल्या ओठांना बहर पुन्हा आला.
निळ्या नभाच्या डोळ्यांत नाचतो मोर मेघांचा
स्पर्श जाणवला शुष्क तरुंना गर्भ-रेशमाचा.
पाचोळा मोहरला जलधारेच्या मीठींत
मातीचा श्वास व्हाला मृदगंधाच्या दीठींत.
वर्षाच्या धरणीवर फुटले कोंभ ऋतुंचे
हिरवें स्वप्न न्याहाळती डोळे अंकुरांचे.

★ ★ ★

## आकांक्षा ! 'जानकीतनय'

आला हावरा पाऊस
नभांतुन ओसंडत
थकलेल्या धरतीला
-क्षण बाहुपाशी घेत -१.

होती मनीषा मनांत
बहु दिवस साठली
विरहाची मनोव्यथा
आज सारीच संपली -२.

ओठ-पाकळ्यांच्या कांठीं
होते आतुरले भाव
अबोलच बोल सारे
होई आज एकजीव -३.

मत्त झालास पावसा !
आलिंगिता धरतीला
परि तुझ्या पायाखाली
धगधगे अग्निज्वाळा -४.

आज शापावे तुजला
माझी एकच आकांक्षा...
'नच घडो सहवास !'
घ्यावी वियोगाची दीक्षा ! ! ५.

## रूपगंधा -- बाळासाहेब पाटील

अधून्या गालांत
मधुर चांदणं
अंतरीं पहावें
न्याहाळून —१.

बावऱ्या डोळ्यांत
नभीचा प्रकाश
पहावा शोधून –
काळजांत —२.

रसाळ बोलणें
मधाळ हांसणें
चालणें हंसीचे
भोंवताली —३.

भवसागरांत
घुमवित पावा
मनीची मासोळी
मत्स्यगंधा ४.

दिसतें रसिकें
रुपाने सुंदर
गंधाने उन्मत्त
रूपगंधा ५.

## 'दे दान !  --सरस्वती--तनया.

पृथ्वीमाते, अनंत हस्तें, मृगराजा दे दान ।
तुला गे मृगराजा दे दान ।। धृ० ।।

उष्ण उसासे तुवां सोडिले
वायुने ते त्यास कळविलें
त्याचें कोमल मन विरघळलें
करुणाधारा जलद वर्षती, दिगंत हो बेभान ---१.

विरल वायुची सुंदर मलमल
बिजलीची चंदेरी मखमल
जलधारांची तलम सोनसळ
काळोखाची चंद्रकला ही, वसनें करी परिधान ---२.

वरदाने सुस्नान होउनी
रविकिरणांची नेस पैठणी
तृणांकुरांची शाल घेउनी
उधळुन सुमनें, अनंत वदनें, गा गा प्रभु-गुण गान ---३

## प्रतीक्षेत !  -- विना पाटील

क्षीतीं रेंगाळल्या
लांबल्या सावुल्या
आकाशीच्या पटीं
रंगल्या बाहुल्या -- १.

पाहूं निरखून
अंधारलें मन
संगतीला माझ्या
व्याकुळले क्षण -- २.

★ ● ★

# मूक आसवा –अविनाश वरोकर– करुण कहाणी!

रक्ताळल्या स्मृतिसवें
दग्धभाव चाळवित
आज कंठतो जीवन
मूक आसवा ढाळित –१.

मूक मनीचा गाभारा
आज भासतो भकास
आसवांचा अविरत
त्यांत अभिषेक खास– २.

आज भकास भासते
जिविताचे उपवन
पुष्पवेलींच्या राईत
पसरले माळरान –३.

नियतिचा क्रुद्ध खेळ
नित्य चालला जीवनीं
आज निराशा...निराशा
स्वर एक ध्यानींमनीं ४.

विट आला जिवताचा
नको राहणें जगांत
शांती लाभो प्रभू ! मना
तव पदांच्या धुळीत –५.

तव नेत्रांत पाहिली
आज आसवांची सर
थरथरला अंतरीं
सुकलेला तृणांकुर –१.

किणकिणली करांत
आज हरीत कंकण
परी अंतरीं भासते
आगळेच रीतेपण --२.

अधरीचा अनुराग
आज आगळा भासला
लाल गालीचा गुलाब
सांग कसा ग सुकला?–३.

भावस्मिताची लकेर
आज मूक कां जाहली ?
नयनीच्या पारव्याने
कुठें भरारी मारली?–४

कधी अंतरांत तुझ्या
होती अमृताची वाणी
परी ओठी आज कशी
कां ग करुण कहाणी?–५.

## प्राक्तन–लेखन ! प्रभाकर कुन्दारपवार.

विधीलिखीत फासे पडले, अन्–
ओळख नसतां ओळखिले !
पुण्य हें माझे पूर्वजन्मीचे
म्हणूनि मजला गौरविले –१.

अमृत पिण्या अधीर झालो
धन्य समजलो माझे जीवनीं
भ्रमर होऊनि आलो प्रिये !...
हताश झालो विरह–मीलनीं –२.

काय खेळ हा विचित्र आहे
'प्राक्तन–लेखन' चुकते का !
तेंच 'साधण्या !' पुढें धावतो
ठरेल मग 'तेंच खरे' कां ? –३

खुळ्या आशेचे वेड किती ?
ध्यास मांडला ठायीं ठायीं
पुनर्जन्मी होईल 'मीलन' !
हीच ठेवीन आशा हृदयीं –४.

★ ● ★

## साधेपणा ! – शंकर चोबितकर

नको नको माझे मना
धरू संपत्तीची हाव
आज दिसती ह्या राशी
उद्या 'पै'चाहि अभाव –१.

नको नको माझे मना
हिरे धरू तूं मुठीत
कंटकच भासे सारे
धन लपले मातीत –२.

नको नको माझे मना
पुरण–पोळी तूं खाऊं
शीळी भाकरी–मिरची–
गोड आनंदाने जेऊं –३.

नको नको माझे मना
स्वर्ण–दागिने नटण्या
'साधेपणा !' अलंकार
स्वाभीमानाने जगण्या –४.



ठा. स्थळप्रत

## आज अचानक कसें —सिंधू पुरणकर.

आज अचानक कसें
जीवा वाटे हळहळ
प्रीती हृदयीं फुलते
कां रे ! व्हावे मी व्याकुळ.

क्षणीक लटका भास
तो आभासच ठरेल
प्रीतीची जीवन–ज्योत
हृद्‌मंदीरीं जळेल.

झंझावाताचे जीवनीं
नवकलशाचा घोट
गीत माझें भाव तुझें
बहरेलच अवीट.

● ● ●

## अमृतबोल —प्रयागराव लाडे

उठुनि बघतां प्रभात काळीं
परमेशाची कृपा जहाली
सृष्टि पहुडली या भुवनीं
दव बिंदू लक्ष्मीच्या नयनीं –१

हताश होऊन रडला बिचारा
पडे कसा तो प्रियेच्या प्रीतिला
बघतां बघतां क्षीण होई
त्राण नच उरला या देहीं –२

सुखाची कशीं करावी आस
उगीच वाटे मना हव्यास
'दुरून डोंगर दिसती बरें'
अमृत–बोल ! हेंचि खरें –३.

● ★ ●

## शब्द भासती अपुरे --पुरुषोत्तम वनकर.

आज सजविता अंग कोरे
'आई ग ! शब्द भासती अपुरे —धृ०
वसंत फुलवूनी त्वां पुजिली
पुष्प लताही चरणीं नमीली
निसर्ग ममता तुझी आगळी
परीं उणे हे पडती सारे —आई ग ! १

नव–उदयाची लाली येता
धवल–शीतलां गाणी गाता
प्रभा–हंसही दर्शन देता–
तुला वाहिली गगन साजरे —आई ग ! २

दडलेल्यांना काढुन वरती
भावनांना देऊनि पणती
वात्सल्याची उजळून ज्योति
तुला शृंगारी सुगंध गजरे —आई ग ! ३.

● ●

## श्रद्धांजली – --पुरुषोत्तम वनकर.

आहे तयांत एक – स्मृतिविना तो नेक –१.
झोपी तसाच गेला – 'आला तरीहि गेला' –२.
मिळे कुठेही घांस – सोडी घरीच श्वास –३.
नील मेघमंडलाचे – पिऊनी अश्रु साचे –४.

श्रद्धांजली तुला ही
हा एक मेघ वाही – ५.

★ ★

## 'शान्ता' — सरस्वती-तनया.

सुटतांच पहाटेचा गार वारा
निघेच शांता पक्ष्यापरी भरारा,
सारे कांही घरकाम आवरून
झोपलेल्या तान्हीसहि थोपटून – १
कसें आटोपावें काम असे भारी
पोर टाकियली एकलीच दारीं
'घार आकाशीं चित्त पिलापाशीं'
काम हाती परि गुणगुणे मनाशीं – २
प्रेम-पान्हा हृदयांत सावरोनी
आणि घेई झणी काम आवरोनी
पाय धरणीला लागतो न लागे
अशी मार्गी ती चालतसे वेगें – ३.
तिचे रसरसलें तेज कृष्ण देहीं.
ताठ बांधा भरदार दोहि बाहीं
फिकीर कष्टाची नसे भविष्याची
सज्ज झुंजाया, क्षितीं न आपदाची – ४.

## खूणगांठ ! — 'गीता किशोर'

त्या निळ्या नभांतील
चांदरात हांसरी
नयनांत घालुनी
रातीची काजळी – १.

वळणावर होते
झाड वाकडे एक
तीच अमुच्या
प्रीतीची खूणगांठ ! २

त्या कंठामधलें
चाळ-ध्वनी मौजेत
चांद-रातीचे गीत
गात सौख्यांत – ३.

ऐकतां बोल हे
हांसली पुनश्च रात
हांसणे कसले
तेंच प्रीतिचे गीत ! ४

# सारजाईचा लेक 'आत्माराम भोयर'

सारजाईचा लेक राम मोठा हुशार निपजला होता. मोठचामोठचाले राहच् म्हणे. तात्या बाम्हणाले भी बस्सर जात नव्हता. चट्चट् अक्सेर काढे न् मिठठूसारखा बोले. एका खिन्नांत पत्र घासे चऊत–पूर्णिमा काढे; एकादस सांगे. सेंभराचा हिशोबं त् यूं करून फेके. सारजाईला मोठं गुमान होतं त्याचं.

अशा गुणापायीं सकाळ–संध्याकाळ जो तो त्याच्यामागे हुदकनें लावीं. ' महा पत्रं लिहून देगा त् हा वाच् गा . . हें कसं गा त् तेंति कस्सं गा . . . . ' पण त्याचं कांही ? . . . . अं हं ! घेन्ण् देण्.

' कव्हान् कव्हा गुण् कामी पडनच् ' असं जरी वाटत असलं तरी रामच्या टेरंपायीं कधींकधीं सारजाई संतापून म्हणे, 'उगच शिकवलं वो माय ऽऽ तव्हाच् लगन् करून टाकलं असतं. . . ! '

तिला भारी प्रश्न पडला होता. कपडे ऽ रे त् पुस्तक रे ! हे रे . . . त् थे रे–पायीं हातचा पैसा सारजाई खर्चून बसली होती. नेम्माचा चिमटभर तंबाखू सकाळ–संध्याकाळ खाई; हप्त्याचा पधरवाडाभर पुरवी सारजाईनं कंजूशी सुरू् करून आवरता हात घेतला होता.

सारजाईचा ईरादा पूरा होऊं शकला नाहीं. साता किताबींत मास्तर तरी होईन. शिकविल्याच चीज होईल. सारजाईनं मनसुबे रचले होते. पण खचलें. तिची कंबर बसली होती. सारजाईच्या थेहेनं इकडची टोपी तिकडे करून लेकाले कसतरी चार किताबीं शिकवलं. त्यांनी ह्या खर्चा-पायीं हाय खाल्लीं होती. पुढें तिचा पैया चालत नव्हता. इंग्रजींत टाका-साठीं लय पैसे लागत होते. म्हणून पोराचं नांव टाकतांटाकतां राहिली.

कामापुरतं रामाचं शिक्षण झालंच होतं. हिशोबटिशोब तू करत्च होता. पत्रहि काढे. लोकं, 'पोराले अधोरं ठेवलं' म्हणत.

लय शिकूनभी काह् आहे ? किरसानाच्या हाती बईल-हंगणच् काह् नाही ? बिनशिकले काह् उपाशी मरते? सारजाई ठसक्याने लोकांची तोंडं बंद करी. वरून छाप-भी ठेवी. गुलाब्याचें नांव घेऊन " थोहो पाहचना गुलाब्या, शिकला—सवरला. 'साले' विगर त्याची बोली नाही. मायबाप देल्ले टाकून अन् घेऊन पराला नागपूरांत रामप्यारीले!"

सारजाई बल्लभदास मारवाड्याचे वावरांत निंदायला जाई. नव्या तरुणीप्रमाणे चारचार तास घेऊन चार पाथा पाडी. हप्त्यांत दोन रुपये जास्त चुकारा उचले. मिळालेली मजुरी रामकडून परताळून पाही.

पोळ्याचा सण जवळच आला होता. सणावाराचा हाट इतवारचा. रामाकोन्याचा. काम एक पारगच् होतं.दिवस माथ्यावरून घसरला होता वल्लभदास मारवाड्याचा पत्ता नव्हता. रोजदारनी बाया दिव्यासारखी वाट पाहात होत्या. त्यांतील कांही मारवाड्यास वाणावाणाच्या शिव्या देत होत्या. हाटांतून कोणकोणते सौदे आणावेत याचाहि कांही विचार करीत होत्या. इतक्यांत बछरी घोडी खिंचाळली. मालक उतरले. सर्वांच्या जिवांत जीव आला.

मालकान पोत्यावर आसन मांडलं. चांदीच्या चक्चक् डब्यांतून बंगला पानाचा विडा काढला अन् तोंडांत कोंबला. खुर्चाची. थैली काढली. नोटाची बट्टी फोडली. फतईच्या पोट खिशांतून चोपडी काढली पेन्सिल धरली तोंडांत जमलेला पानाचा लाल चिकट रस गिळला 'अहं ऽ' 'अहं' ऽ करून रोजदारनी बायाकडे एकबार नजर फेकलीं नाकावर घसरलेलीं आयनक वर करून सुरवात केली.

'सारजाई' . . . . मालकाने आवाज दिला. 'हे ऽ सात रुपे अन् हे चार . , आठ . . . बारा ऽ ऽ आणे सात रुपे बारा आणे झाले; जा सारजाईच्या नांवावर मालकानं फुली मारली. आणि दुसरा आवाज दिला,

‘ सीता . . . ’

. . . चुकारा सुरू होता.

सारजाई गंभीर मुद्रेनं घरीं परतली. रामला पाहून सारजाई खेकसली. ‘हेंच . . . शिकला कागा ऽ तूं ? तू त् म्हणत होता का, सहा रुपये बारा आने भेटन. केला होता एका रुप्याचा ... घाटा. मालकानं त् सात रुपये बारा आने काढले ! ...

राम गोंधळला. आपला हिशोब एकवार तपासून पाहिला. हिशोब सहा–बारा आणे व येई. रामने एका–एका दिवसावरून हिशोब मायले करून दाखविला. तिला पटला. हरामाचा रूपा फलणार नाही म्हणून तो वापस करायला सारजाई निघाली.

सारजाई पाठमोरी होत नाही तोंच ‘ मामी, ओ मामी...’ दारावर हांक मारीत सीत थांबली. कोण असाव म्हणून रामने डोकावले. पाहतो तों सीतां ! मैनाची एकुलती एक लेक ! गांवांत जिला नांवबोटं ठेवतान. ती ! ‘ साऱ्या मुलुखाची फिरस्ती !’ सीता रामच्या दारावर!

दोघांची निगा एक झाली. सीता लाजली. शरमली. तिनें लाजतच रामला विचारले, ‘ सारजाई......मामी कुठायं ?’

‘ आताच चावडीकडे गेली.’ राम म्हणाला.

‘ चावडीकडे ?’ सीताने आश्चर्याने विचारले.

राम सीताचा चेहरा न्याहाळत होता. तिचं चरचर पाणी टक लावून पहात होता. लोकं बोलतात ते बरोबर आहे काय ? याच परीक्षण करीत आहे......

‘ हंम्’ करून त्याने सीताला नुसरा होकार दिला.

‘मामीचाहि...हिशोब...गलत भेटला कां ? ‘ सीताने तुटक तुटक शब्दांत विचारले.

‘ हो...’ राम म्हणाला.

‘ हा बल्लभ्या असाच करतों...ज्याले त्याले गाडतो...मलेभी कमती

देल्ले; फकत् चार रूपे न्...आठ टिकल्या...माहे रोजं त् सहा होते' सीता सांगत होती.

राम ऐकत होता......

रामाने सीताला हिशोब करून दाखविला. बारा आणे कमी असल्याचे सांगितले. सीताला घेऊन रास चावडीवर गेला. मालकाला रामराम केला. राम बोलूं लागला.

'मा—ल—क, कोणाले जास्त पैसे देता, घाटा तुमचा होतो. कमीं दिले त् पोटमारा गरिबांचा. थप्‌थप् घाम गाळतात. दिवाबत्ती लागेपर्यंत काम करतात. त्यांना बरोबर रोज मिळाला पाहिजे पैसा मिळाला पाहिजे. ही मैंना अक्काची सी—ता. बारा आणें कमी मिळाले तिला. हिशोब करा. द्या तिला...'

रोजदारनी बाया चिडीचिप्प् होत्या. नुसत्या टक्टक पाहात...... कौतुकाने !

केवळ एक क्षण !

?......? उलटयासुलटया प्रश्नांचं वादळ सुटतं !

'यालेहि घेरलं दारीनं ! तव्हाच् त् तिचा पुळका आला त्याले. . कुजबुज सुरू झाली.

रामच्या हुशारीबद्दल, 'वाह ! बेटा वाह !!' असें शब्द काढून मालक म्हणाले, कोणाचा रे तूं. . .सारजाईचा का ?

'जी' राम म्हणाला.

'नांव काय तुझं ?' मालक.

'राम' राम.

मालकानं गोष्ट मनावर घेतली.हिशोब बरोबर करून दिला. रामला आवारीपणावर चाकरी दिली... सीता घरीं गेली. हाटा जावयासाठी हर्कषलेली सीता घरींच होती तिचं आंग मोडून आलं होतं. एकारंगाच लागत होतं तिला. ती झोपली. मस्त सुस्तवली रात्रीची स्वप्नं दिवसा-

ढवळचा घोळवत होती. त्यांतच् ती रंगली होती. तिसरा प्रहर झाला होता.

'गोंदवा वो, बाया ऽ ऽ गोंदवा. भरताराचं...नांव गोंदवा. देवाचं नांव ... गोंदवा. आपल्या राघूचं...नांव गोंदवा–गोंदवा वो, बायाऽऽ आवाज आला.

सीताची झोप मोडली. स्वप्न भंगलं !

अय्, गोंदोनेवाले ऽ...ये–वो' सीताने हांक मारली.

गोंदवणेवाली लगबगीनं वळली नि विचारले 'कुठं गोंदता बाय्, हातावर...कपाराच्या पाटीवर...का ?..., काय गोंदता ?...... राघूचं नांव गोंदवा....'

'सीता,' कोणाचं नांव गोंदवन वो ? पट्‌रून राह्यली त्.... ' सीता वस्कावली.

'रामा'चं...बाई, रामाचं...' गोंदवणेवाली.

'घे...गोंद !' सीता.

सीतेनं डावा हात समोर केला. सुई टोचल्या गेली.

'राम !...वुऽई...राम...रा–म !'

'राम' सीतानं गोंदवून घेतलं,

सीताची कुरापत पाहिल्यावर मैनानं सीताची खूप घोडपीडा काढली पण पस्तावली. मैनानं बरोबरीनं वाढलेल्या लेकीवर हात उचलला होता...

✯ सीता सकाळीं उठते. शेणोळी घेते अन् दूर रानांत गोवऱ्या वेचायला निघून जाते...

सूर्यन रायण डोक्यावर येतो...

सारजाईचा लेक राम सकाळपासून बल्लमदास मारवाड्याचे वावरंचे वावरं टंगटंग हिंडून काढतो. बारभाईचा कामठ. कोतवाल डुंग. मसोबाचं रान...

बाराचा सुमार होतो. रान अगदी शांत होतं. अन् अशावेळीं हात धुवून पाठीमागे लागलेली पडछाया क्षणभर पायाखाली येते आाण लपछपीचा डाव खेळते...

दिवस घसरतो...! रात्रीची ओढ असते.

भेदरलेलें चोरपाय पावलावर पावलें टाकींत घराकडे वळतात..

भुर्कन् कांहीं दिवस निघून ःतात ★

पण !.........

.........पण ?

वाटंवर बसलेल्या रावजी बुढ्याला चाहूल लागते. तो आपला दंडा आपटतो. अन् भंडा फुटतो......

गांवांत एकच बोंब होते......

मैना सारजाईच्या घरी जेवन रात्रीच तडक निघून जाते आणि सारजाईची मनधरणी करते,

सारजाई दोन्ही हात कानावर ठेवून झाकली मूठ लाखाची समजते.

दुसरें दिवशीं तुक्या मांग सैनी वाजवितो. 'पीं...पीईऽऽपीं प्ऽपीं......!'

★
★★

# मंजु !     निशा हिर्डे

तुळशी-वृंदावनापुढें नीरांजन तेवत होतें, त्याचा मंद आल्हाद-कारक प्रकाश आसपास पसरला होता; सरलच्या मुखावरही तो प्रकाश खेळूं लागला. त्या प्रकाशांत डोळ्यांतून ओघळणारी आंसवें स्पष्ट दिसत होती

आज भाऊबिजेचा दिवस. पण घरांत भाऊराया नव्हता. माज-घरांतून हास्याचा खळखळाट उसळत होता. माहेरपणाला आलेल्या तिच्या दोन नणंदा ओवाळणीच्या आनंदांत मग्न होत्या पण सरलला कांही ऐकूं येत नव्हतं. कांही दिसत नव्हतं. निरांजन, प्रकाश, चंद्र, कांही कांही दिसत नव्हतं तिला. त्या मंदप्रकाशांत तिला भूतकाळ दिसत होता.—

लहानगी मंजू आज फार आनंदांत होती. घाऱ्या डोळ्यांची गोरी गोरी पान वहिनी तिला फार आवडली. आई-बाबा सोडून गेले. दोघेंच बहिण-भाऊ राहूं लागले नोकर-चाकर होते तरी कसं ओकं ओकं वाटायचं. कित्ती दिवसांतून आज मायेचा हात पाठीवर फिरणार अन् तो कायम राहणार, या कल्पनेने हृदयांत हर्ष दुथडी वहात होता. मावशी किंवा आत्या काय दोन दिवस राहणार! पण वहिनी! कुठे जाणार आता ?

उंबरठ्यांतील धान्याचें माप पायाने उलथवून वहिनी आंत आली. हंसतमुखाने मंजू पुढे आली. वहिनीचा पदर धरून उत्कंठेने हांक मारली, 'वहिनी.' हो. मावशीनंच सांगितलं होतं ना वहिनी म्हणायला! वहिनीने मंजुकडे पाहिले. त्या नजरेंत काय होतें कोण जाणें? मंजू एकदम मागे सरली. अन् मावशीला बिलगली.

पाहुणे-मंडळी गेली. स्वयंपाकी, नोकरवर्ग, मंजू, भाऊ अन् वहिनी इतकीच माणसें घरांत राहिली. मंजूची पाठ मायेच्या हाताची वाटच पहात राहिली. ' मंजू, प्यायला पाणी घे, कंगवा दे, साडी आण, चपला आण असें हुकूम मंजुला सुटूं लागले.

एके दिवशीं मंजू भाऊच्या मांडीवर जाऊन बसली. भाऊच्या गळयांत हात घालून ती लाडे-लाडे बोलूं लागली, ' भाऊ, मला वहिनीसारख्या लाल लाल चपला आणशील ? मला फाऽर आवडतात. '

भाऊ केंसांतून हात फिरवीत म्हणाला, ' आणूं हं. ' कुठुनशी वहिनी तीरासारखी धांवत आली. मंजुला खसकन् ओढले अन म्हणाली, ' एवढीशी टीचभर कारटी ! हेवा करतेस काय माझा ? तुला गं कशाला हव्या लाल चपला ? आहेत त्या काय वाईट आहेत ? भाऊ एक शब्द बोलला नाही. मंजुचें अंतःकरण दुभंगलें. घरांत एवढी संपत्ति ! भाऊ-वहिनी आनंदांत पोहत होती तर मंजुच्या हृदयांत दुःखाचें ओहळ वहात होते.

मंजु मोठी झाली. ती आता नववींत शिकत होती. घरांत चार भाचरें आली. प्रकाश-विकास, विजू अन् रंजू. मंजुचें काम वाढले. मंजु अभ्यासाला वसली की प्रकाशने पुस्तक पळवावे, विकासने पेन उचलावे अन् विजू-रजूने वह्यांची ओढाताण करावी.

मंजु म्हणायची, ' असं रे काय करता ? माझा अभ्यास नको का व्हायला ?'

लगेच विजू–रजूचा आवाज सप्तमस्वरांत चढायचा, वहिनी धांवून यायची अन् म्हणायची, ' लहान मुलं येतात जवळ ती सुद्धा नाही ना सहन होत ? काय करते कांय जाणं मेली ! हिच्याजवळ आली की रडायला लागतात.'

मंजू भीत भीत म्हणायची, ' मी गं काय केलं वहिनी ? सारीच मला अभ्यास करूं देत नाहीत. शिक्षा नाही का व्हायची मला ?'

वहिनी ओरडायची, ' झाली तर होऊं दे. म्हणून सोन्यासारख्या मुलांना का रडवायचं ? म्हणे मी काय केलं ? हेवा करतेस की त्यांचा.

तुला तरी काय कमी आहे ? मिळतंच आहे शिकायला.'

मंजू आता जाणती झाली होती, तिला वाटायचं, 'बाबांनी भाऊलाच का दिलं सारं काही ! मला कांहीच नाही ? मी का त्यांना आवडत नसेन ?'

वहिनी भाऊच्या मागे लागली. 'पंधरा वर्षाची झालीय् ही आता. लगीन करून टाकावें हिचं.'

भाऊ एकदाच म्हणाला, 'पदवीधर करून टाकू या की तिला.

पण वहिनी फणकाऱ्याने म्हणाली, 'करायचं काय जास्ती शिकवून? शेवटी चूल अन् मूळ आहेच मेलं. त्यातच जायचा जन्म. अन् हे बघा शक्य तोंवर हजार एकात्तंच उरकावं सारं हो, आपली मुलं मोठी व्हायचीत अजून, त्यांच्या मुंजी, शिक्षण, लगीन, हौसा–मौजा सारंच करायचय आपल्याला.'

भाऊ कांहीच बोलला नाही.

हें जोशांचं स्थळ गवसलं. थोडी भातजमीन, नारळी–सुपारीची झाडं, बाग–बागायत, स्वतःच दुमजली बरंच मोठं घर, आणखी काय हवं ? भाऊनं लाचारी दाखवली. पांचशे रुपये मान–पान अन् पांचशे रुपयांत वहिनीच्या कसं मनासारखं जमलं. केशव लोभी नव्हता, त्यानं मंजुचं रूप पाहिलं, डोळयांतील भाव पाहिले.

अन् एके दिवशीं दारापुढे सनई वाजूं लागली. 'हे मधुर आलाप आपली या जाचांतून सुटका करणार. आपण हक्काच्या घरीं जाणार,' या आनंदांत अजाण मंजू मग्न होती.

मावशीनें विचारलें, 'कायरे माधव, इतकं लवकर कसं ठरवलंस लग्न ? लहान आहे ती अजून. शिवाय शिक्षणही अपुरंच.'

वहिनीनं उत्तर दिलं, 'काय सांगावं मावशी ? शिक्षणांत मंजुचं लक्षं लागेना. मग करायचं काय ? हेही नको अन् तेही नको.'

मंजू मनांत हंसली, 'वा रे वा वहिनी ! अन् पांचवीपासून नववी-

पर्यंत पहिला नंबर सोडला नाही कधी हें माहीत नाही वाटतं हिला माझी पीडॉं काढायची होती असं का नाही बोलत सरळ ?'

माधव म्हणाला, 'अग मावशी, चांगलं स्थळ मिळालं, टाकलं जमवून. केव्हांतरी करायचंच होतं ना ? आज काय अन् उद्या काय ! मंजु अगदी सुखांत राहील हो मावशी.'

अरे होय, पण मुलगा काय करतो ? हुंडा किती दिलास ? सारं सांग बाबा.' मला

'हुंड्याशीं काय करायचं तुला ? स्थळ छान मिळालं ना ? झालं तर. मुलगा इंग्रजी शाळेंत मास्तर आहे. घरांत खायला प्यायला भरपूर आहे. अन् रूप तर काही विचारूं नकोस मावशी अगदी लक्ष्मी-नारायणाचा जोडा. बघशीलच तूं आतां.'

भावाचं बोलणं ऐकून मंजुच्या हृदयांत कुठेतरी गुदगुल्या झाल्या. उगाच लाजल्यासारखं झालं तिला. भाऊची माझ्यावर खरीच माया आहे. पण वहिनीपुढं लाचार बनतो. त्याला काय करणार तो !

भावाचं घर सोडतेवेळीं तुरुंगांतील सुटणाऱ्या कैद्याचा आनंद मंजुंच्या चेहऱ्यांवर खेळत होता. वहिनीनं कांगावा केला. मावशीच्या गळां पडून ती म्हणाली, 'मावशी, मला कसं करमायचं हो आता ? या घरांत आल्यापासून मंजुला आईची आठवण नाही होऊं दिली कधी. तळहातावरील फोडाप्रमाणं वागवली तिला.'

मंजुचे मन फडफडलें, 'खरंच फोडाप्रमाणं अगदी पिळून काढल-यंस खरं मला. फोड कुणाला हवासा वाटेल ? तशी मी सुद्धा कध्धी हवीशी वाटलें नाही तुला.'

वहिनी पुढं म्हणाली, 'अन् माझी मुलं हो ! मावशी, फारच त्रास देतील मला. मंजु–आल्याशिवाय पान हलायचं नाही पोरांचं.' –

मंजुचं पिळवटलेलं अंतःकरण म्हणालं, 'आता दिसतील तुला देव. 'मंजू रजू–विजुला बाहेर ने, मुलांना कपडे

करून दें, रजू–विजुची वेणी–फणी कर, त्यांना आंघोळ घाल अशीं हजार कामं यापुढं तुलाच करावी लागतील खरी. हं ! पण तुला कशालां ? नोकर ठेवशील तूं खास मुलांच्या करता ! पण नोकरांत आत्याची माया कशी मिळणार हें तुला कळायचं नाही.'

भावाने मात्र खरोखरीच मायेने तिला जवळ घेतलें. तिच्या पाठी-वर प्रेमाने हात फिरला. त्या स्पर्शाने तिला सारं कांही सांगितलं. तो गद्गदून म्हणाला, 'मंजू, आनंदानं जा बाळ. सुखांत रहा. मी कधी तुला'– त्याचा कंठ भरून आला. तो पुढें बोलूं शकला नाही.

मंजुच्याही डोळ्यांत पाणी खेळूं लागले, पण तेवढ्यांत वहिनी आली अन् म्हणाली, 'हे काय ? वायकांसारखं का रडायचं ? साऱ्यां-च्याच मुली जातात सासरीं. मी नाही आले आपल्या घरांत ? पाहिलंत ना मावशी ? कसं प्रेम आहे बहीण भावाचं.' वहिनी इकडे बोलत होतीं खरी पण आपल्या वरातीच्या वेळीं बाबा कसें रडत होते हें दृश्य आठवल्याशिवाय राहिले नाही तिला.

हा प्रकार पाहून मायेने विरघळलेलें मंजुचे मन पुन: कठोर बनलें.

मोटारींत बसलेल्या मंजुच्या मनांत विचारांचे थैमान सुरू होतें. जवळच बसलेल्या केशवकडे ती चोरून पाही. 'खरचं भाऊ म्हणाला तसंच रुपडं आहे खरं ! नवीन वातावरणांत कसं होणार आपलं ? ही माणसं प्रेमळ असतील की वहिनीसारखी दुटप्पी ? अं ! काय करणार ती ? आपण चांगलं तर जग चांगलं.' पुन्हा मनांत विचार येई, 'पण–वहिनीशीं नांही का मी चांगली वागले ? तिचं मन कुठं बदललं ? तसंच इथंही झालं ?' या विचारानं तिचं मन घायाळ झालं पण क्षण-भरंच. कांहीही असो पण तिला बिलक्षण सुख होतं हें मात्र खरं.

सासरी मंजुला खायला–प्यायला कांही कमी नव्हतं. त्या घरची ती 'सरल' होती. सासूबाई कधी म्हणत, 'इतकी गडगंज संपत्ति घरीं आहे पण भावानं लग्न कांही चांगलं केलं नाही. देणगी तरी काय!

पर्यंत पहिला नंबर सोडला नाही कधी हें माहीत नाही वाटतं हिला माझी पीछाँ काढायची होती असं का नाही बोलत सरळ ?'

माधव म्हणाला, 'अग मावशी, चांगलं स्थळ मिळालं, टाकलं जमवून. केव्हांतरी करायचंच होतं ना ? आज काय अन् उद्या काय ! मंजु अगदी सुखांत राहील हो मावशी.'

अरे होय, पण मुलगा काय करतो ? हुंडा किती दिलास ? सारं सांग बाबा.' मला

'हुंड्याशीं काय करायचं तुला ? स्थळ छान मिळालं ना ? झालं तर. मुलगा इंग्रजी शाळेंत मास्तर आहे. घरांत खायला प्यायला भरपूर आहे. अन् रूप तर काही विचारूं नकोस मावशी अगदी लक्ष्मी-नारायणाचा जोडा. बघशीलच तूं आतां.'

भावाचं बोलणं ऐकून मंजुच्या हृदयांत कुठे तरी गुदगुल्या झाल्या. उगाच लाजल्यासारखं झालं तिला. भाऊची माझ्यावर खरीच माया आहे. पण वहिनीपुढं लाचार बनतो. त्याला काय करणार तो !

भावाचं घर सोडतेवेळीं तुरुंगांतील सुटणाऱ्या कैद्याचा आनंद मंजुच्या चेहऱ्यांवर खेळत होता. वहिनीनं कांगावा केला. मावशीच्या गळां पडून ती म्हणाली, 'मावशी, मला कसं करमायचं हो आता ? या घरांत आल्यापासून मंजुला आईची आठवण नाही होऊं दिली कधी. तळहातावरील फोडाप्रमाणं वागवली तिला.'

मंजुचे मन फडफडलें, 'खरंच फोडाप्रमाणं अगदी पिळून काढल-यंस खरं मला. फोड कुणाला हवासा वाटेल ? तशी मी सुद्धा कध्धी हवीशी वाटलें नाही तुला.'

वहिनी पुढं म्हणाली, 'अन् माझी मुलं हो ! मावशी, फारच त्रास देतील मला. मंजु–आल्याशिवाय पान हलायचं नाही पोरांचं.' –

मंजुचं पिळवटलेलं अंतःकरण म्हणालं, 'आता दिसतील तुला देव. 'मंजू रजू–विजुला बाहेर ने, मुलांना कपडे

करून दें, रजू-विजुची वेणी-फणी कर, त्यांना आंघोळ घाल अशीं हजार कामं यापुढं तुलाच करावी लागतील खरी. हं ! पण तुला कशालां ? नोकर ठेवशील तूं खास मुलांच्या करता ! पण नोकरांत आत्याची माया कशी मिळणार हें तुला कळायचं नाही.'

भावाने मात्र खरोखरीच मायेने तिला जवळ घेतलें. तिच्या पाठी-वर प्रेमाने हात फिरला. त्या स्पर्शाने तिला सारं कांही सांगितलं. तो गद्गदून म्हणाला, 'मंजू, आनंदानं जा बाळ. सुखांत रहा. मी कधी तुला'– त्याचा कंठ भरून आला. तो पुढें बोलूं शकला नाही.

मंजुच्याही डोळ्यांत पाणी खेळूं लागले, पण तेवढ्यांत वहिनी आली अन् म्हणाली, 'हे काय ? वायकांसारखं का रडायचं ? साऱ्यां-च्याच मुली जातात सासरीं. मी नाही आले आपल्या घरांत ? पाहिलंत ना मावशी ? कसं प्रेम आहे बहीण भावाचं.' वहिनी इकडे बोलत होतीं खरी पण आपल्या वरातीच्या वेळीं बाबा कसें रडत होते हें दृश्य आठवल्याशिवाय राहिले नाही तिला.

हा प्रकार पाहून मायेने विरघळलेलें मंजुचे मन पुनः कठोर बनलें.

मोटारींत बसलेल्या मंजुच्या मनांत विचारांचे थैमान सुरू होतें. जवळच बसलेल्या केशवकडे ती चोरून पाही. 'खरचं भाऊ म्हणाला तसंच रुपडं आहे खरं ! नवीन वातावरणांत कसं होणार आपलं ? ही माणसं प्रेमळ असतील की वहिनीसारखी दुटप्पी ? अं ! काय करणार ती ? आपण चांगलं तर जग चांगलं.' पुन्हा मनांत विचार येई, 'पण–वहिनीशीं नांही का मी चांगली वागले ? तिचं मन कुठं बदललं ? तसंच इथंही झालं ?' या विचारानं तिचं मन घायाळ झालं पण क्षण-भरंच. कांहीही असो पण तिला बिलक्षण सुख होतं हें मात्र खरं.

सासरी मंजुला खायला-प्यायला कांही कमी नव्हतं. त्या घरची ती 'सरल' होती. सासूबाई कधी म्हणत, 'इतकी गडगंज संपत्ति घरीं आहे पण भावानं लग्न कांही चांगलं केलं नाही. देणगी तरी काय!

दिली अशी ? आम्हाला वाटलं ठरवायचं तरी काय ! त्यांच्याकडे काय आहे कमी ? आपल्या ऐपतीप्रमाणं देमारंच सारं कांही. पण चांगलंच फशी पाडलंन आम्हाला. बराच कावेबाज आहे हो हिचा भाऊ !'

असं कांही ऐकलं की मंजुचं तोंड गोरंमोरं व्हायचं. तें बघून केशव हळूच म्हणायचा, '

'आई, काय कमी आहे आपल्याला ? कशाला दुसऱ्यांकडून घ्यायची अपेक्षा करायची आपण ? '

केशवने बायकोची बाजू घ्यावी हें सासूला आवडत नसे. ती फणकाऱ्याने म्हणायची, 'दुसऱ्यांकडून करंत नसंत कुणी अपेक्षा, पण सासंरच्याकडून करतात हो. हक्कच आहे तो. '

मंजू हळूंच परसदारीं जायची. अन् डोळ्यांना पदर लावायची. हळूच होणारी पावलांची चाहूल कानीं पडायची. पण तिचा कार्यक्रम चालूंच असायचा. मग हलकेंच कुणाकडून तरी मुखकमलवर उचललं जाई. अन् गोड़ शब्द कानांत शिरत; 'हें काय ? रडतेस तूं ? एवढं कां मनाला लावून घ्यायचं ? आईला संवयच आहे असं समजायचं.' मधुर शब्दांचं वारं लागताच अश्रू सुकून जात. अन् मान त्या कुणांच्या तरी वक्षावर टेकली जाई.

केशवनं मंजुला कधी दुखवलं नाही पण त्याच्या बहिणी कमला व विमला यांच्याकडेही दुर्लक्ष केलं नाही. मंजुनंही त्यांना कधी दुखवूं नये ही त्याची अपेक्षा. सरळ मनाच्या मंजुनेही ती पूर्ण करण्याचा प्रयत्न सतत करायचा. पण हृदयाच्या आंत कुठं तरी हें बंधू-भगिनी प्रेम खुपत राही. त्याला मंजुचा नाईलाज होता. दोन्ही नणंदांची लग्नं झालीं. ती दिवाळी मोठ्या धडाक्यांत मंजुकडे साजरी झाली. दोघेही जावई आले. भुईनळे, चंद्र ज्योति सरासर उडाल्या. फटाक्यांचा फाड् फाड् आवाज घुमला. अन् त्याने मंजुच्या हृदयांत आग लावली. तिची ही दुसरी दिवाळी. तिला पहिली दिवाळी आठवली. पहिली दिवाळी तेव्हां भाऊ येणारच हा तिचा पक्का विश्वास. पण भाऊबीज आली तरी भाऊ आला

नाही. घरचा बहिण-भावाच्या ओवाळणीचा प्रसंग तिला तापदायक वाटला. ती अंगणांत चंद्राला ओवाळताना खूप रडली. तेवढयांत कमला तेथे आली. वहिनीला रडत असलेली पाहून तिला आश्चर्य वाटलं. नेहमी गोड बोलणारी, हंसतमुख असणारी वहिनी रडते !

ती म्हणाली, 'वहिनी, भाऊ नाही आला म्हणून कां रडतेस ? अग, भाऊ का आहे तुझा तो ! कसाई दिसतो कसाई ! नाहीतर आमचा दादा. हिरा आहे अस्सल.'

हे शब्द हृदयाला कापीत आंत शिरले. अन् मंजू कातर स्वरांत बोलली, 'नको हो कमलावन्स असं बोलूं. माझा भाऊही कमी नाही. त्याला कसली अडचण असेल. कदाचित्-कदाचित् आजारीही असेल तो.'

कमला समजुतीच्या स्वरांत हंसून म्हणाली, 'अगदीच गं भोळी तूं वहिनी ! आमच्या रत्नाला तुझ्यासारखं बावनकशी सोनं मिळालं म्हणून आमची मजा. पहिल्या दिवाळ सणाला खर्च येतो फार. तेव्हां तुझ्या वहिनीनं–बरं जाऊं देतें. चल घरांत. तुला काय कमी आहे. आम्ही आहोत ना ?' मंजू वरवर हंसली व म्हणाली, 'खरंच वन्सं, यालाही भाग्य लागतं. तुमच्यासारखी दोन माणकं माझ्याजवळ असतां डोळयांत हे आंसू नकोतच मुळी.'

ती दिवाळी गेली. दुसऱ्या दिवाळीचा दिवाळसण साजरा झाला. मंजुची माणकं माहेरी आली. जावई आले. अन् मंजुच्या हृदयांतील आग अधिक प्रज्वलित झाली. मंजू मत्सरी नव्हती. बंधू-भगिनीचं निर्मल प्रेम कुणाला आवडणार नाही ? पण मंजुला तें मिळत नव्हतं म्हणून तिला मत्सर वाटायचा. दुसरी दिवाळी गेली तरी भाऊ आला नाही. मनांतील आगीने प्रचंड रूप धारण केलें. कोणाजवळ बोलायचें नाही. मनांत घुमसणारी आग मंजुला जाळूं लागली ती दिवसेंदिवस कृश होऊं लागली रोगाचें निदान होईना. औषध लागेना. केशवचें उज्वल प्रेम तिला सुधारविण्यास असमर्थ ठरलें भावाने केलेली उपेक्षेच्या हत्याराची धार जीवाला हळूं हळूं कापीतच होती. तरीपण एका आशेवर मंजू

जगत होती. 'तिसऱ्या दिवाळीला भाऊ नक्की येणार. मी त्याला ओवाळणार.' ही तिची वेडी आशा.

ती मनांत म्हणायची, 'भाऊ कसेंही कर. पण भाऊबीजेला जरूर ये. मी मोठी ओवाळणी मागेन म्हणून कां घाबरतोस तूं ? नाही बरं भाऊ, मला कांही नको. पण तूं हवास. भाऊ, तुझ प्रेम हवं, माया हवी. ही उपेक्षा सहनशक्तीच्या पलीकडे गेली आहे.'

पण याहि दिवाळींत भाऊ आला नाही. घरांतील ओवाळणीचा मधूर प्रसंग दृष्टीसमोर नकोसा झाला तिला. ती चंद्राला ओवाळण्यास निघाली.–

हें सर्व प्रसंग नजरेसमोरून सरकलें. ती भानावर आली. तिने चोहिंकडे नजर टाकली. चंद्र आकाशांत नव्हता. आंपण बराच वेळ इथे बसलो हा विचार मनांत येऊन ती ओवाळण्यासाठी उठून उभी राहिली. पण तोल गेला. ती वांकडी-तिकडी खाली पडली. पडतां पडतां कानावर शब्द आदळलें, 'वहिनी गं, कुठं आहेस ?'

मंजुच्या डोळ्यांतून निघालेली ज्योत भावाला ओवाळण्यास त्याच दिशेने जाऊं लागली.

त्याच वेळी भाऊकडे ओवाळणीचा प्रसंग थाटांत चालला होता. विजू-रजूला प्रकाश-विकासकडून मोत्याचा कंठा अन् माणकांची अंगठी मिळाली. भाऊ-वहिनी आरांमात तक्याशीं टेकून गंमत पहात होते. नवीनच घेतलेल्या सोफासेटकडे वहिनी कौतुकानं पाहत होती. भाऊ कांहीसा उदास वाटत होता. तो एकदम उठून दाराकडे धांवला. 'मंजू, मंजू ये. दारांत का उभी आहेस ? रागवलीस माझ्यावर ?'

वहिनी पटकन उठली. तिने भाऊचा हात धरून त्याला मागे ओढले.

तो म्हणत होता 'आता मी तुझं काही एक ऐकणार नाही. सोड मला. ती बघ मंजू दारांत उभी आहे. रागवली नाही बरं का ती!

हंसते आहे. वहिनी अन मुलं डोळे फाडफाडून दाराकडे बघूं लागली. पण कांही दिसेना. कुणीतरी विजेरी मारल्यासारखा प्रकाशाचा झोत मात्र दिसत होता खरा.

'नाही ना दिसत कांही ? कसं दिसणार ? जन्मभर वैर केलंस तूं तिचं.' तो वैतागून बोलत होता, 'चांडाळणी, नाही सोडायचा हात ? ती बघ काय म्हणते ? किती गोड सूर ! काय ?

'असाच राही सदा सुखाने ।
ओवाळित तुज प्राणपणाने ।।

गात रहा. मंजू, अशीच गात रहा. हें काय ? निघालीस ? नको गं, जाऊं नको. ये मंजू, ये. या गळ्याला मिठी घाल.' अन् पाहतां पाहतां भाऊ खाली पडला. त्याने डोळे गच्च मिटून घेतले. गालावर अश्रूंच्या सरी ओघळत होत्या.

★★★
★★
★

## कलिंगडाची फाक भरतकुमार रघुवंशी

दोन आठच्या लोकल मध्यें शिरलो आणि कॉटन ग्रीन ते वांद्रा तब्बल अर्ध्या तासाचा मार्ग असल्यामुळें खिडकीच्या शेजारी रिकाम्या असलेल्या जागेवर आरामशीर बसलों. 'संध्याकाळ' चा अंक चालवूं लागलों पण त्यांत तसं कांही विशेष नसल्यामुळें पेपर बंद केला. आणि डोळे मिटून खिडकीच्या कठड्याला मान टेकवली. गाडीचा वेग वाढत होता. वारा येत असल्यामुळें गार वाटूं लागलं. इतक्यांत शिरडी स्टेशन आलं. अुतारूंचा गलबला नि फेरी वाल्यांची ओरड ह्या द्वयींनी मला कांही स्वस्थ बसूं दिलं नाही. डोळे अुघडून मी खिडकींतून बाहेर डोकावलं, तर १७-१८ वर्षाची एक भिकारीण कडेवर तान्हे मूल घेवून कशी बशी गाडींत चढण्याचा प्रयत्न करीत होती. तिच्या अंगात मुळीच भाण नव्हतां. मूलाला घेवून गाडींत चढण्याचा निष्फळ प्रयत्न ती करीत होती गाडी सुरूं झाली. दारावर अुभे असलेले अुतारूं ओरडू लागले व त्यांच्या पैकी एकाने तिला सांवरलं व डब्यांत घेतलं.–

लोकल गाडीवर असले प्रकार आमच्या रोजच्या पहाणीचे आहेत. तासभर प्रवास केल्याशिवाय आम्ही ऑफीसांत पोहचत नाही. एकमेकाला सहाय्य करीत हा आमचा रोजचा प्रवास आम्ही संपवीत असतो. लोकल गाडीच्या प्रत्येक डब्यांत अेक ना अेक भिकारी असतोच. त्यामुळं एकाद्याला कांही तरी देवून प्रत्येक जण मोकळा होतो. शिरस्त्या प्रमाणें त्या भिकारीणनें मागायला सुरूंवात केली. मी पुन्हां डोळे मिटलेव स्वस्थ बसलो. थोड्याच वेळांत ती माझ्या खिडकीच्या बाजूला आली. "द्यां हो भाअु गरिबणीला कांही !" असें तिचे अुद्‌गार माझ्या कानावर पडले. 'भाऊ' हा शब्द नि आवाज परिचयाचा वाटूं लागला. मी माझे डोळे अुघडले. मला आश्चर्याचा धक्काच बसला–माझ्या तोंडून शब्दच

फुटेना. " काय झालं तुला चिरी ! " म्हणून मी जवळ जवळ ओरडणारच होतो तिची असहाय्य स्थिती पाहावेना. तिच्या साडीच्या चिंध्या झाल्या होत्या. लज्जेस्तव तिनं कसवसं शरीर झाकलं होतं. डोईवरचे केस विखुरले होते. धूळ जमून जमून तिच्या केसांचा रंग भुरकट होत चालला होता.

तोंडावर अकाली वार्धक्य आल्याप्रमाणें सुरकुल्या पडल्या होत्या. चेहरा काळा ठिक्कर पडला. डोळे खोल जावून नूसती बुबुळंच काय ती फिरत होती. मलिन आणि हडकुळ असं तिचं ते मूल ती कसंबसं सावरीत होती. भुकेनीं व्याकुळ झाल्यामुळं त्यानंही आकांड तांडव चालवला होता. त्याला छातीशीं धरून कुरवाळीत त्याचे रडे थांबवण्याचा निष्कारण प्रयत्न ती करीत होती. अशा असाह्य स्थितीतलं चिरीचं ते रूप मी सारखा न्याहाळून पाहूं लागलो.

सगळ्या अुतारूंना कुतुहल वाटायला लागलं. बघता-बघतां तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. चार वर्षापूर्वीची चिरी डोळ्यापुढें आली आणि तिच्या ह्या दु:खद अवस्थेचं कारण जाणून घेण्याची माझी अिच्छा बळावली

मी तिला माहीमच्या स्टेशनवर अुतरवून घेतलं. तिला सावरत फलाटावर बसवलं. तिच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहतच होत्या. मी तिला विचारूं लागलो काय झालं ग तुला ? " तिचें ओठ थरथरूं लागले. आणि हळु हळु सगळं मला तिनं सांगितल. तिच्या जीवनांतले प्रसंग वर्णन करतांना तिच्या डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा वहात होत्या. माझी सुद्धा स्थिति विलक्षण झाली. मी एखाद्या निर्जीव चित्रासारखा तिच्याकडे बघत होतो. बोलतां बोलतां ती म्हणे, " भाऊ ! काय करूं हो, ह्या बाळा करतां जगते, नाहीतर................पोटाच्या गोळ्यांमुळें मन मारून जगते आहे. मी पापी आहे ! अभागीण आहे ! कशाला माझी विचारपूस करतां ! "

मी तिला स्टेशन बाहेरच्या हॉटेलांत घेवून गेलों. तिच्या मुलाला पोटभर दूध पाजलं तिला पण खाऊ घातलं. न जाणो किती दिवसांची अुपाशी असतील बिचारी ! आतां हिचं काय करायचं, ह्याचाच मी विचार करूं लागलो. त्या तंद्रींतच आम्ही अुठलो. मी पैसे द्यायला काअुंटरवर गेलो. ती बाहेर आली मी पैसे देवून बाहेर आलो आणि पाहतो तर, चिरी नाही.

मी अिकडे तिकडे शोधू लागलो. स्टेशनवर शोधलं……चर्चच्या भोवताली पाह्यलं, बगिच्यांत पाह्यलं……पण चिरीचा पत्ता नाही. तिने संधी साधून कुठली तरी लोकल गांठली असेल. आतां चिरीची भेट होणं कठीणच होतं. ती मुंबअीच्या गर्दीत पार मिसळून गेली. ह्या मुंबअींत कोण कुणाचा आहे ? आपल्या दैवाची अुर्वरित फळं भोगण्यासाठी सिद्ध होअुनच जणू ती निघून गेली असेल !

मी तसाच घरीं परतलो. पण चिरी मात्र माझ्या डोळ्या समोरून जाअीना. मी सारखा तिचा विचार करूं लागलो. तिचं सगळं जीवन माझ्या डोळ्यासमोर आलं.

चार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. मी त्यावेळी कॉटनग्रीनला रहायला असे. मी आणि माझा मित्र श्रीधर रोज राणीच्या बागेंत फिरायला जात असूं. राणीच्या बागेच्या कंपाअुंड शेजारी फूटपाथवर एक म्हातारी कलिंगडे विकत बसायची. तिच्याच शेजारी तिची नात चिरी बसलेली असे. एका कलिंगडाच्या फाका करून विकणं, हा त्यांचा धंदा. चिरी हातांमध्यें फाका घेऊन, "कलिंगड घ्या हो कलिंगड ! " म्हणून ओरडे. कलिंगडाच्या फाका हातांत घेऊन ती फूट पाथवर इकडून तिकडे फेऱ्या टाकी व गिऱ्हाअिकें मिळवी.

आम्ही म्हातारीची रोजची गिऱ्हाअिकें होतो. फिरायला गेलो म्हणजे कलिंगडें खायची, हा आमचा क्रम असे. रोजची गिऱ्हाइकं म्हणून ती आम्हांला लाल नि गोड फाका द्यायची. रोजच्या परीचयामुळे म्हातारी

कधी कधी आमच्याशी बोलत असे. मी एक दिवस सहज विचारलं, "आजी ! आतां ह्या म्हातारपणी कशाला कष्ट घेतेस ?" तेव्हां ती कळवळून म्हणे, "या माझ्या चिरीसाठी ! हिच्याशिवाय माझ्या आयुष्यात कुणी नाही. चिरीचे आईबाप ही एवढी जबाबदारी माझ्यावर टाकून गेलेत. एकदां हिचं लग्न झालं म्हणजे सुटली मी."

चिरी त्यावेळी १३-१४ वर्षाची असेल. आजीवर तिचं खूप प्रेम होतं व कलिंगडाच्या व्यापारांत ती फार तरबेज होती. आम्हाला ती 'भाऊ' म्हणे. "आणखी घ्याहो भाऊ !" म्हणून तो आम्हाला आग्रह करी.

जणुं आपल्या पाठची बहिण आग्रह करते आहे, असा तिचा जिव्हाळा असे. आणि आम्ही गेलो कीं ती फार प्रेमानी विचारपूस करी. राणीच्या बागेंतल्या लाऊडस्पीकरवर "दादा मला वहिणी आण" हे गाणं लागलं कीं ती आनंदानें नाचूं लागे व मला म्हणे, "भाऊ ! वहिणीला घेऊन या अं कलिंगड खायला." श्रीधर ला मराठी कळेना पण तिच्या प्रेमळ हावभावाहून तो समजून घेत असे. कलिंगडाची तारीफ तर तिनेच करावी. तिची कलिंगड कधी गोदावरी कांठची तर कधी तापीची असत. ती म्हणे, "पहा कशी लाल बुंद आहेत." मी तिला म्हणायचा, "तुझ्या गालासारखीच का ?" तेव्हां ती लाजेने चूर होवून तोंड लपवायची व माझ्याशी कट्टी करायची. आजी आमच्या अवळ तिच्या लग्नाबद्दल बोलत असे. तेव्हां ती पळत जावून राणीच्या बागेंतल्या फाऊंटन जवळ जावून बसे. तिला पण आपल्या आयुष्याची जाणीव होवूं लागली होती. आम्ही आपले तिच्या भोळ्याभाबड्या गोष्टींनी करमणूक करीत असूं. चिरीस नि म्हातारीला जामच्या विषयी आपुलकी वाटे आणि आम्हांलाही त्यांच्याशी बातचीत केल्याशिवाय करमेना.

त्यानतर मी अंधेरीला रहायला गेलो नि राणीच्या बागेचा फेरफटका संपला. तद्वतच चिरीची करमणूकही हळुं हळूं पार विसरून गेलो.

शेवटी म्हातारीनी एक दिवस राम म्हटला. म्हातारीची चिरीवर कडक निगा असे. पण आतां ती पोरकी झाली. तिच्यात हूडपणा होता. भोळेपणा होता आणि तिला जगाचा अनुभव नव्हता. रस्त्यावरच्या मवाल्याने त्याचा फायदा घेतला. तिच्याशी कपट केलं. प्रेमाचं नाटक केल आणि तिच्या शीलाला लुबाडलं. लग्नाची खोटी आश्वासन देवून पळून गेला. चिरीवर एका मुलाचा भार टाकून त्या ठकानें तिला ठकवलं. चिरीला कोण जवळ घेणार? ती तोंड दाखवण्याच्या लायकीची राहिली नव्हती."

शेवटी पोटाची खळगी भरण्यासाठी तिला भीक मागावी लागली. पोटचा गोळा तिला टाकवत नाही. आणि त्याच्या करतां ती सगळी मुंबअी पालथी घालते आहे.

"कुठं गेली असेल चिरी?" ह्या विचारानी माझं मन अगदी अस्वस्थ होतं. ह्या एवढया मोठया मुंबईत कुठे शोधणार मी तिला! तिची मूर्ती कांहीं केल्या डोळयासमोरून जात नाही. कुठलीही भीकारीण मला गाडीतून दिसली, कीं मी तिला न्याहाळून बघतो पण चिरी आजवर मला दिसली नाही.

ती मला भेटली तर तिला एक छोटंसं फळाचं दुकान घालून देईन आणि मग ती पुन्हा प्रेमानी म्हणेल, "घेना भाऊ! कलिंगडाची फाक!" तो दिवस अुगवला, तर मी एका बहिणीचा पाठीराखा होण्याचं भाग्य पदरांत पाडून घेईन.

★★★
★★
★

## 'विज्ञान मानवाचा' --रघुनाथ ब्राम्हणकर

सख्या काय केलें दीन झालो आम्ही
निसर्गाला लाविलें या नीच कामीं
जन्म देऊनी पाळीलें–पोशीले आम्हाशी
मग सांग आज कृत्यें कां हीन अशी ?–१.

निसर्गाशीं कशी ? कां ? सर्वांची प्रीति !
स्वप्नीं, मनीं, झोपेंत बाळगावी भीति ?
स्वतेज मातृदुग्धीं कां करण्या प्रबळ ?
मग सांग कां दुजा ? आहों आम्ही दुर्बल ?–२

हा नव्हें साक्षात्कार निसर्ग–देवतेचा
खरा वरदान हा 'विज्ञान मानवाचा'
दु:ख तें हरण्या गाठूं, ऋद्धि–सिद्धीला
तनमन धनाने आवरूं विज्ञानाला –३.

● ●

## घायाळलेल्या मनाचे – श्रीराम तनय.

मुखावरील तो भाव
झाला मिलनाने कसा
बहरलेल्या बागेंत
फुलला गुलाब जसा –१

क्षणाक्षणांत चालतो
नाजूक चंचल खेळ
पाकळी एकेक गळे
बने हृदय घायाळ –२.

घायाळलेल्या मनाचे
घाव धुवार ते कसें ?
मऊ कुंतल कुरळे
हळू फिरवावें जसें –३.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. 90586

## पाठीशीं बावरी — सिंधु पुरणकर.

तन्मुर्तिच्या दर्शनाने
जीव ! शान्त विसावते
आतुरल्या माझ्या मनीं
सुखीं–स्वप्ने घोळविते.–१

होतां आठव; राघवा !
कावरे बावरे होते–
मन, वेडावते पुन्हा...
पुन्हा तेथे धाव घेते !!–२.

आले दूरत्व ते कसें ?
अभागिनीच्या पदरीं,
काळ पळेनाहि वेगें–
तरी पाठीशीं बावरी.–३.

## हैवानात मानवता ! — केशव पाजणकर.

परीसाच्या संगर्गाने
लोखंडाचे सोने होई
सु–वर्णाच्या प्रतिभेने
सुज्ञतेला थारा नाही–१.

प्रकाशाच्या संपर्काने
अंधाराचा लोप होई
सद्‌गुणाच्या प्रभावें
दुर्गुणांना वाव नाही.–२

कु–संगतीने भुलतो
मनुष्याची मनुष्यता
आणि सत्संगें शोधतो
हैवानात मानवता !

# चूक ? ~ भूल ! रघुनाथ हडकर.

रमीचा डाव संपल्यानंतर बिलीयर्ड खेळायचा बेत वाटला गेला. बिलीयर्डलाहि सुरवात होऊन दहा-पंधरा मिनिटें झाली. तरीपण त्यांत लक्ष लागेना. तेव्हां दोस्त मंडळी उठली; आणि नुसतीच एका टेबला-जवळ गोळा झाली. चार कप कॉफीची आर्डर दिली गेली. गप्पांना सुरवात झाली. गप्पाच होत्या त्या, त्यांना विशिष्ट विषयांचें बंधन असणें शक्य नव्हतें; किंवा अभिरूचीची, संस्कृतीची, नीति-अनीतीची चाड बाळगणेंहि शक्य नव्हतें.

नंतर एक दोस्त म्हणाला–' अरे यार, गेल्या उन्हाळ्यांतलीच गोष्ट आहे. माझ्या बायकोला आणि चारहि मुलांना मी माथेरानला पाठवून दिलें होते. मीहि त्यांच्याबरोबरच जाणार होतो. पण माझा ' रीलिव्हर ' आला नाहीं म्हणून मला आठ दिवस मागें रहावें लागले. आणि या आठ दिवसांत काय मजा आली ! मी रहातों त्या माझ्या बाजूच्या ब्लॉक-मध्यें एक मवला माणूस रहातो दारू, सट्टा, जुगार याशिवाय त्याला दुसरा धंदा नाहीं. तरी पण त्यानें त्या वाईट मार्गानें बरीच माया जवळ केली आहे. आणि मोठ्या झकपक रूबाबांत ब्लॉकमध्यें राहतें स्वारी ! घरीं मात्र बिलकूल पाय नाहीं ठरत त्याचा ! कधीं कधीं रात्रीचा घरीं असतो. दिसायला, उमदा, चांगला तिशीच्या घरांतला माणूस आहे. त्याच्या घरांत रहात असलेली बाई, त्याची दुसरेपणाची बायको असें आम्हीं ऐकतों. तो रहायला आलेल्याला दीड दोन वर्षें झालीं; तो आला त्यावेळीं या बाईबरोबरच आला. त्यांना पूर्वीचें मूलबाळ नव्हतें. आणि इथें आल्या-नंतरहि त्यांना कांहीं मूलबाळ झालें नाहीं. आमचाच शेजारी अस-ल्यामुळें आमच्या शेजारणीची व आमच्या हिची दोस्ती जमली. चाळीशीच्या घरांतली आमची ' ही ' चार मुलांचीं आई ! अठरा एकोणीस

वर्षांच्या विनापत्य शेजारणीची आणि तिची विशेष गट्टी जमली कशी, तें कांहीं मला सांगतां येणार नाहीं. आमचा घरोबा वाढत होता. आमची शेजारीण आमच्याकडे पुष्कळ वेळां यायची. बायका-बायकांत गप्पा चालायच्या. पण मी आणि ती असा बोलण्यांचा कधीं प्रसंग आला नाहीं. ज्या दिवशीं मला माझ्या सौ. ला आणि मुलांना पोंहोंचवायचे होतें, त्या दिवसापुरती मी ऑफिसमधून रजा घेतली होती. एकच्या गाडीमध्यें त्यांना बसवून मी दोन अडीचच्या दरम्यान, ऑफिसमध्यें जायचेंच नव्हतें. तेव्हां घरी आलों. दरवाजा उघडून मी आंत आलों. ॲटोमॅटिक कुलूप असल्यामुळें मी आंत येतांच पुन्हा दरवाजा बंद झाला. मी कपडे वगैरे उतरले. अंडरवेअर घातला आणि कांहीं तरी वेळ घाल-वायला पाहिजे म्हणून एक पुस्तक घेऊन वाचीत बसलो. इतक्यांत दरवाजावरची घंटा वाजली. मला वाटलें, पोस्टमन किंवा दूधवाला भय्या आला असेल. मी दरवाजा उघडतों तों, आमची शेजारीण उभी होती. मी क्षणभर गप्पच राहिलों. कांहीं बोललोंच नाहीं. ती सरळ आंत आली. दरवाजा बंद झाला. माझ्या समोरच्या खुर्चीवर ती बसली. मी अद्याप मुकाच होतो. काय बोलायचें हें मला समजत नव्हतें. इतक्यांत तिनेंच बोलायंला सुरवात केली; 'गाडीला गर्दी नव्हती ना? जागा भरपूर मिळाली ना? मला वाटलें, तुम्हीं पण जाणार. मला कसें एकटेंच वाटलें असतें. नाहीं गेलांत तुम्हीं तें फार बरें झालें. दुपारचा चहा झाला नसेल तर बाहेर जाऊं नका चहासाठीं. मी आणून देते आमच्या घरून. आमच्या घरचा प्यायचा नाहीं अशी अट असली तर तुमच्याच घरांत बनवते चहा.' आणखी पुष्कळ कांहींसें तीं बडबडली; मला आतां नक्की आठवत नाहीं. परंतु मला मात्र तिचें म्हणणें सगळें असंबद्ध वाटलें. मला कांहीं समजेना. उत्तरादाखल कांहींतरी बोलायचें म्हणून मी म्हणालों, 'गाडीला गर्दी विशेष नव्हती. आम्हांला जागा चांगली मिळाली. मी येतेवेळींच चहा पिऊन आलों आहे. त्यामुळें मला आणखी चहाची आवश्यकता नाहीं'

ती जाते वेळीं म्हणाली–'कांहीं लागलें तर शेजारचें बटन दाबा. तसा भिडस्तपणा किंवा संकोच बाळगायचें बिलकूल कारण नाहीं. आपलेंच घर आहे, असें समजा '

दुसऱ्या दिवशीं मी ऑफिसमधून आलों, तेव्हां ती आली. 'आजहि बया पुन्हां कां आली ?', मी मनांतल्या मनांत म्हणत होतो. पण तोंडा-बाहेर कांहीं शब्द पडत नव्हता.

तिनेंच बोलायला सुरवात केली. 'आज ऑफिसमध्यें पुष्कळळ काम होतें कां ? थकलेलें दिसतां तुम्ही !'

मी कांहींच बोललों नाहीं. दोनतीन मिनिटें ती पण कांहीं बोलली नाहीं. नंतर तिनेंच पुन्हां बोलायला सुरवात केली. हॉटेलमध्यें जेवलांत ना ? आवडलें नाहीं वाटतें जेवण ?'

'हॉटेलमध्यें जेवायची संवय आहे मला !' मी म्हाणालों. 'आमच्या ऑफिसमध्यें तसें विशेष जास्त काम नसतें.' 'उगाच बडबडायची संवय आहे या बाईला,' ती निघून गेली, तशी मी म्हाणालो.

तिसऱ्या दिवशीं मी ऑफिसमध्यें जाण्याच्या तयारींत होतों. इतक्यांत ती बाई आली. 'आज किनई आमच्याकडे फीस्ट आहे. तेव्हां तुम्ही संध्याकाळीं हॉटेलमध्यें जेवून घरीं येऊं नका, म्हणून सांगायला मी आलें आहे.' मी कांहींच बोललों नाहीं ! तेव्हां ती म्हणालीं, 'आमच्याकडे जेवायला यायला संकोच कां वाटतो ? बडी माणसें तुम्हीं ! मग असें करते, तुमच्या जेवणाचें ताट तुमच्या घरीं आणून देतें. हे तरी चालेल ना?'

'कशाला ?' नकळत माझ्या तोंडून शब्द गेला. 'तुम्हांला उगाच त्रास कशाला ?' 'त्यांत त्रास कसला ?' ती निघून गेलीं.

संध्याकाळी मी तिच्या घरीं जेवायला गेलो. तिनें जेवणासाठीं निरनिराळे पदार्थ बनविले होते. मी डायनिंग टेबलवर बसलों. दोन ताटें होती. मला वाटलें, या दुसऱ्या ताटासमोर येऊन तिचा नवरा जेवायला बसणार. चारपांच मिनीटें झालीं नवरा कांहीं आला नाहीं. पण ती बाई मात्र येऊन माझ्या समोरच्या ताटावर बसली. ती बसल्या-बरोबर मी आश्चर्यचकित झालों. व तिला म्हणालों, 'आपलें यजमान

अद्याप आले नाहींत वाटतें ?'

'त्यांचें हें नेहमीचेंच ! करा तुम्हीं सुरवात जेवायला.' ती म्हणाली. तिनेंपण जेवायला सुरवात केली. 'फार सुंदर जेवण बनवितां तुम्हीं' मी मध्येंच जेवतांना एकदां म्हणालों

'असें करा संध्याकाळचें तुमचें जेवण मीच बनविते' मी निघतांना ती म्हणाली. चौथ्या दिवशीं सकाळीं नऊ वाजतां गरमगरम चहा व शिऱ्याची बशी घेऊन ती आली. मी ऑफिसमध्यें जाण्यासाठी कपडे बदलत होतो.

'चहा थंड होईल, घ्या ना लवकर' तिनें, हुकूम सोडला.

मी चहाचा एक घोट घेतला आणि म्हणालो, 'आपल्या आदरातिथ्या-बद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. पण मला वाटतें, माझी बायको घरांत नसतांना आणि मी एकटाच घरांत असतांना, आपल्यासारख्या विवाहित स्त्रीनें माझ्याकडे वारंवार येणें, थोडेसें बरें दिसत नाहीं.'

'त्यांत काय झालें ? तो माझा व्यक्तिगत प्रश्न आहे.' तीं मोठ्या घुश्श्यांत म्हणाली. 'तसे नव्हें; पण कोणी बघितलें तर लोक काय म्हणतील ?' मीपण पटकन् बोलून गेलों.

'इथें आपण ब्लॉकमध्यें रहातों. कोण बघायला आलें आहे आपल्याला ?' ती रिकामी कपबशी उचलींत म्हणाली. 'फार घाबरणारे दिसतां तुम्हीं लोकांना ! असें कां लोकांना घाबरायचें असतें ?'

त्या दिवशीं संध्याकाळीं मी घरीं झोपायला आलोंच नाहीं. माझ्या मनांत भीति वाटायला लागली, संध्याकाळीं ही बया यायची, आणि म्हणायची, इथेंच राहातें रात्रभर' माझा 'रिलिव्हर' येईपर्यंतचें दोन दिवस नातेवाईकाकडे काढलें व सरळ माथेरानला गेलो.'

'अरे क्या, बुद्धू है तुम ?' दोस्त, नंबर दोन म्हणाला.

'सचमुच बुद्धू है !' दोस्त नंबर तीन म्हणाला. 'मी कॉलेजांत होतो, तेव्हाची गोष्ट आहे सिनिअर बी ए. ला होतो मीं. नुसतीच दाढी हिरवी होत होती. ऐन जवानीत होतो त्यावेळीं मी. पुण्याला एका

बंगलेवजा घरांत राहात होतों. माडीवरची एक खोली माझ्या ताब्यांत होती. बाकीचा सगळा बंगला मालकच वापरींत असें. मालक इंजिनिअर होता. आणि बिल्डिंगच्या कामानिमित्त नेहमीं बाहेरगांवी फिरतीवर असायचा. एकदां बाहेरगांवीं गेला म्हणजे महिना दोन, तीन महिन्यांनीं आठ-दहा दिवस परत यायचा. बंगल्यांत मालकीण आणि तिची पांच मुलें दोन, तीन नोकर व एक माळी व माडीवरच्या एका खोलींत मी इतकी माणसें राहात असूं. मालकीणीची मोठी मुलगी चौदा वर्षांची होतीं व अगदीं शेवटचा मुलगा दोन वर्षांचा होता. दिवसभर उनाड टप्पूपणा केल्यानंतर मी रात्रीचा अभ्यास करायला बसत असें. घरांत मालक नसले म्हणजे, जेवण वगैरें आटपलें म्हणजे मालकीण माझ्या खोलींत यायची. अकरा बारा वाजेपर्यंत आम्ही गप्पा मारीत बसत असूं. ती नंतर झोपायला खालीं निघून जायची.

मी रहात होतो, त्या बंगल्याची मालकीण पांच मुलांची आई होती. पैसा भरपूर होता. सगळें कांही ऐश्वर्य होतें. ती स्वत: दिसायला सुन्दर होती. एवढें वय झालें होतें. एवढीं मुलें झाली होती. तरीपण ती मोहक दिसायची, मादक दिसायची. मी एकटा असतांना माझ्याबरोबर तासचें तास ती रात्रीदिवसा गप्पा मारायचीं. मी कपडे बदलत सअलों, तरी ती कधीं संकोचाने मागें गेली नाहीं. उन्हाळयाच्या कित्येक दिवसांत ती नुसत्या 'बॉडी' निशीं माझ्याकडे यायची कधीं कधीं बॉडीपण नसायचीं. तिचें उन्मत्त उरोज आणि मादक शरीर पाहून मला कसेंसेंच वाटायचें ! माझें रक्त सळसळून यायचे. मला काय होत असें तें मात्र मला कळत नव्हतें. एकदिवस कुठल्या मासिकांत गोष्ट वाचली, गोष्टीतला नायक तरूण उमदा पोरगा असतो. आणि नायिका म्हातारी बाई असतें. ती त्या तरूण मुलावर खुष होते. व त्याच्याबरोबर प्रेमाचें चाळे सुरू करतें परंतू त्या तरूणाला मात्र तें आवडत नाहीं. तो भिऊन पळून जातो. एकंदरींत म्हाताऱ्या स्त्रीला एखादा उमदा तरुण प्रेमाचे चाळे करायला

अद्याप आले नाहींत वाटतें ?'

'त्यांचें हें नेहमींचेंच ! करा तुम्हीं सुरवात जेवायला.' ती म्हणालीं. तिनेंपण जेवायला सुरवात केली. 'फार सुंदर जेवण बनवितां तुम्हीं' मी मध्येंच जेवतांना एकदां म्हणालों

'असें करा संध्याकाळचें तुमचें जेवण मीच बनविते' मी निघतांना ती म्हणाली. चौथ्या दिवशीं सकाळीं नऊ वाजतां गरमगरम चहा व शिऱ्याची बशी घेऊन ती आली. मी ऑफिसमध्यें जाण्यासाठीं कपडे बदलत होतो.

'चहा थंड होईल, घ्या ना लवकर' तिनें, हुकूम सोडला.

मी चहाचा एक घोट घेतला आणि म्हणालो, 'आपल्या आदरातिथ्या-बद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. पण मला वाटतें, माझी बायको घरांत नसतांना आणि मी एकटाच घरांत असतांना, आपल्यासारख्या विवाहित स्त्रीनें माझ्याकडे वारंवार येणें, थोडेसें बरें दिसत नाहीं.'

'त्यांत काय झालें ? तो माझा व्यक्तिगत प्रश्न आहे.' ती मोठ्या घुश्श्यांत म्हणाली. 'तसे नव्हें; पण कोणी बघितलें तर लोक काय म्हणतील ?' मीपण पटकन् बोलून गेलों.

'इथें आपण ब्लॉकमध्यें रहातों. कोण बघायला आलें आहे आपल्याला ?' ती रिकामी कपबशी उचलींत म्हणाली. 'फार घाबरणारे दिसतां तुम्हीं लोकांना ! असें कां लोकांना घाबरायचें असतें ?'

' त्या दिवशीं संध्याकाळीं मी घरीं झोपायला आलोंच नाहीं. माझ्या मनांत भीति वाटायला लागली, संध्याकाळीं ही यायची, आणि म्हणायची, इथेंच राहातें रात्रभर' माझा 'रिलिव्हर' येईपर्यंतचें दोन दिवस नातेवाईकाकडे काढलें व सरळ माथेरानला गेलो.'

'अरे क्या, बुद्धू है तुम ?' दोस्त, नंबर दोन म्हणाला.

'सचमुच बुद्धू है !' दोस्त नंबर तीन म्हणाला. 'मी कॉलेजांत होतो, तेव्हाची गोष्ट आहे सिनिअर बी. ए. ला होतो मीं. नुसतीच दाढी हिरवी होत होती. ऐन जवानीत होतो त्यावेळीं मी. पुण्याला एका

बंगलेवजा घरांत राहात होतों माडीवरची एक खोली माझ्या ताब्यांत होती. बाकीचा सगळा बंगला मालकच वापरींत असें. मालक इंजिनिअर होता. आणि बिल्डिंगच्या कामानिमित्त नेहमी बाहेरगांवी फिरतीवर असायचा. एकदां बाहेरगांवीं गेला म्हणजे महिना दोन, तीन महिन्यांनीं आठ-दहा दिवस परत यायचा बंगल्यांत मालकीण आणि तिची पांच मुलें दोन, तीन नोकर व एक माळी व माडीवरच्या एका खोलींत मी इतकी माणसें राहात असूं मालकीणीची मोठी मुलगी चौदा वर्षांची होतीं व अगदीं शेवटचा मुलगा दोन वर्षांचा होता. दिवसभर उनाड टप्पूपणा केल्यानंतर मी रात्रीचा अभ्यास करायला बसत असें. घरांत मालक नसले म्हणजे, जेवण वगैरें आटपलें म्हणजे मालकीण माझ्या खोलींत यायची. अकरा बारा वाजेपर्यंन आम्ही गप्पा मारीत बसत असूं. ती नंतर झोपायला खालीं निघून जायची.

मी रहात होतो, त्या बंगल्याची मालकीण पांच मुलांची आई होती पैसा भरपूर होता. सगळें कांही ऐश्वर्य होतें. ती स्वत: दिसायला सुन्दर होती. एवढें वय झालें होतें. एवढीं मुलें झाली होती. तरीपण ती मोहक दिसायची, मादक दिसायची. मी एकटा असतांना माझ्याबरोबर तासचें तास ती रात्रीदिवसा गप्पा मारायचीं. मी कपडे बदलत. सअलों, तरी ती कधीं संकोचाने मागें गेली नाहीं. उन्हाळयाच्या कित्येक दिवसांत ती नुसत्या 'बॉडी' निशीं माझ्याकडे यायची कधीं कधीं बॉडीपण नसायचीं तिचें उन्मत्त उरोज आणि मादक शरीर पाहून मला कसेंसेंच वाटायचें ! माझें रक्त सळसळून यायचे. मला काय होत असें तें मात्र मला कळत मव्हतें. एकदिवस कुठल्या मासिकांत गोष्ट वाचली, गोष्टीतला नायक तरूण उमदा पोरगा असतो. आणि नायिका म्हातारी बाई असतें. ती त्या तरूण मुलावर खुष होते. व त्याच्याबरोबर प्रेमाचें चाळे सुरू करतें परंतू त्या तरूणाला मात्र तें आवडत नाहीं. तो भिऊन पळून जातो. एकंदरींत म्हाताऱ्या स्त्रीला एखादा उमदा तरुण प्रेमाचे चाळे करायला



... स्वाक्षरी

आवडतो, हें त्या गोष्टीच्या लेखकानें साऱ्या गोष्टींतून प्रतिपादन केलें होतें. ही गोष्ट वाचल्यानंतर माझ्या मनांत क्रांति झाली. माझी मालकीण माझ्याकडे येऊन तासचे तास दिवसारात्रीं गप्पा मारते, याचा अर्थ मी वरील गोष्टीच्या अनुरोधानें लाविला. परंतु त्या तरुणासारखें बनायचें नाहीं, हेंहि पण मी ठरवलें.

दुसऱ्या दिवशीं मालकीण आली. नेहमींप्रमाणें आमच्या गप्पा झाल्या. बारा साडेबारा वाजतां ती ज्यावेळीं जायला निघाली, त्यावेळी मी तिला घट्ट माझ्या बाहूपाशांत आवळून धरलें. तिथे दुसरें कुणीच नव्हतें. तिनेपण प्रतिकार केला नाहीं. परंतु माझ्या मिठीची पकड कमी होतांच ती माझ्या डोक्यावरून हात फिरवत ममतेनें म्हणाली, 'असा अविचार करूं नकोस. अजून लहान आहेस तूं··· तूं माझ्या मुलासारखा आहेस माझा पहिला मुलगा जिवंत असतां तर तुझ्या एवढा झाला असतां. तुला पाहताच मला त्याला बघितल्याचें समाधान वाटतें म्हणून मी तुझ्याकडे वारंवार येते. तूं तरुण आहेस······मी ओळखतें तुला. तुझ्या भावना मी जाणतें. तूं तुझी फायनलची परीक्षा पास हो, मग तुझें आपण लग्न करून टाकूं या······कांहीं घाबरूं नकोस मीं या गोष्ठीची कोणाकडे वाच्यता करणार नाहीं !······माझ्या आयुष्यांत तर असें घडलें पण तूं मात्र चांगला चालून आलेला चान्स घालविलास'

'जिंदगी ऐसीहि है भाई' दोस्त नंबर चार म्हणाला; 'कधी प्लस, तर कधीं मायनस तर कधीं नॉनप्लस.'

आणि त्यांनीं गप्पा सोडून पुन्हां रमी खेळायला सुरवात केली.

★

REFBK-0010577
REFBK-0010577

# ★ प्र का श – स्रो त ★

---::●::---

१. श्री. विजय टाकोडे–जन्म १९३९. अमरावतीला महाविद्यालयीन शिक्षण.

२. ,, गोविंद नशोरे–जन्म १९१९. 'रा. रत्न.' शिक्षक. 'तळमळ' काव्यसंग्रह प्रकाशित.

३. सौ. निशा हिर्डे–'सा. रत्न.' शिक्षिका. 'मुरलीरव' काव्यसंग्रह प्रकाशित.

४. श्री. बजरंग सरोदे–जन्म १९३५ अध्यापक. बी. ए. चा अभ्यास.

५. ,, रामकृष्ण देशमुख–जन्म १९३६. अमरावतीला महाविद्यालयीन शिक्षण.

६. ,, भरतकुमार रघुवंशी–जन्म १९३१. बी. ए. विमान- दलांत नोकरी.

७. ,, शंकर काळे–जन्म १९३४. बी. ए. अध्यापक. 'चाहूल' 'वंदना' पुस्तकें प्रकाशित.

८. ,, सुधाकर लोखंडे–जन्म १९३५. अध्यापक. इंटरपर्यंत शिक्षण.

९. ,, राजाभाऊ निकम–जन्म १९३५. शिक्षक. बी, ए. चा अभ्यास.

१०. ,, प्रल्हाद पाटील–जन्म १९३८. मॅट्रीक. नोकरी.

११. ,, रा. व्यं. निनावे–जन्म १९१७. रा. भा. कोविद. मॅट्रीक–सरकारी नोकरी.

१२. ,, लक्ष्मीकान्त कुरोडे–जन्म १९२९. एम्. ए., बी. टी. अध्यापक.

१३. ,, प्रभाकर बेंद्रे–जन्म १९२१ एम्. ए.–बी. टी. शिक्षक. कथाकार, नाट्य छटाकार, लघुनिबंधकार, टीकाकार. बरेंच प्रकाशन.

१४. ,, रा. म. फडके–१९२६. बी. एस्सी. एलएल. बी. डिस्टि. मलेरिया ऑफीसर.

१५. श्री. संभाजी होकम–जन्म ११३६. सा. स्नातक, बी.काम् चा अभ्यास
१६. ,, रघुनाथ ब्राह्मणकर–सा. स्नातक. शिक्षक. बी ए.चा अभ्यास
१७. ,, कृष्णा सखाराम चौधरी–जन्म १९४२. रा. भा. कोविद. मॅट्रीक अभ्यास.
१८. ,, ज. वं. विसापूरकर 'गीताकिशोर'–जन्म १९३३. मराठी प्राज्ञ सरकारी नोकरी.
१९. ,, रामदास सेलूकर–जन्म १९३५. 'हिंदी–मराठी विशारद' शिक्षक
२०. ,, ह. गो. निखाडे–'आनंद'–जन्म १९२०. रा. भा. रत्न, सा. रत्न. सा. स्नातक. शिक्षक.
२१. ,, रंगनाथ बंदसोडे–जन्म १९३१. एस्. एस्. सी. मुंबईला सरकारी नौकरी.
२२. ,, प्रभाकर जावरकर–जन्म १९३८. शिक्षक ट्रेनिंग.
२३. ,, माणिक भोयर–जन्म १९३९. मॅट्रीक. मेडिकलचा अभ्यास.
२४. ,, अविनाश वरोकर–जन्म १९३२. बी. ए.,बी. टी. अध्यापक.
२५. ,, यशवंत सातपुते–जन्म १९३५. रा. भा. कोविद. इंटरपर्यंत शिक्षण. शिक्षक.
२६. ,, प्रभाकर कोरेकर–बी. ए.बी.टी. शिक्षक. एम्. ए.चा अभ्यास.
२७. ,, सुधाकर मोगलेवार–जन्म १९३६. 'सा. पारंगत.' 'सा.विशारद' शिक्षक. 'शिवगंगा' मासिकाचे संपादक. 'तारका.' 'खडीसाखर' प्रका. वाटेवर.
२८. ,, गंगाधर सावळकर–जन्म १९२५. बी. ए., सा. विशारद. सरकारी नोकरी.
२९. ,, उत्तम लिमये–जन्म १९३२. मॅट्रीक. शिक्षक.
३०. सौ. शांताबाई दंडिगे–वास्तव्य-नागपूर. 'सा. पारंगत', 'सा. विशारद', 'सा. रत्न.' काव्याची लहानपणापासून गोडी. 'एकदाणी' काव्यसंग्रह प्रकाशित.
३१. श्री. अण्णा अडसोड–जन्म १९३३. मॅट्रीक. आयुर्वेदिक व्यवसाय.

३२. श्री नीलकांत ढोले–जन्म १९३९. मॅट्रीक. शिक्षक.

३३ ,, वामन हाते–जन्म १९१२. मॅट्रीक. सा. प्राज्ञ. शिक्षक.

३४. ,, वासुदेव बाळाजी भावे–जन्म १९१२. मॅट्रीक. गायक, कवि. लेखक, ज्योतिषी.

३५. ,, तुकाराम डोंगरे–जन्म १९२५ रा.भा. कोविद. हिंदी प्रचारक.

३६. ,, निहालचन्द वक्काणी जन्म १९३०, सा. स्नातक. सा.विशारद शिक्षक.

३७. ,, दत्ता कवीश्वर–'मराठी सा. पारंगत ' रा.भा.प्रवीण. कवि–टीकाकार. 'डंका', साप्ताहिकाचे माजी संपादक 'प्रभाकर प्रकाशन' मध्यें लेखक 'अनवसिता'. 'तुटलेला तारा' प्रका.वाटेवर

३८. ,, विद्याधर घारपुरे–जन्म १९३९ एस्. एस्. सी. ओगलेवाडी येथे नोकरी.

३९. ,, हंसदास बोंबले–'बुद्धानंद'–जन्म १९३४.' सा. स्नातक. सा. विशारद. शिक्षक.

४० ,, जानराव गावंडे–'अंजन'–जन्म १९२६. कोविद. इंटर. शिक्षक.

४१. ,, कृ० मा० देशमुख–'कृष्ण माधव'०जन्म १९३८. मॅट्रीक. रा. भा. कोविद. शिक्षक.

४२. ,, आत्माराम भोयर जन्म १९३१. साहित्य स्नातक. सा विशारद. शिक्षक. कथा-कवितांचे लिखाण 'नव्हाळी', 'पालवी'चे संपादक.

४३. श्रीमती प्रभा बल्लाळ–वास्तव्य नागपूर. संजय, सुबोध व सुरेखा या बालकांच्या माता. नोकरी

४४. श्री वसंतराव देशमुख–जन्म १९२३. सा. स्नातक, कोविद एल्.एस्.जी.डी. नोकरी.

४५ ,, दिनकर हरणे–जन्म १९३६. बी.ए. पर्यंत शिक्षण. शिक्षक

४६. ,, मार्तंड जोशी–जन्म २९२७. साहित्य विशारद. शिक्षक.

४७. ,, न० मा० तिडके–जन्म १९४१. कला कोविद–विशारद वाङ्मयाची रुचि.

४८. ,, अरविंद देशपांडे–'शशिधर'–जन्म १९३७. मॅट्रीक. इंजि॰ डिप्लोमा. नोकरी.

४९. श्री. आसाराम गोहणे–१९३९. बी.ए. चा अभ्यास. रा.भा. कोविद, शिक्षक.

५०. ,, राजाराम कुळकर्णी–वास्तव्य–भिवशी-बेळगांव. मराठी वाङ्मयाची गोडी.

५१. ,, कृ० वा० चौधरी–जन्म १९३७ शिक्षक.

५२. ,, बद्रुद्दिन करमाली खोजा–जन्म १९४० वास्तव्य–मुरबें–ठाणें.

५३. ,, गुलाबराव भुते–जन्म १९३३ सा. स्नातक; विशारद; रत्न. शिक्षक

५४. ,, वसन्त डहाके--जन्म १९४२ बी. ए.चा अभ्यास. कवितेचा नाद.

५५. ,, दिनकर भूत--'जानकीतनय'--जन्म १९३५ मॅट्रीक. नोकरी. कवितेची रुचि.

५६. ,, बाळासाहेब पाटील--सांगलीस महाविद्यालयीन शिक्षण. काव्याची गोडी.

५७. सौ० गंगूताई वैद्य–जन्म १९१३ नंदुरबारला शिक्षिका. बरेंच साहित्य प्रकाशित.

५८. श्री. वि० त्र्यं० पाटील–पुण्याला फर्ग्युसन कॉलेजांत शिक्षण. काव्याची गोडी.

५९. ,, प्रभाकर कुन्दारपवार–जन्म १९३५ मॅट्रीक. रा. भा. कोविद. शिक्षक.

६०. ,, शंकर चोवितकर–जन्म १९३८ नागपूरला स्टॉकमन ट्रेनिंगला.

६१. कु. सिंधू पुरणकर–जन्म १९३३ कोविद. स्नातक. डिप्. टी. शिक्षिका.

६२. श्री. प्रयागराव लौडे–मॅट्रीक. तरुण–उत्साही शिक्षक. कोविद. स्नातक.

६३. ,, पुरुषोत्तम वनकर–जन्म १९३७ चांद्याला महाविद्यालयीन शिक्षण.

६४. ,, भास्कर कोतवालीवालें 'श्रीरामतनय' --जन्म १९३३ मॅट्रीक नोकरी कवितेचा नाद.

६५. ,, केशव पाजणकर--मॅट्रीक नागपूरला स्टॉकमन ट्रेनिंगला. कवितेची आवड.

६६. ,, रघुनाथ हडकर--जन्म १९३० एम्. ए. बरेंच साहित्य प्रकाशित. सरकारी नोकरी.